म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.



लक्ष्मीदास बोरकर



# निंबोणीचं झाडाखालं

REFBK-0018651

# निंबोणीच्या झाडाखाली

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
क्र. १८६५१
मुंबई शाखा

लक्ष्मीदास बोरकर

REFBK-0018651

आराधना प्रकाशन, मुंबई ५१

प्रकाशक :
गजानन गोविंद आठवले
आराधना प्रकाशन
१ अपूर्वा, साहित्य सहवास
वांद्रा पूर्व, मुंबई ५१

© लक्ष्मीदास बोरकर

मूल्य ५ रुपये

मुद्रक
चिंतामण वामन जोशी
माधव प्रिंटिंग प्रेस
अलिबाग, जि कुलाबा

जिच्या जबरदस्त इच्छाशक्तीमुळेच
परदेश पर्यटनाचा सुयोग
प्रत्यक्षात साकार झाला
त्या माझ्या

**प्रिय पत्नी–सिंधूस**
**सप्रेम भेट**

**— दास.**

# प्रस्तावना

जर्मन राष्ट्र आणि जर्मन जनता यांच्याबद्दल भारतीयांना स्वातंत्र्यपूर्व काळापासूनच विशेष आकर्षण वाटत आले आहे प्रथम गटे आणि नंतर मॅक्समुल्लर या दोन जर्मन पंडितांनी भारताच्या महान् सांस्कृतिक व साहित्यिक परंपरेचा परिचय युरोपला करून दिला. पहिल्या आणि दुसऱ्या महायुद्धाच्या काळात भारतीय राष्ट्रवाद्यांना साहाय्य केले होते दुसऱ्या महायुद्धानंतर दोन जर्मन राष्ट्रे अस्तित्वात आली भारताप्रमाणे जर्मनीचीही फाळणी झाली एक जर्मनी पश्चिमी गोटात सामील झाला तर एक जर्मनी समाजवादी राष्ट्र म्हणून विकसित झाले समाजवादी चळवळीचे श्रेष्ठ तत्त्वज्ञ मार्क्स, जगाला देणाऱ्या जर्मनीत मार्क्स-लेनिनला मानणारी राष्ट्रसत्ता निर्माण व्हावी हा इतिहासाचा एक गौरवशाली विजय समजावा

दोन दशकांच्या अवधीत पूर्व जर्मनीने किंवा जर्मन प्रजासत्ताक गणराज्याने केलेली प्रगती हाही एक चमत्कारच आहे युद्धामुळे झालेला विध्वंस, मूलतःच शेतीप्रधान असलेला भाग, आर्थिक विकासाच्या साधनांची कमतरता अशा सर्व प्रकारच्या प्रतिकूल परिस्थितीत साम्यवादी जर्मनीच्या नव-नेतृत्वाने राष्ट्ररचनेचे प्रचंड कार्य निश्चयाने, चिकाटीने, साम्यवादी ध्येयनिष्ठेने आणि राष्ट्रीय शिस्तीने केले आहे आर्थिक दृष्टया पूर्व जर्मनीने कारखान्यांची, यंत्रोत्पादनाची, शेतीच्या औद्योगिकरणाची केलेली प्रगती आश्चर्यकारक वैभव, विलास, संपत्ती यात पश्चिमेपेक्षा कमी असले तरी साम्यवादी जर्मनीने एक महान् श्रेय संपादन केले आहे सर्वांना काम, पुरेसे मुबलक अन्न, घर, शिक्षण आणि आरोग्य या मूलभूत गरजांचे आश्वासन दिलेले आहे एकीकडे अफाट वैभव आणि संपत्तीचा झगझगाट आणि दुसरीकडे दारिद्र्य, बेकारी, गलिच्छ वस्त्या, वेश्याव्यवसाय असा दारुण विरोध साम्यवादी जर्मनीत आढळणार नाही

शिक्षणपद्धतीची पूर्व जर्मनीने केलेली पुनर्घटना हे साम्यवादी जर्मनीच्या प्रगतीतील एक वैशिष्टयपूर्ण कार्य आहे पूर्वीच्या नाझी-प्रभावाचे संपूर्ण

निर्मूलन करून अत्यंत अद्यावत अशी शिक्षणव्यवस्था निर्माण करण्याचे कार्य बिकट होते आज युरोपातील कोणत्याही राष्ट्रापेक्षा साम्यवादी जर्मनीतील शिक्षण अद्यावत आहे शिवाय हे शिक्षण सर्वांना उपलब्ध आहे उच्च शिक्षण ही एका वर्गाची मिरासदारी नाही शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या प्रत्येक मुलाला व मुलीला आपल्या आवडीचे शिक्षण घेता येते त्यासाठी पालकावर अवलंबून राहावे लागत नाही

भारताशी स्नेह व सहकार्य, भारतीय साहित्य व संस्कृतीचे अभ्यसन ही जर्मनीची पूर्व परंपरा साम्यवादी जर्मनीने अधिक संपन्न केली आहे गोवा-मुक्तीच्या प्रश्नावर सर्व युरोप भारतावर आग पाखडीत असता, साम्यवादी जर्मनीने मात्र भारताच्या साम्राज्यवाद-विरोधी कृतीचे स्वागत केले होते, पुरस्कार केला होता १९६५ च्या पाक युद्धाचे प्रसंगी वा बांगला देश मुक्ती-संग्रामाच्या अत्यंत आणीबाणीच्या काळात साम्यवादी जर्मनीने भारताला सतत पाठिंबा दिला होता साम्यवादी जर्मनीशी असलेल्या व्यापार हाही भारताच्या फायद्याचा झालेला आहे

राजकीय व आर्थिक सहकार्याबरोबरच भारतीय साहित्याचे अध्ययन व प्रकाशन जर्मनीतील रेनर, मोडे यासारखे तज्ञ करीत असतात पोप्सडॅमचे प्रा वाईडमन यानी जर्मनीतील नेताजी बोस याच्या कार्याचे संशोधन करून त्याबद्दल लेखही प्रसिद्ध केले आहेत नेताजी बोस यांची राष्ट्रनिष्ठा किती अविचल होती हे त्यानी या लेखात सप्रमाण मांडले आहे

अशा या साम्यवादी जर्मनीचा अधिक परिचय मराठी वाचकाना होणे आवश्यक होते साम्यवादी जर्मनीने आपला घराचा, शिक्षणाचा, आरोग्याचा प्रश्न कशा प्रकारे सोडविला याचाही अभ्यास उपयुक्त ठरेल अशा प्रकारची अनुभवाची व राष्ट्ररचनेच्या कार्यातील नवीन प्रयोगाबद्दलची माहिती निरनिराळ्या व भिन्न राज्यव्यवस्था असलेल्या देशातून मिळाल्यास ती उपयुक्त ठरावी या दृष्टीने माझे मित्र श्री लक्ष्मीदास बोरकर याचा हा ग्रंथ एक स्वागतार्ह प्रयत्न आहे पत्रकार या नात्याने साम्यवादी जर्मनीला भेट देण्याचा, तेथील निरनिराळी शहरे, इस्पितळे, ड्रस्डेनसारख्या शहरातील जगप्रसिद्ध चित्रसंग्रहालय पाहण्याचा—मुख्य म्हणजे तेथील स्त्री-पुरुषांना भेटण्याचाही

योग त्याना लाभला तेथील वातावरण प्रत्यक्ष कसे आहे, लोकाना किती स्वातन्त्र्य आहे (आणि नाही), त्याची आतिथ्यशीलता कशा प्रकारची असते याचा प्रत्यक्ष अनुभव जो आला त्याचे वर्णन या ग्रथात वाचावयास मिळते साम्यवादी जर्मनीचा व साम्यवादी जर्मनीतील माणसाचा परिचय या ग्रथातून होतो साध्या घरगुती, जणू बरोबरीच्या मित्राला प्रवासाच्या गोष्टी सांगतो आहोत अशा शैलीने लिहिलेला हा ग्रथ वाचनीय वाटावा

हा ग्रथ लिहिल्याबद्दल श्री लक्ष्मीदास बोरकर याचे मन:पूर्वक अभिनदन

— दिनकर साक्रीकर

# सावलीसाठी थांबण्यापूर्वी

फार नाही अवघी दोनच मिनिट आपला फार वेळ घेणार नाही माझं हे हितगुज ऐका अन् मग पुढं जा

'निंबोणीच्या झाडाखाली या नावावरून कदाचित् आपणास चांदोमामाच्या बालगीताची आठवण येईल. पण जर्मनीच्या प्रवास वर्णनाला हे भलतच नाव का दिल बुवा अशी शंका कुणाच्या मनात येऊ नये यासाठीच हा खुलासा

बर्लिनच्या जगप्रसिद्ध भिंतीकडे जाणाऱ्या हमरस्त्याच नाव आहे 'उन्टेर डेन लिन्डेन.' (याचा इंग्रजी अर्थ 'अंडर शॅडोज ऑफ लाईम ट्रीज' आणि मराठी अर्थ लिंब वृक्षाच्या छायेखाली) बर्लिनचा हा पॉश विभाग एके काळी या भागात म्हणे लिंबराई होती ठराविक साच्याच नाव रुचत नव्हत अन् आगळं नाव काही सुचत नव्हत शेवटी जर्मन लोकशाही प्रजासत्ताकमधील माझे मित्र श्री अँड्र्यू कोलॅसो हे माझ्या मदतीला धावून आले त्यांनी 'निंबोणीच्या झाडाखाली' हे नाव सुचविले अन् तेच कायम केले समर्पक नाव सुचवून : या या पुस्तकाचे 'गॉड फादर' झाल्याबद्दल श्री कोलॅसो यांचे मन पूर्वक आभार

या पुस्तकाच्या प्रकाशनाला सर्व प्रकारचा हातभार लावल्याबद्दल मुंबई-तील जर्मन लोकशाही प्रजासत्ताकच्या दुतावासातील व्हाईस कॉन्सल श्री. स्टायनर यांचे आभार मानावे तेवढे थोडेच तसेच प्रवासवर्णन आठदहा लेखांकात आनंदान व तत्परतेनं प्रकाशित केल्याबद्दल व ते पुस्तक रूपानं प्रसिद्ध करण्यास अनुमती दिल्याबद्दल माझे मित्र 'गोमंतक' दैनिकाचे संपादक श्री माधवराव गडकरी यांचा मी अत्यंत आभारी आहे माझे जुने अन् जाणिते मित्र श्री दिनकर साक्रीकर यांच्याकडे मी हक्कानं चार प्रस्तावनापर शब्द लिहून देण्याची मागणी केली (कारण ते स्वत: जर्मनीला जाऊन आलेले आहेत) अन् त्यांनी ती मागणी माझ्यावरच्या प्रेमानं पुरविली याबद्दल मी त्यांचे आभार मानले तर त्यांना नक्की राग येईल शेवटी माझे सहकारी मित्र श्री अनिरूद्ध पुनर्वसु यांनी आपल्या आराधना प्रकाशनातर्फे

या पुस्तकाला जन्माला घातलं, त्याला रंगरूप दिलं, याबद्दल त्यांचे मी आभार मानणार नाही. मी फक्त एवढेच म्हणेन की, मी त्यांचा आजन्म ऋणी राहीन. नव्या ढंगाचं मुखपृष्ठावरील चित्र रंगविणारे माझे चित्रकार मित्र श्री आर. एस. कटक यांचे आभार. बस्स ! एवढंच

मुंबई, दि. २१ जुलै १९७२

– लक्ष्मीदास बोरकर

१८६५१

माझा दैवावर विश्वास नाही परंतु, चार चौघाप्रमाणे मीसुद्धा कधीकधी दैवात लिहून ठेवलेले कधी टळत नाही असं बोलून गेलो असेन माझ्या दैवात परदेशगमनाचा योग ब्रह्मदेवाने आपल्या खातेवहीत लिहून ठेवला असेल कुणी सांगावे? परंतु, दि १८ जूनच्या आदल्या दिवशी जरी कुणी मला सांगितलं असतं की, बाबा रे, यंदा तुझ्या दैवात परदेशवारीचा योग आहे तर मी त्याला नक्की मूर्खात काढलं असतं तरी बरं मी कधीच कोणत्याही ज्योतिष्याला माझा हात दाखविलेला नाही कारण ज्योतिष्याला माझा हात दाखवून अवलक्षण करून घेण्याची माझी तयारी नसे एकदा का तुम्ही कोणाला हात दाखविला की झालं दुर्दैव हात धुऊन तुमच्या पाठीमागे लागलंच म्हणून समजावं

१८ जून हा गोमंतकीय क्रांतिदिन यंदाचा अठरा जून तर या क्रांती-दिनाचा रौप्यमहोत्सवी वाढदिवस नेमक्या या सुमुहूर्तावर माझ्या हाती भारत सरकारच्या परराष्ट्र खात्याकडून आलेला जाडजूड लखोटा पडला मी केवळ कुतूहल म्हणून लखोटा फोडला लखोट्याच्या पोटात आणखी एक बंद लखोटा निघाला ही काय भानगड बुवा? मला काहीच कळेना मी आतला लखोटा उघडण्यापूर्वी सोबत असलेलं परराष्ट्रखात्याच्या कचेरीचं पत्र वाचलं

ते वाचून मला आश्चर्याचा सुखद धक्काच बसला ध्यानी मनी नसताना दोन-तीन लाखाची लॉटरी लागावी म्हणजे जसा अनपेक्षित धक्का जाणवतो तसाच धक्का जाणवला प्रथम मला ते खरंच वाटेना मी पुन्हा एकदा डोळे फाडफाडून ते पत्र वाचले

मला परदेशगमनाचा योग आपल्या पायानी चालत आला होता जर्मन लोकशाही प्रजासत्ताक म्हणजे पूर्व जर्मनी सरकारने मला दोन आठवड्याच्या

दौऱ्यासाठी निमंत्रण दिल होत अर्थात शिरस्त्याप्रमाणे ते निमत्रण प्रथम भारत सरकारच्या परराष्ट्र खात्याकडे समतीसाठी पाठविल होत सरकारन माझ्या या दौऱ्याला काहीच हरकत नसल्याचे कळवले होते इतकेच नव्हे तर आपल्याच लखोटयातून पूर्व जर्मन सरकारचे निमत्रण माझ्याकडे पाठवून दिले होते परराष्ट्र खात्याच्या पत्रात आपणास परदेशातील प्रवास सुखाचा जावो अशी शुभेच्छा व्यक्त केली होती

ते पत्र वाचल्यावर माझी उत्सुकता शिगेला पोचली मी आतील दुसरा लखोटा फोडला व पूर्व जर्मन सरकारचे पत्र वाचले सरकारी पाहुणा या नात्याने दोन आठवडयाच्या दौऱ्यावर येण्याबद्दल निमत्रण देण्यात आले होते येण्या–जाण्याचा विमान प्रवासाचा खर्च तसेच मुक्कामातील सर्व खर्च सरकार करणार असल्याचे त्यानी मला कळविले होत या पत्रातसुद्धा शेवटी पूर्व जर्मनीचा प्रवास व दौरा आपणास सुखाचा जावो अशी शुभेच्छा प्रदर्शित करण्यात आली होती

हिटलरच्या जागतिक महायुद्धामुळ जर्मनीच नाव जगभर झाल आहे युरोपातील या अग्रेसर देशाच्या एका भागाकडून (पूर्व जर्मनी व पश्चिम जर्मनी अशी दोन राष्ट्रे युद्धानतर अस्तित्वात आली आहेत) माझ्यासारख्या एका पत्रकाराला दौऱ्याच निमत्रण आलेल पाहून मला मूठभर मास चढल विमानात न बसताच हवेत तरगू लागलो माग एकदा कधीतरी स्वप्नात आपण परदेशात गेलो आहोत असा भास झाला होता 'मनी वसे ते स्वप्नी दिसे असही असण्याची शक्यता आहे परदेशवारीच्या त्या स्वप्नात मी असा काही मशगुल होऊन गेलो होतो की कुछ पूछो मत! पण तेवढयात सौ न 'काय हो, डाराडूर काय झोपता, उन्ह आलीत बघा वर!' अस सागून माझा स्वप्न भग केला होता त्यावेळी मी अकारण हळहळलो होतो परतु आता तेच स्वप्न खर होण्याच्या दृष्टिपथात होत कदाचित माझ ते स्वप्न पहाटेच्या सुमारास पडलेल असल्यान साकार होऊ घातल असाव कारण पहाटे पडलेली स्वप्न खरी होतात अस म्हणतात

तो जाडजूड लखोटा प्रथम कुणाच्या नजरेस येणार नाही अशी दक्षता बाळगून खिशात कोंबला हो, न जाणो कुणी पाहिला तर काय घ्या? मला आलेल जर्मनीच्या दौऱ्याच निमत्रण मधल्यामध्ये कुणी तरी पळवल तर?

मनात ठरवलं की, प्रथम घरी जाऊन हे शुभ वर्तमान सौ ला कळविलेलं बरं म्हणजे आपला नवरा अगदीच कुचकामी (किंवा कामातून गेलेला) आहे अशी बायकांची आपल्या नवऱ्याविषयी जी सर्वसाधारण समजूत असते तशी निदान माझ्या बायकोची स्वत च्या नवऱ्याबद्दल होऊ नये घरी जाऊन दौऱ्याचं निमत्रण दाखविल्यावर सौ ची कोणती प्रतिक्रिया होईल याचे मी आडाखे बांधू लागलो

'काय हो, जरा मीठ मोहरी देता का ?'

'कशाला ? माझा नवरा जर्मनीला चाललाय म्हणून तुम्ही दृष्ट काढून टाकता की काय ?'

'काय म्हणता ? आपले 'हे' जर्मनीला चाललेत ?'

'होय बाई आता मला मुळीच सवड नाही याची परदेशगमनाची तयारी करायचीय '

'अय्या ! म्हणजे आपली मज्जाच आहे '

सौ ची काय प्रतिक्रिया होईल याचा अदाज करीत घरी आलो लगेच उसत न घेता अॅटम बॉम्बचा स्फोट करून टाकला आमचं घर हादरलं आजूबाजूचे शेजारी 'काय झालं, काय झालं ?' असं विचारीत धावून आले आमच्या दौऱ्याचं वृत्त समजताच त्यानाही 'धक्का बसलेला दिसला सौ ला तर गगन ठेंगणं झालं (आधीच आमच्या सौ ताडमाडाएवढ्या उंच त्यात या दौऱ्याचं निमत्रण आलेलं पाहून हात गगनाला पोचलेले मग काय विचारता ?) मुलांनी तर 'आमचे बाबा जर्मनीला जाणार, आम्हाला काय काय गमत--जमत आणणार' असा आरडाओरडा करून घर अक्षरश: डोक्यावर घेतलं

उत्साहाची लाट ओसरताच माझे पाय जमिनीला लागले अठरा जूनला निमत्रण हाती पडलेलं अन् जर्मनीला प्रयाण करण्याची तारीख १ जुलै अवघ्या आठ दहा दिवसात सर्व काही तयारी पूर्ण करून निघायचं कसं असा मोठ्ठा प्रश्न माझ्यासमोर आ वासून उभा राहिला 'सन्याशाच्या ससाराला शेंडीपासून सुरुवात' म्हणतात तशातली माझी गत झाली जर्मनीच्या दौऱ्या-वर जायचे म्हणजे गोव्याला चक्कर घेण्याइतकं काही सोपं काम नाही उठला आपला, भरली बॅग अन गाठली लक्झरी बस पोचला गोव्याला असं

थोडच आहे पासपोर्ट काढायला हवा, युरोपातल्या थंड प्रदेशात जातोय तर एकादा गरम सूट हवा, बॅग हवी, यव हव अन त्यव हव. सगळी तयारी करायची अन त्यासाठी दिवस अगदी मोजकेच राहिलेत कस काय व्हायच आमच ? या विवचनेत पडलो

पासपोर्ट काढायला दगदग करावी लागते बरीच धावपळ करावी लागते पुष्कळ खेटे मारावे लागतात अस नुसत ऐकून माहीत होत. परन्तु प्रत्यक्षात काय कराव लागत हे कुणा लेकाला ठाऊक ! 'जावे त्याच्या वशा तेव्हा कळे' म्हणतात तेच खर परदेशवारीच्या दिव्यातून प्रत्यक्ष गेल्याखेरीज त्यासाठी काय काय यातना सहन कराव्या लागतात हे कळायच नाही पासपोर्ट मिळविण्यासाठी काय करायच असत हे माहीत नसल्यामुळे मी सरळ ओळखीचा ट्रॅव्हल एजट गाठला तो म्हणाला, 'मी सर्व काही करून देतो काळजी करू नका फक्त काम लवकर होण्याच्या दृष्टीने एकच गोष्ट करा, ती म्हणजे मी देतो त्या डुप्लिकेट फॉर्मवर सेक्रेटरिएटमधील सेक्रेटरी अगर डेप्युटी सेक्रेटरी यांची सही आणा बस्स ! तसच येताना पासपोर्ट साईजचे चार फोटो आणा दोन फोटोवर त्याची सही घ्यावी लागेल

जवळच्या एका फोटो स्टुडिओत गेलो फोटो काढून घेतले घाईघाईत काढलेले फोटो ते ते चागले कसे येणार ? 'वॉन्टेड' च्या गुन्हेगार यादीत चिकटविण्याजोगे फोटो वाटत होते तो फोटो पासपोर्टवर लावला तर कदाचित आपणास जर्मनीला जाण्यापूर्वीच अटक तर होणार नाही ना अशी सारखी भीती वाटत होती. सेक्रेटरिएटमध्ये जाऊन प्रसिद्धी खात्याचे अधिकारी श्री सामत याना भेटून कुणाची तरी सही मिळविण्याचा बेत केला होता, परतु श्री. सामत भेटले नाहीत म्हणून मुख्यमत्र्याचे पर्सनल सेक्रेटरी श्री मोहोनी याच्याकडे गेलो तेथे सुप्रसिद्ध राष्ट्रवादी मुस्लिम लेखक श्री हमीद दलवाई हे आमचे जुने दोस्त भेटले त्याच्यामुळे माझे काम चटकन झाले-श्री मोहोनीची सही घेऊन ट्रॅव्हल एजटकडे गेलो व फॉर्म त्याच्या स्वाधीन केले मला वाटल, आता माझ काम सपल, पण कसच काय अन् कसच काय. एजट म्हणाला, 'दिवस अगदी थोडे राहिलेत पासपोर्ट ऑफिसमध्ये आमच्या माणसाला निष्कारण रखडवतील कृपया, आपण पत्रकार या नात्याने पासपोर्ट अधिकाऱ्याना भेटा लगेच काम होऊन जाईल. त्यामुळे झकत मला

एजटच्या माणसाबरोबर पासपोर्ट ऑफिसमध्ये जावे लागले अर्थात मी आधी त्याची अपॉईंटमेंट घ्यायला विसरलो नाही चिठ्ठी पाठवली व लगेच मला बोलावण आल 'केव्हा पासपोर्ट हवाय ?' असे अधिकाऱ्याने विचारल. मी चाचरत चाचरत २५ जूनच्या आत मिळाला तर बर होईल अस सागितल त्यावर त्याने २३ लाच घेऊन जा अस सागितल पत्रकार असल्यान येथे आपली डाळ लवकर शिजली हे माझ्या ध्यानात यायला विलब लागला नाही त्याने सागितलेल्या दिवशी आमचा माणूस पासपोर्ट घेऊन येईल आता आपण मुळीच फिकीर करू नका अस एजटने मोठा आव आणून सागितल मी पासपोर्टसाठी पधरा रुपये भरले फक्त पुन्हा त्या कचेरीत जाऊन पासपोर्ट आणण्याच काम तेवढ ट्रॅव्हल एजटान केल व त्या कामगिरी-बद्दल एकूण ५० रुपये कमिशन माझ्याकडून वसूल केल काय करणार ? ट्रॅव्हल एजटच्या तावडीत सापडलो होतो ना. मग तो भूर्दंड द्यावाच लागला

पासपोर्ट हाती येताच फोर्ट मार्केटमधील म्युनिसिपल दवाखान्यात जाऊन देवी, कॉलरा व टायफॉईड साथप्रतिबधक लस टोचून घ्यावी लागली प्रयाणापूर्वी आठ दिवस अगोदर टोचून घेऊन हेल्थ कार्ड पासपोर्टबरोबर न्यावच लागत आफ्रिकेत जाणार असलात तर 'यलो फिव्हर' (पिवळा ताप) ची लस की इजेक्शन टोचून घ्याव लागत एकाच वेळी दोन तीन लस टोचून घेतल्यामुळ जबरदस्त प्रतिक्रिया झाली अग गरम झाल. ताप आल्या-सारखा वाटू लागला आजारी पडून आमची जर्मन यात्रा रद्द तर होत नाही ना अशी काळजी वाटायला लागली

परदेशात जाणार असल्याच वृत्त समजताच मित्रमडळी, नातेवाईक घरी येऊन भेटून जाऊ लागली कुणी चहाला तरी आमच्या घरी येऊन जा अशी गळ घालू लागले, तर कुणी परदेश प्रवासात घ्यावयाच्या खबरदारीसबधी उपदेशाचे ज्ञानामृत पाजू लागले आमच्या घरात त्यावेळी अनेकाना डोळ्याची साथ आली होती आमची परदेश यात्रा कुणाच्या डोळ्यात भरून मलाच ऐनवेळी 'डोळे' आले तर योगायोगाने जुळून आलेला हा कपिला-षष्ठीचा सुवर्णकाचनाचा योग हातचा जाणार नाही ना अशी शका भेड-सावू लागली पूर्वी पढरपूरच्या यात्रेला जाण्यास निघालेल्या वारकऱ्याला निरोप देण्यासाठी गावातील भाविक मडळी त्याच्या पाया पडायला येऊन

जायची त्याचीच सुधारून वाढविलेली आवृत्ती युरोपच्या प्रवासाला जाणार अन् तोही विमानातून हल्ली विमानाचे अपघात वारंवार घडल्याचं ऐकू येत हा गृहस्थ जर्मनीला जातोय खरा, पण सुखरूप परत येईल ना ? त्यापेक्षा आपण त्याला एकदा बघून तरी येऊ या या भावनेन लोक येत असावेत देवळात येताना भेट म्हणून फूल ना एखाद फळ देवाला नेण्याची प्रथा आहे तशीच ही मंडळी मला भेटायला येताना काही ना काही वस्तू भेटीदाखल घेऊन यायची कुणी बटन आणली तर कुणी टाय आणले माणस भेटायला यायला लागली की माझा जीव गलबलायला लागायचा जणू मी चंद्रावर जाण्यास निघालेला अंतराळवीरच असल्यासारखा भास व्हायचा

माझ्याजवळ टेरिलीनचा सूट शिवलेला होता कधी तरी लग्नसमारंभात त्याची घडी मोडण्याचा चान्स यायचा जर्मनीला जाणार म्हणून आणखी एकादा गरम टेरिवूलचा सूट शिवायला टाकला रेमण्डचे कापड घेण्यासाठी माझा एक जानी दोस्त श्री बाबू सज्जागिरी आला होता त्याच्या मदतीन कापड घेऊन त्याच्याच टेलरकडे सूट शिवायला टाकला दोन दिवसात ट्रायलला या अस शिंपीदादान सांगितल ठरलेल्या वेळी गेलो, पण कापडाला कात्रीच लागलेली नव्हती वीजप्रवाह बंद पडल्यामुळ कारखान्यात काम होऊ शकल नाही, सबब उद्या या नक्की ट्रायलला कपडे ठेवतो अस शिंपी-दादानी आवर्जून सांगितल 'सोनार, शिंपी, कुळकर्णी, अप्पा याची संगत धरू नको रे बाप्पा' अशी म्हण आहे ती उचित आहे 'अहो, मला रविवारी जर्मनीला जायचंय, नक्की सूट द्याल ना ?' अस मी चिंताग्रस्त चेहऱ्यान विचारल त्यावर शिंपीदादा म्हणाला, 'डोंट वरी तुम्हाला वेळेवर सूट देऊ'

जर्मनीत कडाक्याची थंडी असते अस ऐकल्यामुळे आमच्या सौ न लोकरीचा स्वेटर विणायला घेतला होता परंतु, घरच काम सभाळून तो स्वेटर मी जर्मनीहून परत येईपर्यंतसुद्धा पुरा होण्याची शाश्वती दिसत नसल्यामुळे तिन तो कुणाकडे तरी पुरा करायला टाकला त्या बाईन रात्रीचा दिवस अन् दिवसाची रात्र करून स्वेटर कसाबसा जन्माला घातला संपूर्ण बाह्याचा तो स्वेटर जर्मनीत वापरावा अशी सौ ची प्रामाणिक इच्छा होती परतु, त्याचे हात इतके काही तोकडे झाले होते की, मुलाचा स्वेटर घेऊन आलात का अस विचारतील या भीतीने मी तो जर्मनीतील मुक्कामात

चुकून बाहेर लोकास दिसेल असा वापरलाच नाही फक्त झोपताना अंगावर चढविण्याकरताच त्याचा उपयोग केला

हा हा म्हणता आठ दिवस कसे भुर्रकन् निघून गेले हे मला समजलसुद्धा नाही धाईधाईत सर्व तयारी करावी लागली सूट वेळेवर मिळाला पण बुटाशिवाय सूट कसा काय वापरायचा ? म्हणून बाटाचे कोरे बूट घेतले आदल्या दिवशी पायाना सराव व्हावा म्हणून घालून बघितले, पण नेमके ते पायाना चावले. एकच बुटाचा जोड घेऊन गेलो अन बुटानी दगा दिला तर पचाईत व्हायची म्हणून घरातली माझी जुनीपुराणी बुटाची जोडी धूळ झटकून बाहेर काढली बुटाना लेसच नव्हती मोठा मुलगा धावत गेला अन् लेस घेऊन आला सौ न बुटाकडे निरखून बघितले त्याना टाचाच नव्हत्या कुणाला तरी पिटाळल अन् टाचा लावून आणल्या टाय बाधायचा कसा हे तरी कुणाला माहीत होते ? जो मित्र टाय घेऊन आला होता त्याच्याकडून टाय बाधण्याचे जुजबी ज्ञान करून घेतले

परदेशात जाताना वाटखर्चाला पैसे नेण्याचा प्रश्नच आता उरला नाही एअर इडिया प्रत्येक उतारूला शभर डॉलर्स देत अस मला कुणी तरी सांगितले होत, परतु प्रत्यक्षात मला ते शभर डॉलर्स नेता आले नाहीत कारण माझ मुबई ते बर्लिन (व्हाया बैरूत) विमान तिकीट एकेरी होत एअर इडियाचा असा नियम आहे की, रिटर्न (परतीच) तिकीट हाती असल्याखेरीज शभर डॉलर्स नेता येत नाहीत मी काही बर्लिनला जाऊन कायमचा तेथे थोडाच राहणार होतो पूर्व जर्मन सरकारची पद्धत अशी की, ते प्रथम एकेरी तिकीट पाठवितात व बर्लिनला पोचल्यावर परतीच तिकीट देतात मी जर्मन कौन्सलच पत्र घेऊन आलो त्यात पाहुण्याना बर्लिनला पोचल्यावर परत प्रवासाच तिकीट अवश्य देऊ, तरी त्याना शभर डॉलर्स मिळावेत अशी एअर इडियाला विनती करण्यात आली होती परतु, त्या रदबदलीचा काहीएक उपयोग झाला नाही मला जवळजवळ निष्काचन स्थितीत परदेश प्रवासाला निघाव लागल (प्रत्येक विमान उतारूला आठ डॉलर्स विमानतळावर मिळतात तेवढीच पुजी बरोबर नेता आली )

मी एअर इडियाच्या काळ्या घोड्याजवळील बुकीग ऑफिसमध्ये जाऊन माझ बर्लिनच तिकीट ताब्यात घेतल माझ तिकीट मुबई-बैरूत-बर्लिन अस

होत पूर्व जर्मन सरकारची 'इंटरफ्लूग' नावाची विमान वाहतूक कंपनी आहे या कंपनीच्या विमानांना भारतात येण्याची अद्याप मुभा मिळालेली नाही बैरुतपर्यंत त्याच विमान येत मी एअर इंडियाच्या विमानान बैरुतपर्यंत जाव एक दिवस बैरुत शहरात मुक्काम करावा व दुसऱ्या दिवशी 'इंटरफ्लूग' च्या विमानान बर्लिनला प्रयाण कराव असा बेत होता परंतु एअर इंडियाचे विमान आदल्या दिवशी बैरुतला जात नसल्याने एअर इंडियावाल्यांनी मला मुंबई-प्राग-बर्लिन अस तिकीट दिल व प्रागमार्गे बर्लिनला जाव अस सुचविल मी तिकीट घेऊन घरी आलो तथापी, एअर इंडियाने तिकीट पाठविणाऱ्याला टेलेक्स मॅसेज पाठवून ही नवीन व्यवस्था मंजूर आहे की नाही याची विचारणा केली होती व त्याच कन्फर्मेशन आल्यावर कळवू अस मला सांगून ठेवल मी सध्याकाळी पुन्हा एअर इंडियाच्या कचेरीत चक्कर मारली तेव्हा कन्फर्मेशन मिळत नाही उताऱूला बैरुतमार्गेच पाठवा कारण 'इंटरफ्लूग' च्या विमानात त्याची सीट रिझर्व्ह आहे असा उलटा निरोप आला असल्याच मला सांगण्यात आल मला १ जुलैला बैरुत येथे 'इन्टरफ्लूग' गाठायचे होत तो शुक्रवार होता, पण गुरुवारी एअर इंडियाचे विमान बैरुतला जात नव्हत त्याच जम्बो जेट बुधवारी रात्री निघणार होत मी बुधवारच्या जम्बोन बैरुतला गेलो असतो तर मला दोन दिवस मुक्काम करावा लागला असता विमान कंपनीच्या कायद्यानुसार प्रवासात वाटेत (Transit) मुक्काम करावा लागला तर चोवीस तासाचा हॉटेलखर्च कंपनी करते त्यापेक्षा अधिक मुक्काम करावा लागला तर तो उताऱून पदरमोड करून करावा. माझ्याजवळ तर दमडी देखील नव्हती (आठ डॉलर होते पण ते चटणीसारखे फस्त झाले असते) त्यामुळ एअर इण्डियासमोर पेच पडला शेवटी त्यांनी तोडगा शोधून काढला गुरुवारी सकाळी बी ओ ए सी कंपनीचे जेट विमान बैरुतमार्गे लंडनला जाणार होत या विमानान गेलो असता माझी अडचण दूर होणार होती कारण बैरुतला एकच दिवस मुक्काम करायला मिळत होता शेवटी एअर इंडियाने तिकीट बदलून बी ओ ए सी ने बैरुतपर्यंत प्रवास करण्याचा मार्ग सुचविला ते तिकीट घेऊन मी बी ओ सी च्या कचेरीत गेलो तेथे दुसऱ्या दिवशी निघणाऱ्या त्यांच्या विमानात सीट नक्की करून घेतली विमान सकाळी ८-१५ वाजता सुटणार होत. त्याकरिता सकाळी सातच्या आत विमानतळावर हजर राहा अस मला सांगण्यात आल

त्या दिवसात मुंबईत टॅक्सी संप चालू होता अन् नेमकी सर्व विमान कंपन्यांनी उतारूंना सांताक्रुज विमानतळावर आपल्या कोचमधून नेऊन पोचविण्याची व्यवस्था १ जुलैपासून बंद केली होती त्याऐवजी एस टी ने विमानतळापर्यंत उतारूंची ने-आण करण्यासाठी सर्व्हिस सुरू केली होती. ही एस टी ची बस पहाटे ४—३० वाजता ताजमहाल हॉटेलवरून निघते व वाटेत थांबत थांबत साडेपाच वाजेपर्यंन्त विमानतळावर पोचते प्रत्येक उतारूकडून ७॥ रुपये आकार घेतला जातो.

पहाटे विमानतळावर जायचं कसं ? असा मोठा प्रश्न पडला एकटाच जाणारा असतो तर एस टी कोच पकडून जाऊ शकलो असतो परंतु मला निरोप देण्यासाठी सौ मुलांसह विमानतळावर येणार होत्या म्हणजे निराळी व्यवस्था करणं आलंच प्रत्येक उतारू आपलं घरचं लटांबर घेऊन कोचमध्ये चढायला लागला तर दुसऱ्याच दिवशी एस टी वर कोच सर्व्हिस बंद करायची पाळी यायची

सकाळी ७ वाजता विमानतळावर पोचायला निदान सहा-सव्वासहा वाजता घरून निघायला हवं तेवढ्यात शेजारी फोन आला बी ओ ए सी च्या कचेरीतून निरोप आला की, आपलं विमान सकाळी ८—१५ वाजता सुटण्याऐवजी सकाळी ६—१५ वाजता सुटणार आहे कृपया ५—३० वाजण्याच्या आत विमानतळावर हजर व्हा पुन्हा आता आली पंचाईत ?

सकाळी ५—३० वाजता पोचायचं म्हणजे निदान ४—३० च्या नंतर घरून निघायलाच हवं प्रयाणाच्या आदल्या दिवशी शेजारी-पाजारी, मित्रमंडळी, नातेवाईक एका पाठोपाठ एक येऊन प्रवास सुखाचा जावो असा निरोप देऊ लागले मीच उत्सवमूर्ती असल्यानं मला प्रत्येकाजवळ बसून बोलत रहावं लागलं सौ ची तर गेले आठ दहा दिवस सारखी धावपळ चालूच होती शेवटच्या दिवशीसुद्धा हे घेतलं का, ते आणलं का असं विचारीत होती पाहुणे जाताच बॅग भरायला घेतली सगळी तयारी आटोपेपर्यंत बारा वाजले जेमतेम दोन तीन तास झोप घेऊन तीन साडेतीनला उठलो आमचे शेजारी श्री महाजन हेच आमच्या मदतीला धावून आले. त्यांची स्वतःची गाडी गॅरेजमध्ये दुरुस्तीला टाकली असल्यानं त्यांनी त्यांच गॅरेजवाल्याला फोन करून पहाटे चार वाजता ड्रायव्हरसह गाडी मागविली आम्ही उठण्यापूर्वीच गाडी हजर श्री. महाजन

यांनी घाई केल्यामुळे आम्ही तासाभरात प्रात विधी, आंघोळ वगैरे सर्व काही आटोपून विमानतळाच्या दिशेने निघालो

सारी मुंबापुरी शांत साखरझोपेत होती माझी मात्र झोप उडाली होती विमानान प्रवास करायचा म्हणजे पोटात भीतीचा गोळा उठला होता भीषण विमान अपघात आठवू लागले आपल्या विमानाला अपघात झाला तर काय होईल, अशी हुरहुर नकळत मनात घर करून राहिली सांताक्रूझ विमानतळ आला सामानाचं वजन केलं ते वीस किलोहून कमीच भरलं नंतर आठ डॉलर ताब्यात घेतले मी महाजन यांच्या आग्रहावरून आयु-ष्याचा विमा उतरविला आदल्या दिवशी ट्रॅव्हेल एजंट म्हणत होता की, चाळीस ते पंचेचाळीस रुपये भरावे लागतील विमान प्रवास करणाऱ्यांनी विमा उतरविलेला बरा असतो समजा यदाकदाचित तुमचं बरवाईट झालं (माझ्या तोंडावरच हा गृहस्थ बिनदिक्कतपणं अशुभ बोलतो हरामखोर लेकाचा) तर आपल्या पश्चात् कुटुंबियांना एकदम ६० हजार रुपये मिळतील त्याच्या या स्पष्टवक्तेपणाची मला इतकी काही चीड आली होती की, त्या एजंटचं कमिशन चुकतं करून पसार झालो व पुन्हा त्याच्याकडे गेलोच नाही परंतु, विमानतळावर मला महाजनांची भीड मोडवेना एकूण ६३ रुपये भरून विमा उतरविला. मनात म्हटलं की, हा शेवटी विमानात चढता चढता नवा भूर्दंड एवढं सारं काही होईतो पावणेसहा वाजून गेले कस्टम एन्क्लोजरमध्ये एकदा तुम्ही शिरलात की तुमचा पोचवायला आलेल्या मण्डळीशी संबंध तुटतो माईकवरून बैरुत, लंडनला जाणाऱ्या उतारूंनी आत शिरावे अशा सूचना देण्यात येत होत्या परंतु, मी घरच्या माणसांशी बोलतच राहिलो उर भरून आला होता पावलं जड झाली होती परंतु चेहऱ्यावर उसने हास्याचे अवसान आणून सर्वांचा निरोप घेतला कस्टमच्या एन्क्लोजरमध्ये शिरलो तिकडचे सारे सोपस्कार पूर्ण होताच विमानाच्या दिशेनं निघालो विमानाच्या शिडीवर पाऊल ठेवण्यापूर्वी मागं वळून पाहिलं सौ, दोन्ही मुलगे हात हलवून निरोप देत होते मी त्यांना हात हलविला तो हात हलविण्याचा एवढाच उद्देश की आता विमानात पाऊल टाकल्याशिवाय अन्य गत्यंतर नाही विमान प्रवास टाळणं काही माझ्या हातात उरलं नाही

दरवाजात एका भारतीय हवाई सुदरीन सुहास्य वदनान स्वागत केल त्या स्वागतान मनावरच दडपण किंचित कमी झाल्यासारख वाटल बसमध्ये शिरल्यावर आपली नजर प्रथम खिडकीकडे जाते खिडकीजवळची जागा पकडण्यात निराळा आनद असतो विमानातसुद्धा मी खिडकीजवळची जागा गाठली थोड्या वेळान विमानाची घरघर सुरू झाली हवाई सुदरीन माईक-वरून सेफ्टी बेल्ट बाधण्याचा इशारा दिला बेल्ट करकचून बाधला हो न जाणो विमानाला आचके बसले अन् मी खाली पडलो तर ?

विमान उच्च आकाशात पोचल्यावर बेल्ट सोडण्याचा इशारा देण्यात आला. मी शक्य तो खिडकीतून बाहेर बघण्याच टाळत होतो चहूबाजूनी निळ आकाश कापूस पिंजल्याप्रमाण इतस्तत विखुरलेले पाढरे ढग काय बघायच त्यात ? खाली तर समुद्रच समुद्र भीती वाटायची बुवा या विमानात एक भारतीय हवाई सुदरी व दोन ब्रिटिश सुदऱ्या होत्या श्वास कोंडला, नीट प्राणवायुचा पुरवठा होत नाही अस वाटल तर काय करायच याच प्रात्यक्षिक एका सुदरीन करून दाखविल प्रत्येक उतारूच्या सीटवर नळकांडी ठेवलेली असते. इमर्जन्सीमध्ये या नळकाडीच्या सहाय्याने प्राणवायुचा पुरवठा चालू ठेवायचा अशा सूचना देण्यात आल्या ते प्रात्यक्षिक पाहूनच माझा श्वास कोंडल्या-सारखा झाला त्या नळकाडीचा उपयोग करू या का असा बालिश विचार मनात येऊन गेला, पण इतर उतारू हसतील या भीतीन गप्पच बसलो झाल एक सुदरी सकाळचे पेपर्स देऊन गेली पेपर चाळले कुठ विमान अपघाताची बातमी दिसते का बघितली, पण ती दिसली नाही तेव्हा जरा हायस वाटल

थोड्या वेळान एक सुदरी एका प्लेटमध्ये पाढऱ्या रुमालाची घडी ठेवून गेली. मी खिशात हात घालून बघितला सौ न ठेवलेली कोऱ्या रुमालाची घडी खिशात होती मला प्रथम वाटल की, प्रत्येक उतारूला रुमाल वाटले असतील कुणी घरून रुमाल आणायला विसरला असेल तर त्याची पचाईत व्हायला नको मी ती रुमालाची घडी उचलली तेव्हा ओडीकोलनचा उग्र वास नाकात शिरला मी आजूबाजूच्या उतारूकडे पाहिले सर्वजण त्या ओलसर रुमालाने तोंड पुसून घेत होते मी पण त्याचे अनुकरण केले अगदी फ्रेश वाटल

समोरून विन्स्टन चर्चिलसारखा दिसणारा बुलडॉग चेहरेपट्टीचा इंग्रजसाहेब दिसला त्याच्या नेतृत्वाखाली हवाई सुदऱ्यानी उतारूना ब्रेकफास्ट देण्यास सुरुवात केली ऑर्केस्ट्रा कन्डक्ट करणाऱ्या संगीत निर्देशकाचा आव त्याने आणला होता फक्त त्याच्या हातात काठी नव्हती गरमागरम कॉफी, ऑम्लेट, ब्रेड-बटर व एकादे फळ पोटात रिचविल्यावर तरतरी आली कारण सकाळी घरून चहाचा एक कप घेऊन निघालो होतो दीड दोन तासानी आबादान (इराण) च्या विमानतळावर विमान थोडा वेळासाठी थांबले या ठिकाणी पाच दहा मिनिटे मुक्काम करून विमान बैरुतला जाणार होते आबादान हा विमानतळ इराणचे तेल परदेशास नेण्यासाठी प्रामुख्याने वापरात आणला जातो या तेलप्रदेशात स्थानिक अशांतता असल्याकारणान उतारूना पाय मोकळे करण्यासाठी विमानतळावर उतरण्याची परवानगी नव्हती पाच दहा मिनिटासाठी पाय मोकळे करायला बाहेर पडण्याची कुणालाच हौस दिसली नाही परंतु, पुढ धुळीचे वादळ सरकत असल्याचा धोक्याचा इशारा मिळाल्याने विमान दोन तास आबादनला विमानतळावर ठिय्या ठोकून बसणार होत

माईकवरून घोषणा करण्यात आली की, वाळवटातील धुळीच वादळ दृष्टिआड होईस्तो विमान आबादान विमानतळावरच बैठा 'सत्याग्रह' करील झाल, आता तुरुगात कोंडून ठेवल्याप्रमाण विमानातल्या विमानातच पाय मोकळे करण आल कारण आबादानची हवा खरोखरीच आबादी आबाद आहे किंवा काय याची पाहाणी करण्याचा मोका हुकला होता उतारूनी विमानातच आराम करावा त्याच्यासाठी खास बियर पाजण्याची व्यवस्था करण्यात आली आहे असा दिलासा देण्यात आला

उतारूची चुळबुळ सुरू झाली मला ते दृश्य पाहून घाटात चाक पक्चर झाल्यान बद पडणाऱ्या एस टी ची आठवण झाली विमानाचा प्रवास काय, बसचा प्रवास काय सगळे सारखेच तापदायक सरळ घेऊन जातील तर शपथ

इतका वेळ जीव मुठीत घेऊन बसलो होतो आता किंचित् ताण सैल झाला. कोट काढून सीटवर ठेवला (कारण इतर उतारूनी तेच केल होत ) आबादान हे इराणचे रखरखीत वाळवट असल्यान बाहेर वातावरण रखरखीत होत. विमानाच्या बाथरूममध्ये जाऊन आलो बर वाटल आता इतका वेळ

कसा काय काढायचा ? समोरच्या सीटवर वयस्क गृहस्थ बसले होते माझ्या-सारखेच ते पण जागा न सोडता बसून होते चेहरा भारतीय होता जवळ जाऊन चौकशी केली ते मुंबईच्या शहा कस्ट्रक्शनचे मॅनेजिंग डायरेक्टर श्री शहा होते मुंबईचा माणूस भेटल्यान मरगळ चटकन् नाहीशी झाली. श्री शहा कामानिमित्त लंडनला चालले होते प्रथम इंग्रजीतून व मागाहून चक्क मराठीतून आम्ही गप्पागोष्टी केल्या श्री शहा यानी कामानिमित्त हजारदा परदेश वाऱ्या केल्या होत्या त्यामुळ त्याना विमान प्रवासाच काहीच अप्रूप वाटत नव्हत

श्री शहा यानी परदेश प्रवासात घाबरण्याच मुळीच कारण नाही असा धीर दिला ते बैरूतला पाय मोकळे करण्यासाठी थोडा वेळ उतरणार होते अन् मला बैरूतलाच मुक्कामाला राहायच होत बैरूत आल्यावर मला पुढ कस काय करायच याबद्दल श्री शहा यांनी मला मार्गदर्शन केल

दोन तासानतर आमच्या विमानान आबादान सोडल धुळीच वादळ साफ नाहीस झाल होत एव्हाना माझ्या मनातील वादळही शात झाल होत आता बैरूतला एकट्यान व्यवहार करण्याची हिंमत माझ्यात निश्चितपण निर्माण झाली आहे अस मला वाटत होत

सव्वा बाराच्या सुमारास आमच्या विमानान बैरूत गाठल खिडकीतून बाहेरच दृश्य पहात असताना आपणास चुकून झोप लागली अन् आपण बैरूतच्या ऐवजी थेट लंडनला जाऊन पोचलो तर काय घ्या म्हणून मी त्या भारतीय हवाई सुदरीला बैरुत आल्यावर मला सागा बर का अस बजावून ठेवल होत त्याप्रमाण बैरुत येताच सुदरी हसत हसत माझ्याजवळ आली व वरच्या खणात ठेवलेली माझी ब्रीफकेस काढून माझ्या हाती दिली मी थँक्स म्हणून बॅग उचलली व श्री शहा याच्यासमवेत बैरुत विमानतळावर पाय ठेवला एक बस विमानाजवळ तयार होती तीत उभे राहून आम्ही मुख्य इमारतीकडे निघालो सगळीकडे लालबुद अरब कर्मचारी दिसत होते विमानतळाच्या मुख्य इमारतीजवळ पोचताच श्री शहा यानी हात हलवून मला निरोप दिला ते एका दरवाजान आत शिरले व मी दुसऱ्या दरवाजान प्रवेश केला

दरवाजात हेल्थकार्ड, पासपोर्ट वगैरेची तपासणी झाली विमानातील

माझी बॅग तेवढी यायची वाट पाहात होतो काऊंटरवर चौकशी केली कुणालाच इंग्रजी समजेना त्याच अरबी मला समजेना शेवटी कस्टमच्या एका अधिकाऱ्याला गाठल त्याला इंग्रजी समजत होत हे माझ नशीब त्यान मला सामानाची चौकशी करण्यासाठी बी ओ ए सी च्या कचेरीत जाण्यास सांगितल तेथे जाऊन चौकशी केली थोडचा वेळान बॅग आली माझ्याबरोबर एक सीलोनी विद्यार्थी होता त्याच नाव मागाहून मला समजल जयसिंगे तो उच्च शिक्षणासाठी इंग्लडला चालला होता वाटेत बैरूतला एक दिवस मुक्काम करून तो ॲमस्टरडॅमला जाणार होता तेथे हॉल्ट घेऊन नतर लंडनला जाणार होता तोसुद्धा माझ्यासारखाच प्रथमच सीलोन सोडून परदेशात जात होता व त्याला काहीच माहिती नव्हती त्यान माझ्याकडे मदत मागितली आधळचान लगडचाकडे मदत मागण्याचाच प्रकार तथापि, मी वयान त्याच्यापेक्षा किनीतरी मोठा असल्यान त्याला धीर दिला त्याच सामान आल्यावर आम्ही बाहेर जायला निघालो दरवाजात कस्टमच्या अधिकाऱ्यान अडविल हातातील ब्रीफकेस उघडून दाखवायला लावली परदेशात पाहुण्यानी ओळखीच्या लोकाना भेटीदाखल वस्तू देण्याचा रिवाज असतो म्हणून बरोबर सॅडल वुडच्या की चेन, प्लॅस्टिकचे बटन वगैरे काही वस्तू मौ न घेऊन माझ्या ब्रीफकेसमध्ये टाकल्या होत्या त्यापैकी एक की चेन उचलली व अरबी भाषेत हे काय म्हणून विचारल मी सांगितलं की सुव्हेनीर म्हणून घेतल्या आहेत त्यावर तो अरब अधिकारी डोळे मिचकावून एक आपणास आठवण म्हणून घेऊ का अस विचारू लागला त्याला नाही कस म्हणायच ? 'घे बाबा' अस सांगितल्यावर तो खूष झाला त्यान एक की चेन स्वतःला काढून घेतली व मला जाऊ दिल

आम्ही दोघेजण बी ओ सी च्या हमालाबरोबर स्टॅण्डवर आलो थोडचा वेळान कपनीची टॅक्सी आली त्यात बसून आम्ही कपनीच्या ठरलेल्या बैरूत इटरनॅशनल हॉटेलवर गेलो समुद्र किनाऱ्यावरील एका टेकडीवरील ते एक आलिशान हॉटेल आहे हमालाला काय टॅक्सीला काय आम्हाला काहीच द्याव लागल नाही

परमुलखात असल्यान आम्ही दोघांनी स्वतत्र खोली न घेता जोड खोलीत आम्ही दोघे उतरलो खोलीत अद्यावत् सोय होती कपडे बदलले

बॉश घेतला अन् जेवायला हॉटेलच्या मेन हॉलमध्ये गेलो तळमजल्यावर भुयारातला तो हॉल पाहून अलिबाबाच्या गुफेची आठवण झाली बैरूत हे हाँगकाँगसारखे आंतरराष्ट्रीय केंद्र असल्यान हॉटेलमधल्या वेटरना इंग्रजी चांगलच समजत होत जयसिंगे हा तरुण खाण्याच्या बाबतीत मोठा चोखदळ वाटला त्याने आमच्या दोघासाठी खास अरबी डिशेश मागविल्या जेवणानतर फलाहार झाला काळी कॉफी घेऊन हॉटेलच्या खोलीवर येऊन ताणून दिल

खोली प्रशस्त होती खिडकीतून समुद्राच दर्शन घडत होत आम्ही थोडा वेळ विश्रांती घेतली नतर कपडे बदलून बैरूत शहर पाहण्यासाठी निघालो

बैरूत ही लॅबानॉन या अरब देशाची राजधानी मध्य पूर्वेतील उन्हाळचा-तील सुटीचे दिवस मजेत घालविण्याच्या दृष्टीने हे उत्तम स्थळ या शहराचे खास वैशिष्टच असे की, समुद्र किनारा व डोंगराळ मुलुख अशा दोन्ही ठिकाणी मजेत वेळ घालविण्याची सोय आहे लॅबानॉन देशाचे क्षेत्रफळ ४००० चौरस मैल आहे युरोपातील असंख्य पर्यटक या देशात उन्हाळ्याची सुटी घालविण्यासाठी येतात या शहरात स्मग्लींग (चोरटा व्यापार) मोठ्या प्रमाणावर चालतो पर्यटकाच्या वाढत्या संख्येमुळे बैरुत हे अत्याधुनिक शहर बनले आहे मोठमोठ्या इमारती आहेत प्रशस्त सडका आहेत

आम्ही दोघे एकटेच संध्याकाळच्या वेळी बैरुत शहरात भटकलो हॉटे-लच्या जवळपास सगळी पॉश वस्ती होती आम्हाला तर गरीब अरबाची वस्ती पहायची होती त्यामुळे आम्ही भटकत शहराच्या अतर्गत वस्तीत गेलो तेथे आम्हाला अरबाच्या राहाणीच दर्शन घडल छोटी छोटी बैठी घर पायघोळ झगे घातलेले वृद्ध अरब, आधुनिक वेषातील फ्रॉकवाल्या अरबी तरुणी दिसल्या मुस्लिम देश असून कुठच बुरखेवाली स्त्री आढळली नाही पाश्चात्य संस्कृतीचा बराच प्रभाव पडलेला दिसला

आम्ही बैरुत भटकून पालथ घातल काही दुकानात जाऊन आलो जयसिंगेन आठवणीदाखल काही वस्तू विकत घेतल्या माझ्याजवळ जेमतेम आठ डॉलर होते त्यामुळ जर्मनीला पोचण्यापूर्वी वाटेत त्याना हात लाव-ण्याची मला इच्छा झाली नाही मी काहीच खरेदी केल नाही अरबी कलाकुसरीच्या छान छान वस्तू होत्या घ्याव्याशा वाटत होत्या पण घेना येत नव्हत्या


काळोख पडण्यापूर्वी आम्ही हॉटेलवर परतलो जाताना मी खाणा-खुणा लक्षात ठेवल्या होत्या त्याच्या साहाय्यान मी परत येऊ शकलो रस्ता चुकला तर पचाईत व्हायची कारण त्या अरबी शहरात आमचा निभाव लागला नसता

रात्री झक्कपैकी डिनर घेतल सगळ काही रॉयल काम होत बैरुतमध्ये आमच्या नात्यापैकी श्री वागळे नावाचा फ्लाईट इंजिनियर एअर इंडियात होता त्याला कॉंटॅक्ट करण्यासाठी एअर इंडियाच्या ऑफिसमध्ये फोन लावला तेथून त्याच्या फ्लॅटचा नबर मिळविला परतु श्री वागळे फ्लाईटवर गेले होते व रात्री परत येणार होते त्याना निरोप ठेवला होता त्याप्रमाण रात्री साडे-दहाच्या सुमारास फोन आला दुसऱ्या दिवशी सिनेमा थिएटर 'हम राझ' या ठिकाणी भेटण्याच ठरल

दुसऱ्या दिवशी आम्ही टॅक्सीन 'हमराझ' वर गेलो तेथे श्री वागळे आले आम्ही मग त्याच्याबरोबर पुन्हा एकदा बैरुत भटकलो वाटाड्या बरोबर असल्यान त्यानी बैरुतची प्रेक्षणीय स्थळे दाखविली बैरुतमध्ये फ्लोरा फाऊटन प्रमाण हुतात्मा चौक आहे चौकात हुतात्म्याच्या स्मारकाप्रित्यर्थ पुतळे आहेत श्री वागळे यांनी आम्हाला बैरुतच्या 'क्रॉफर्ड' मार्केटमध्ये हिडवल. तेथेसुद्धा चोरबाजार आहे रस्त्याबर 'सस्ता' माल विकणारे, आरोळ्या ठोकणारे विक्रेते आहेत

बैरुतचा बीच सुदर आहे समुद्रकाठी स्नान करण्यासाठी तोबा गर्दी असते. श्री वागळे यानी आम्हाला एका टुमदार अरबी हॉटेलात नेल तेथे लच दिला खास अरबी मुर्गी खायला घातली लॅबानीज फळ खाल्ली नतर आम्ही त्याच्या फ्लॅटवर जाऊन आलो नतर त्याचा निरोप घेऊन हॉटेलवर परतलो परतण्यापूर्वी बैरुतमधील इटरफ्लूगच्या विमान कचेरीत जाऊन दुपारी केव्हा मला नेण्यासाठी गाडी पाठविता हे विचारायला विसरलो नाही तेथे मला साडे तीन वाजता तयार राहण्यास सागण्यात आल

हॉटेलमध्ये येऊन कपडे बॅगेत भरले व बॅग घेऊन खाली लाऊजमध्ये थाबलो. श्री जयसिंगे याचा निरोप घेताना बाईट बाटल दिल्लीहून आलेल्या शिष्ट-मडळातील इतर पत्रकार माझ्याप्रमाण आधल्या दिवशी बैरुतला आले होते परतु ते मला विमानतळावर भेटणार होते पावणे चारच्या सुमारास एक



ड्रेज्डन येथील नॅशनल आर्ट गॅलरीशेजारी भारतीय पत्रकारांचे घेतलेले छायाचित्र
छायाचित्रात उजवीकडून दुसरे श्री बोरकर.



पूर्व जर्मनीमध्ये युद्धोत्तर काळात कृषि-उद्योगाचे मोठ्या प्रमाणावर यांत्रिकीकरण करण्यात आले आहे

व्हॅन आली परंतु, कंडक्टर हॉटेलमध्ये आला पण मला न घेता चालायला लागला. मला शंका आली मी हॉटेल मॅनेजरला सांगितलं त्यान ओरडून व्हॅन थांबविली व मला त्यात बसविल थोडक्यात चुकामूक झाली असती तर घोटाळा झाला असता त्या व्हॅनमध्येच शिष्टमंडळातील सहपत्रकारांची भेट झाली श्री रामचद्रन् (यु एन आय, दिल्ली), श्री सरकार (अमृत बझार पत्रिका व हिंदुस्थान स्टॅण्डर्ड), श्री रोमेश चदर (हिंद समाचार, जालंदर) असे तिघे पत्रकार श्री. हसन (पेट्रिएट, दिल्लीचे मॉस्कोतील प्रतिनिधी) परस्पर मॉस्कोहून बर्लिनला येणार होते

आम्ही बैरुतच्या विमानतळावर आलो इटरफ्लूगच्या विमानात जाण्यापूर्वी प्रवाशाच्या यादी चेक करताना माझ नाव यादीत आढळत नाही अस अरब मुलीन सागितल मी गडबडलो ही आणखी काय भानगड बुवा ? बर्लिनला न जाता बैरुतलाच अडकून पडतो की काय ? तेवढ्यात माझा नवा मित्र रोमेश मदतीला धावला त्यान यादीतून माझ नाव हुडकून काढून अधिकाऱ्याना दाखविले तेव्हा कुठ ओ के म्हणून मला पुढे जाण्याची परवानगी मिळाली

आम्ही इटरफ्लूग विमानान बैरुत सोडल बी ओ ए सी च्या विमानापेक्षा हे विमान छोट वाटल परंतु प्रवास छान झाला हजारो मैल उच अतरावरून उड्डाण करताना गरम ब्लॅकेट पांघरायला देण्यात आली तसेच गरम पायमोजे देण्यात आले जर्मन हवाई सुदऱ्या जरा गभीर वाटल्या चेहऱ्यावर छापील हसू दिसत नव्हत पण कामात मात्र तत्पर होत्या

रात्री दहाच्या सुमारास बर्लिन विमानतळावर येऊन पोचलो नुकताच पाऊस पडून गेला होता हवेत कमालीचा गारठा होता अशा निवात वेळी मी जर्मन भूमीवर पाय ठेवला गरम सूट अगात असूनसुद्धा थडी जाणवत होती विमानतळाच्या मुख्य इमारतीत सर्व सोपस्कार आटोपून बाहेर आलो तेथे आमच्या स्वागतासाठी जर्मन परराष्ट्र खात्याचा अधिकारी श्री हेनरीक व दुभाषी बाई मिसेस रेईन्के उपस्थित होत्या त्यानी आमच सामान ताब्यात घेऊन मोटारीत नेऊन बसविल तेथून आम्ही बर्लिन शहरात प्रवेश केला रात्र असल्यामुळे रस्त्यावर रहदारी नव्हती

काही वेळान हॉटेल स्टाड बर्लिन नावाच्या ३९ मजली गगनचुबी इमार-

तीत आलो हे नवीन हॉटेल आहे खोल्याच्या किल्ल्या मिळवून आमच सामान जाग्यावर ठेवीपर्यंत बारा वाजले नतर आम्ही तळमजल्यावरील लॉऊंजमध्ये थोड बहुत खाऊन घेतल गरम गरम कॉफी ढोसली दुसऱ्या दिवसा-पासून आमच्या दौऱ्याला प्रारभ होणार होता मिसेस रेईन्केनी आम्हाला आमच्या दौऱ्याचा कार्यक्रम दिला व दुसऱ्या दिवशी सकाळी ब्रेकफास्टला याच ठिकाणी भेटण्याबद्दल सागून निरोप दिला

माझ्या वाट्याला २२ व्या मजल्यावरली खोली आली होती सुदैवान श्री सरकार याना माझ्या शेजारीच खोली मिळाली होती काही अडचण येताच मी त्यांच्या खोलीचा दरवाजा ठोठावीत असे बर्लिनमधील एकट्यान एका स्वतत्र खोलीत झोपण्याची ही पहिलीच रात्र होती शरीर थकल होत कधी झोप लागली हे समजल देखील नाही

४ ४ ४

हा बर्लिनमधील पहिला दिवस हॉटेल स्टाड बर्लिन या अलिशान प्रचंड इमारतीतील चोवीसाव्या मजल्यावर एक प्रशस्त ऐसपैस, अद्यावत सुखसोयींनी सुसज्ज अशी स्वतंत्र खोली माझ्या वाटयाला आली होती सकाळी न्याहरी घेऊन आम्हाला बर्लिन सोडायचं असल्याने रात्री ऑटोमॅटिक अलार्म लावून ठेवला होता खोलीत रेडिओ, घड्याळ, सर्व काही होतं बाथरूममध्ये आंघोळीसाठी टबसुद्धा होता. रात्री झोपायला बारा वाजले असल्याने लवकर उठायला होणार नाही असं वाटलं होतं परंतु पहाटे साडेतीनच्या सुमारास धडपडून जागा झालो आपल्याकडे सकाळी सातच्या सुमारास जेवढा उजेड असतो तसा उजेड खोलीत शिरला होता मी घड्याळात बघितलं घेटयानं चक्क ताणून दिलं होतं ते बारा वाजता जे झोपी गेलं ते पुन्हा जागंच झालं नव्हतं मी खिडकीकडे जाऊन बाहेर डोकावून पाहिलं मोठ्या टॉवरमध्ये घड्याळात साडेतीन वाजले होते

मी भराभर सर्व व्यवहार उरकून घेण्यास सुरुवात केली टबमध्ये गरम व थंड अशा दोन प्रकारच्या पाण्यासाठी तोटया आहेत शॉवर बाथमधून थोडं थंड व थोडं गरम मिश्र पाणी येण्यासाठी दोन्ही तोटयांचे कान पिरगळावे लागतात बर्लिनमध्ये जुलै-ऑगस्ट हा समर सीझन म्हणजे सर्वात आल्हाददायक हंगाम आपल्याकडे जशा एप्रिल–मे महिन्यात मोठ्या सुटया पडतात, लोक बाहेरगावी जातात त्याप्रमाणे जर्मनीत शाळा-कॉलेजना सुटया पडल्या होत्या लोक ट्रिप काढण्याच्या मूडमध्ये दिसत होते या सीझनमध्ये थंडी फारशी नसते दिवसभर उन्हाचं दर्शन होतं

मी शॉवरबाथची आंघोळ घेण्यासाठी टबमध्ये उतरलो नाही म्हटलं तरी आपल्यासारख्या भारतीयांना सकाळची थंड हवा अगास झोंबणारी वाटण

स्वाभाविक होत दोन्ही तोट्या चालू केल्या थंड पाण्याच्या फवाऱ्यान अंग शहारल लगेच गरम पाण्याची तोटी जोरात फिरवली पाण्यान अंग भाजून निघाल पटकन दोन्ही तोट्या बंद करून टबमध्ये प्रवेश करायची भीतीच वाटायला लागली दोन्ही तोट्या समप्रमाणात फिरवल्या अन् कशीबशी आंघोळ उरकून बाहेर पडलो युरोपमध्ये रोज आंघोळ करणारे महाभाग क्वचित सापडतील जुम्मे के जुम्मे आंघोळ करायची येथील लोकांची सवय आम्ही भारतीय मात्र पृथ्वीच्या पाठीवर कुठही गेलो तरी एक वेळ खाल्ल्या प्यायल्याशिवाय राहू, पण आंघोळीशिवाय आमच पाऊल पुढ पडणार नाही

सर्व व्यवहार पार पडले तरी सहा वाजेनात सातच्या सुमारास बेड टी पाठविण्याची व्यवस्था करण्यात आली असल्याच आम्हाला मिसेस रेईन्कीने सांगितल होत चहाची मार्गप्रतीक्षा करीत रेडिओवरील न समजणारी पाश्चात्य संगीताची धून ऐकत बसलो बर्लिन शहर कधीच जाग झाल होत खिडकीतून लोकांची तुरळक रहदारी दिसत होती आमच्या हॉटेलसमोरच ट्युब रेल्वेच स्टेशन होत लोक लगबगीन येत अन् त्या भुयारात गडप होताना दिसत अवाढव्य बर्लिनचा विस्तार दिसत होता

दरवाजावर टकटक आवाज झाला मी दरवाजा उघडला, 'गुटर मॉर्गेन' अस एका गौरकाय ललनेने सुहास्य वदनान स्वागत केल जर्मन भाषेत 'गूटेर मॉर्गेन' म्हणतात अस समजल मी मात्र 'गुड मॉर्निंग म्हणून मोकळा झालो. नपेक्षा आम्ही जर्मन 'गुड मॉर्निंग म्हणायला जाऊ अन् त्याचा भलताच उच्चार व्हायचा तर मग काय घ्या ?

काळ्या रंगाचा आखूड फ्रॉक घातलेली ती तरुणी लालबुंद होती (इकडचे सर्व जर्मन लालबुंदच असतात म्हणा सफरचंदासारखे कचाकचा खावेत ) ती टेबलावर चहाचा सरंजाम ठेवून निघून गेली

एका किटलीत चहा, साखरेच्या क्युबच पाकीट अन् एका बशीत इडलिंबू-सारख्या जाडजूड लिंबाची फोड दुधाचा कुठ पत्ताच दिसत नव्हता म्हणजे ? दुधाशिवाय चहा प्यायचा ? चौकशीअंती जर्मन मंडळी चहात दूध न घालता लिंबू पिळून चहा घेतात अस समजल लिंबाची फोड पिळून मी चहाचा कप तोंडाला लावला मात्र कोयनेलचा प्याला तोंडाला लावल्यासारख वाटल

नाक दाबून कडू औषध घशात ढकलतात तसा मी तो चहाचा कप जेमतेम संपविला एक नवा अनुभव

आठच्या सुमारास तळमजल्यावर ब्रेकफास्टसाठी लिफ्टपायी दहा मिनिटे गेली लिफ्ट स्वयचलित कुठेच लिफ्टमन नसतो आपण बटन दाबायचा अन् हव तेथे जायच मध्ये कुठ अडकून पडलात तर घाबरायच कारण नाही एका कोपऱ्यात टेलिफोन रिसिव्हर उचलायचा अन् नऊ नवरवर कळवायच लगेच आपल्या सुटकेची व्यवस्था केली जाते मी शक्य तो एकटा लिफ्टमधून जायला घाबरायचो ही मध्येच कुठ अडकून पडलो तर !

जर्मनीत सर्व हॉटेलमध्ये वेटरच काम स्त्रियाच करतात अर्थात वेटरच्या कामाबद्दल त्याना मेहतानासुद्धा बराच मिळतो साडेपाचशे मार्क कमीत कमी मिळतात आम्ही जाऊन प्रथम दोन टेबल अडविली ऑमलेटची ऑर्डर दिली नतर प्रत्येकजण जवळच्या एका टेबलाकडे गेलो या टेबलावर निर-निराळे तयार खाद्य पदार्थ माडून ठेवले होते प्रत्येकाने एक प्लेट उचलायची. ब्रेड, बटर, चीज, मध मार्मलेड (जॅम), सॉसेज, फळ हव ते उचलून घ्यायच. त्या टेबलावर आपण काय घेता हे बघायला कुणीच नव्हत इतकेच नव्हे तर वाटेल तो ज्युस घेऊन यायच पुन्हा आपल्या टेबलावर बसून खायच ब्रेक-फास्ट झाल्यावर कॉफी घ्यायची कॉफीत कुणी दूध घालीत नाही आम्ही आपले दूध मागवून कॉफीत घालीत असू ब्रेकफास्ट भरपेट झाल्यावर वेटर येऊन आपण काय काय घेतल अस हळूच गिऱ्हाईकाला विचारणार अन् गिऱ्हाईकाच्या शब्दावर पूर्ण विश्वास ठेवून बिल करणार आपल्या देशात वेटरना 'टीप' थाळीत ठेवण्याची पद्धत आहे गिऱ्हाईक राजेसाहेबाच्या थाटात थाळीत सुट दहा पैशाच नाण ठेवून ऐटीत उठणार मागाहून वेटरन ते उचलून खिशात टाकायच जर्मनीत अशी प्रथा नाही, थाळीत 'टीप' ठेवून गेलात तर तेथील वेटर तिकडे ढुकून देखील बघणार नाही इतकच नव्हे तर तो आपला अपमान समजून ते नाण फेकून द्यायला कमी करणार नाहीत आपणास टीप द्यायचीच असेल (टीप देण्याची मुळीच सक्ती नसते काही जण देतात तर काही देत नाहीत ) तर जेवढी रक्कम द्यायची तेवढी रक्कम बिलात समाविष्ट करून घ्यायची म्हणजे वेटर बिल घेऊन जाताना आपली टीप काढून घेते व बाकीची रक्कम काऊंटरवर भरते.

या वेटर मुलींवर देखरेख ठेवण्यासाठी प्रमुख अधिकारी असतो तो देखील एकादी बाईच गिऱ्हाईकाच मनाच समाधान झाल नाही अस आढळल तर तो प्रमुख अधिकारी जातीन लक्ष घालतो वेटरना फैलावर घेतो गिऱ्हाई-काची क्षमा मागतो व त्याच्या मनाच समाधान होईल अशी व्यवस्था तावडतोब करतो

आपल्या देशात प्रत्येकान उचलून खाद्यपदार्थ घ्यायचे व शेवटी वेटरला प्रामाणिकपणे काय काय खाल्ल ते सागायची पद्धत सुरू केली तर मोठा अनवस्था प्रसग निर्माण होण्याची भीती अशा हॉटेलच एका दिवसात पार दिवाळ निघायच

दोन गाड्या आमच्या तैनातीला देण्यात आल्या होत्या एका गाडीत आम्ही तिघे पत्रकार व दुभाषी मिसेस रेईन्की आणि दुसऱ्या गाडीत दोन पत्रकार व परराष्ट्र खात्याचा अधिकारी श्री. हेन्रीक अशा लवाजम्यात आमच्या खाशा स्वाऱ्या नऊच्या सुमारास ड्रेस्डनच्या दिशेन निघाल्या

एल्ब नदीच्या विशाल खोऱ्यात एकूण २७ शहर व गाव मिळून फक्त विस्तृत टापू आहे सुमारे ७ लक्ष ७० हजार लोकवस्तीच्या या विभागाच मुख्य ठिकाण म्हणजे ड्रेस्डन पूर्व जर्मनीतील हे तिसरे मोठ शहर ते एक प्रमुख सांस्कृतिक केंद्र आहे औद्योगिक क्षेत्र आहे नैसर्गिक सौंदर्य-स्थान आहे

आमच्या दोन्ही गाड्याचे ड्रायव्हर उत्तम सारथी होते ते पूर्वी पोलिस खात्यात होते मागाहून त्यानी परराष्ट्रखात्यात ड्रायव्हरच्या नोकऱ्या धरल्या दोन्ही ड्रायव्हर अगदी झकपक पोषाखात होते कुणी सागितल तरी ते ड्रायव्हर आहेत हे खर वाटणार नाही (नाही तर आपल्याकडील ड्रायव्हर कानाला विडी, मेचकट ओंगळ खाकी कपडे, तोंडाला दारुची घाण व अच-कट विचकट शिव्या असा अवतार) दोघही तरुण व विनोदी स्वभावाचे होते.

त्यानी गाड्या भरधाव सोडल्या शहरातील रस्ते सपून आमच्या गाड्या 'ऑटोबाहन (राष्ट्रीय हमरस्ते) वर धावू लागल्या जर्मनीत राजवट डावी असली तरी ड्रायव्हिग लेफ्टहँड नसून राईटहँड आहे वाटेत कुठेच जाहिरातीचे फलक लावलेले दिसले नाहीत फक्त दुतर्फा झाडी बहुधा 'पाईन ट्री' ची (पाईन वृक्ष) झाडे अधूनमधून पुलावरील कमानीत काही राष्ट्रीय फलक

रगवलेले आढळले वाटेत रस्त्याच्या कडेला कार पार्क करून सहलीला निघालेली कुटुंब विश्रांती घेताना दिसली तासभर चालल्यावर वाटेत एका ठिकाणी पुष्कळ गाड्या थांबलेल्या आढळल्या आम्हीसुद्धा तेथे थोडा वेळ थांबलो थंड पेय घेतलं ताजेतवाने झालो आम्ही ज्या हॉटेलात पेय घेत होतो त्या हॉटेलात एक परदेशी हिप्पी आपल्या 'सी थ्रू द ब्लाऊझ' (पारदर्शक) व हॉट पँटस (अगदी आखूड) घातलेल्या 'पाखरा'सह शिरला त्याना बसायला कुठंच मोकळी जागा मिळेना त्यानी एक राऊंड घेतला आम्हा भारतीयाना हे पहायला जरा विचित्र वाटत हे खर परंतु हॉटेलात बसलेल्या सर्वच जर्मन मंडळीनासुद्धा ते विचित्र वाटल असाव कारण बहुतेक सर्वांच्या नजरा त्या विचित्र युगुलाच्या पदन्यासाकडे खिळून राहिलेल्या दिसल्या पूर्व जर्मनीत कम्युनिस्ट राजवट असली तरी नीतीमत्तेच्या बाबतीत ते भारतीयाप्रमाणच 'कन्झर्व्हेटिव्ह' (सोवळे) वाटले त्याच्याकडेही हिप्पीची साथ आली होती तरुण जर्मन पोरं भली लांबलचक 'आयाळ' वाढवून रस्त्यात चित्रविचित्र पोषाख घालून हिंडू लागली जर्मन सरकारच्या पोलिसांची त्यांच्याकडे वक्रदृष्टी वळली त्यानी 'राऊण्डप' करून सर्वांना फरासखान्यात नेल न्हाव्याला आणून त्याची 'आयाळ' उतरविली 'काम करा बेकार हिंडू नका' अशी दमदाटी देऊन आठ दिवसांनी सोडून दिल या दक्षतेमुळे पूर्व जर्मनीत हिप्पीची साथ फार काळ टिकू शकली नाही

दुपारी साडेबाराच्या सुमारास आम्ही ड्रेस्डन शहरात आलो हे शहर बर्लिन एवढं भव्य नसल तरी मोठ्या शहराच्या तोडीचं शहर. हिटलरच्या महायुद्धात ड्रेस्डन शहराला भयानक बाँब हल्ल्याना तोंड द्याव लागल शहरातील ऐतिहासिक वास्तू नष्ट झाल्या हजारो लोक मृत्युमुखी पडले. आता या शहराचा कायापालट झाला आहे झ्विंगर, कॅथड्रल, चर्च ऑफ द क्रॉस, सेंपर गॅलरी लँदौस, गेवानदौस वगैरे ऐतिहासिक इमारती पूर्वीच्या पद्धतीन पुन्हा बांधण्यात आल्या आहेत

अशाच एका ऐतिहासिक वास्तूत 'गेवानदौस' आम्ही मुक्काम ठोकला. या इमारतीत आता मॉडर्न हॉटेल आहे इमारतीची रचना जुन्या धाटणीची असली तरी आत सुखसोयी अद्यावत स्वरूपाच्या आहेत (आम्ही सोयीसाठी त्याला 'गोवर्धनदास' असं नाव ठेवलं होतं)

दुसऱ्या दिवशी आम्ही ड्रेस्डनमधील प्रेक्षणीय स्थळ पाहायला निघालो 'गेवानदौस' पासून जवळच नॅशनल आर्ट गॅलरी आहे कला व सांस्कृतिक वारसा यासाठी ड्रेस्डनची जगभर ख्याती आहे महायुद्धात या गॅलरीतील दुर्मिळ चित्रकृतींना धोका निर्माण झाला होता परंतु, जर्मनीची हिटलरच्या राक्षसी मगरमिठीतून मुक्तता करणाऱ्या रशियन सेनेतील कलाप्रेमी लोकांनी हा अमोल ठेवा जतन करून ठेवला, रशियात नेऊन चित्रकृतींची दुरुस्ती केली व सुमारे १५ लक्ष चित्रकृतींचा खजीना जर्मन जनतेच्या स्वाधीन केला

आर्ट गॅलरीला नाममात्र प्रवेश तिकीट आहे २० पेनिग (एका मार्कला शंभर पेनिग म्हणजे आपल्याकडील २० पैसे) देऊन तिकीट घ्याव लागत

गॅलरीत बरीच गर्दी होती भव्य तैलचित्रं पाहून डोळ्यांचं पारणं फिटलं सुटीचा दिवस असल्यान प्रेक्षकांची संख्या वाढली होती गॅलरीतील चित्रकृतींची पार्श्वभूमी समजावून सांगण्यासाठी निवेदक ठेवण्यात आले आहेत. निवेदक पंधरा वीस प्रेक्षकांचा गट करून त्यांना प्रत्येक चित्राची माहिती देत होता आम्हाला तेवढा वेळ नसल्यान आम्ही निरनिराळ्या दालनात हिंडलो आमच्या दुभाषीकडून आम्हाला उडती व जुजबी माहिती मिळत होती तेवढीच आम्हाला पुरेशी होती चित्रकृती पाहायला आलेले प्रेक्षक 'प्रेक्षणीय नमुने' म्हणून अचंब्यान आमच्याकडे पाहात होते आमच्यात त्यांना 'प्रेक्षणीय' असं काय आढळलं असाव याचाच मी विचार करीत होतो जर्मनीत कुणीही मिशी ठेवीत नाहीत आमच्यापैकी एका-दोघांना (त्यात मी आहे) मिशा असल्यानं त्यांना त्याच कुतूहल वाटत अस कळल्यावर आम्ही मिशीला पीळ दिला बहुतेक चित्रं बायबलमधील दंतकथांवर आधारलेली होती

आर्ट गॅलरीला पाहून झाल्यावर आम्ही जर्मन चित्रकाराच्या कलाकृतींच म्युझियम पाहायला गेलो या म्युझियममध्ये कित्येक शतकापूर्वी (१७०५) केवळ कल्पनेन तयार केलेला दिल्ली दरबारचा देखावा पाहावयास मिळाला मेलकीयर डिंग्लीजर नावाच्या प्रसिद्ध कलाकारान तो हुबेहुब रंगवला होता हत्ती, मोगलकालीन शिल्पाचे नमुने वगैरे अप्रतिम कलाकुसरीन तयार केले होते

म्युझियममधील एका छोट्याशा काफेत पेय घेतले बियर घेण्याचा आग्रह

झाला मी ॲपल म्युसवर भागवल दोन दालनामध्ये एका चिंचोळ्या जागेतील ती टुमदार काफे मजेशीर वाटली म्युझियममध्येच प्रेक्षकांसाठी ही उत्तम सोय आहे

थिएटरप्लाझा हा ड्रेस्डन शहरातील प्रमुख चौकापैकी एक आहे ड्रेस्डन हे रंगभूमीचे केंद्र आहे या शहरात चार नाटक कंपन्या अस्तित्वात आहेत 'ऑपेर्नहौस' (ऑपेरा हाऊस)ची फेरबांधणी करण्यात येत आहे

एल्ब नदीच्या काठी 'इटालियन व्हिलेज नावाचे रेस्टॉरंट आहे पूर्वी इटालियन घरबांधकाम कामगार कॅथलिक कोर्ट चर्चची इमारत बांधण्यासाठी ड्रेस्डनमध्ये वस्तीला होते त्याची आठवण म्हणून याला हे नाव देण्यात आले आहे

चर्च ऑफ अवर लेडी ही प्रॉटेस्टंट चर्चची इमारत म्हणजे ड्रेस्डनचे प्रतीक मानले जात असे परंतु, महायुद्धातील बॉम्बहल्ल्यात ती चर्च इमारत जमीन-दोस्त झाली महायुद्धातील नष्ट झालेल्या बहुतेक सर्व चर्चच्या इमारती पूर्ववत् बांधून काढण्यात आल्या तथापी, ही इमारत तेवढी उध्वस्त स्थितीतच स्मारक म्हणून जतन करून ठेवण्यात आली आहे

दुपारी जेवण घेण्यासाठी म्हणून आम्हाला ड्रेस्डनपासून ३६ किलोमीटर अंतरावर असलेल्या बस्तेई या उंच टेकडीवरील थंड हवेच्या ठिकाणी हॉटेलात नेण्यात आल (बस्तेई हे समुद्र पातळीपासून ३०५ मीटर उंच आहे) या ठिकाणाहून एल्ब नदीच्या खोऱ्यातील निसर्गरम्य प्रदेश पाहता येतो या ठिकाणी ३ हजार मोटारी उभ्या करण्याची सोय आहे बस्तेई हा टेकडीचा एक सुळका आहे या ठिकाणी अनेक युवक गिर्यारोहणाचे प्रात्यक्षिक धडे घेतात खालून एल्ब शांतपणे वाहात आहे बाजूच्या काठान आगगाडी जात आहे नदीच्या पात्रातून पर्यटकांनी भरलेली बोट संथपणे मार्ग आक्रमित आहे नयनरम्य वनश्री, हिरवेगार जंगल असं हे दृश्य पाहात पाहात आम्ही मजेत जेवण घेतल

संध्याकाळी चारच्या सुमारास सॅम्सन स्वीत्झर्लंडच्या मध्यभागी असलेल्या बाद सॅन्दाव येथे आलो हे सुद्धा एक ड्रेस्डनच्या परिसरातील थंड हवेच ठिकाण आहे स्पा या शब्दाचा अर्थ झरा या ठिकाणच्या झऱ्याच पाणी प्रकृती या दृष्टीने उपयुक्त असल्यान लोक येथे मुद्दाम राहायला येतात टुमदार गाव आहे गावात हिंडलो दुकानात चक्कर मारली. नंतर वाटेत येताना कोनिग-

स्टेइनचा किल्ला पाहिला हा किल्ला एकेकाळी अजिंक्य म्हणून प्रसिद्ध होता
रात्री ड्रेस्डनपासून अनेक किलोमिटर दूर असलेल्या इतिहासप्रसिद्ध मोरित्झबर्ग या हंटिंग लॉजमध्ये जाऊन जेवण घेतल सॅक्सनीचे राजेलोकांचे ते शिकारीगृह होते दाट जगलात बाधलेल्या त्या लॉजमध्ये आमलेटमध्ये तळलेली अळवी (कुत्र्याच्या छत्र्या) व वाईल्ड बोअरच (रानडुक्कर) मटन खाल्ल या लॉजमध्ये एक खास खोली आहे त्याच नाव प्रिन्सेस रूम त्या रूममध्ये चक्कर टाकली ही खोली म्हणे पूर्वी खास राजकुमाराची राखीव खोली होती पूर्वीच्या राजे लोकाच्या शिकारीचे अनेक किस्से ऐकले नतर गेवानदोस हॉटेलात परतलो

दुसऱ्या दिवशी आम्ही हॉएरस्वर्डर या गावी निघालो सकाळी प्रयाण करण्यापूर्वी अवचित धनलाभ झाला पाहुण्यांना वाटखर्चासाठी म्हणून प्रत्येकी शभर शभर मार्कसच पाकीट देण्यात आल म्हटल, बर झाल दौरा आटोपून निघतेवेळी जर्मनीतील काही वस्तु आठवणीदाखल नेता येतील. शिवाय खिशात जर्मन चलनाची किंचित उब सुखदायक वाटत होती प्रथम त्या बाईन दोन पाकीट म्हणजे दोनशे मार्कस मला दिले मला वाटल, प्रत्येकाला तेवढे दिले असतील परतु, मागाहून मिसेस रेईन्कीन 'बॉरकार 'ला 'सॉरकार ' समजून दोन पाकीट दिली असल्याच समजल तेव्हा मी चुकून मला मिळालेले शभर मार्कस परत केले बाईना हुश्य झाल तिने परत परत 'डान्केन श्योन ' (थँक्यू) केल जर्मनीत हरघडी 'डान्केन श्योन ' किंवा नुसतच 'डान्केन ' म्हणण्याची लोकाना सवय पडली आहे तसच नीट समजल किंवा दॅटस राईट अशा अर्थाने 'याह्या याह्या अस जर्मन भाषेत म्हणण्याची प्रथा आहे (हे 'याह्या ' पाकिस्तानने कुणीच नव्हेत बर का )

आमचा पधरवड्याचा सपूर्ण कार्यक्रम आधीच आखला होता व ठरल्याप्रमाण आम्ही निरनिराळ्या ठिकाणी भेटी देत होतो हॉएरस्वर्डरला पोचताच आम्ही तेथील हॉस्पिटलला भेट दिली हॉएरस्वर्डरच हॉस्पिटल प्रशस्त व भव्य होते दरवाजात हॉस्पिटलचे डीन व इतर वडया अधिकाऱ्यानी आमच हार्दिक स्वागत केल डीनसाहेबाच्या अभ्यासिकेत कॉफीपानाचा कार्यक्रम झाला हॉस्पिटलचे डायरेक्टर नोएलमार्क यानी हॉस्पिटलच्या कार्याचा व एकदर आरोग्यविषयक परिस्थितीचा परिचय करून दिला

हॉएरस्वेर्डर हे औद्योगिक केन्द्र म्हणून प्रसिद्ध आहे या ठिकाणी 'ब्लॅकपम्प' (शार्प पम्प) या नावाचे विद्युत केन्द्र आहे. ते सबंध युरोपमध्ये सर्वात मोठे आहे या केंद्रातून पुरविल्या जाणाऱ्या विजेच्या साहाय्याने अनेक उद्योगधंदे चालविण्यात येतात या औद्योगिक केन्द्रातील कामगाराच्या आरोग्याची काळजी घेण्याचे काम हे हॉस्पिटल करते कॉटबस नावाचा मोठा जिल्हा असून हॉएरस्वेर्डर हा त्याचा एक भाग आहे पूर्व जर्मनीच्या धोरणात आरोग्यविषयक सोयींना महत्त्वाचे स्थान आहे या केंद्राची लोकसंख्या ६० हजार आहे पूर्व जर्मनीतील हे दुसर समाजवादी शहर आहे

या हॉस्पिटलच्या बांधकामाला तीन वर्षे लागली १९६५ मध्ये पूर्ण झाले या हॉस्पिटलात ९६१ खाटांची सोय आहे ५० डॉक्टर काम करीत आहेत प्रत्येक पाचशे माणसामागे एक डॉक्टर अस प्रमाण आहे मेडिकल फॅकल्टी व मेडिकल स्कूल आहेत प्रत्येक वर्षी दोन हजार डॉक्टर तयार होतात खाजगी डॉक्टरांना प्रॅक्टिस करण्याची मुभा असते परंतु त्याना मेडिकल सर्व्हिसमध्ये समाविष्ट करून घेण्यात येते

डॉक्टर दोन प्रकारचे आहेत (१) सरकारी नोकरीत असलेले डॉक्टर त्याना सरकारी नियमानुसार वेतन व इतर सवलती मिळतात (२) इतर खाजगी डॉक्टर, त्याना खाजगी दवाखाने चालविण्याची मुभा असते ते सुद्धा नॅशनल इन्शुअरन्स स्कीमच्या रोग्याची तपासणी करतात खाजगी डॉक्टरना फी आकारता येते

लोकाच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी खास उपचार व्यवस्था करण्यात आलेली आहे ज्याना तातडीने उपचाराची गरज असते अशासाठी प्रत्येक केंद्रात एक डॉक्टर रात्रंदिवस उपलब्ध असतो हॉस्पिटलात एक स्पेशालिस्ट रात्रंदिवस उपलब्ध असतो ५ ते ७ किलोमीटरच्या अंतरावर केन्द्र असत या खेरीज कारखान्यात वैद्यकीय केन्द्रे असतात

हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यानी सांगितलेली माहिती ऐकून घेतली नतर आम्हाला सबंध हॉस्पिटलात हिंडवून निरनिराळे विभाग दाखविण्यात आले अंधु अगर अपंग मुलासाठी खास उपचाराची सोय आहे इतकच नव्हे तर त्याच्या शिक्षणात खंड पडू नये यासाठी उपचार चालू असताना त्याना शिकविण्याची व्यवस्था केली जाते हॉस्पिटलात उपकरणे व इतर सर्व साधन

अद्यावत आहेत आम्हाला ऑपरेशन थिएटरमध्ये नेण्यात आले त्यावेळी सर्जनप्रमाणेच आम्हाला पाढरा डगला, सफेत टोपी व होडीवजा बूट घालायला देण्यात आले आम्ही पायाचे न काढता बुटाचे पायच त्या प्रचड बुटात घातले त्या अवतारात आम्ही शेतात लावण्यासाठी तयार केलेल्या बुजगावण्यासारखे विदूषक दिसत होतो ऑपरेशन थिएटरमध्ये ऑपरेशन टेबलाचा अद्यावत लवचिकपणा पाहून थक्क झालो सर्व प्रकारची अद्यावत् शस्त्रक्रियेची हत्यार पाहिली हॉस्पिटलातील प्रत्येक पेशटच्या कॉटजवळ बटन असते बटन दाबताच शेजारच्या खोलीत नर्सच्या टेबलाजवळ दिवा पेटतो नर्स तावडतोब उठून पेशटकडे जाते व त्याला काय हव नको ते बघते (नाहीतर आपली हॉस्पिटल ! पेशन्टचे प्राण जात असले व तो कळवळून बोलावीत असला तरी नर्सेस ढुकूनदेखील बघत नाहीत )

हॉस्पिटलची इमारत सहा मजली असून आजूबाजूला प्रशस्त पटांगण आहे पूर्व जर्मनीतील हॉस्पिटल कस असत याची कल्पना आली नतर आम्ही डॉक्टर मडळीच्या समवेत एका हॉटेलमध्ये जाऊन खाना घेतला जेवण चालू असताना माझ लक्ष सहज वर खिडकीकडे गेले तेथे एक बाई आपल्या बछड्याला बाबागाडीत ठेवून जवळच्या दुकानात गेलेली दिसली अर्थात ती बाबागाडी खिडकीजवळच्या खाबाला बांधायला विसरली नाही. आम्ही जेवून बाहेर आलो फूटपाथवर बाबागाडीत ते मूल मजेत खेळत होत आई मात्र कुठच दिसत नव्हती काही वेळान ती खरेदी आटोपून आली व बाबागाडी घेऊन चालू लागली याला म्हणतात सुरक्षिततेची हमी

अरे हो, ड्रेस्डन शहर सोडण्यापूर्वी शहराच्या लॉर्ड मेयरांबरोबर आम्ही खाना घेतला हे सागायच राहूनच गेल ड्रेस्डनचे लॉर्ड मेयर वैदाऊएर यांनी पाहुण्याच्या स्वागतार्थ शहरातील आणखी एका उच टेकडीवरील हॉटेलात खाना दिला त्यावेळी त्यानी शूर भारतियाच्या वीरश्रीचा एक किस्सा सांगितला नेताजी सुभाषचद्र बोस यानी जर्मनीत आझाद हिंद सेनेची उभारणी केली तेव्हा ड्रेस्डनमध्ये ब्रिटिश लिजनमधील सुमारे तीनशे भारतीय जवान डॉ बानर्जी याच्या नेतृत्वाखाली आझाद हिंद सेनेत सामील झाले युद्धात ते लढताना धारातीर्थी पडले ड्रेस्डमध्ये त्याना मानाच स्थान आहे अशी माहिती लॉर्ड मेयरनी सागितली

४ ४ ४

हॉपरस्वेर्डरमधील मुक्काम आटोपून आम्ही सध्याकाळी आयसनहुट्टेनस्टाड या पोलाद नगरीच्या दिशेने कूच केल सध्या-काळी काळोख पडण्याच्या सुमारास आम्ही आयसनहुट्टेनस्टाडमध्ये पोचलो हॉटेल 'लुनिक' नावाच्या बड्या हॉटेलमध्ये उतरलो हे शहर शात वाटल या ठिकाणी आमचा तीन दिवस मुक्काम होणार आहे

आयसनहुट्टेनस्टाड ! बाप रे बाप ! केवढ अगडबब नाव नावाचा उच्चार करताना बोबडी वळायची या पोलाद नगरीच नाव अवजड ठेवण्यामाग तसच कारण असाव पोलाद कारखाना असलेल्या नगरीच नाव पोलादा-सारख भारी अन् अवजड असायला नको का ?

आयसनहुट्टेनस्टाड हे नव्यान वसलेल टुमदार शहर आहे आपल्याकडे भिलाई, दुर्गापूर वगैरे ठिकाणी जशी पोलाद कारखान्याला भिडून नगर निर्माण झाली आहेत तशीच पूर्व जर्मनीत कारखान्याच्या परिसरात आधुनिक धर्तीची शहर वसलेली आहेत हे त्यापैकी एक ओडर नदीवरील या एके-काळी ओसाड माळरान असलेल्या भागात पोलाद कारखाना उभारण्यात आला आहे ओडर नदीवरील स्कोन्फलीएस व फुर्स्टनबर्ग या दोन गावाच्या दरम्यान ओसाड माळरानावर सशांची वस्ती होती या भित्र्या सशाना केवळ कोल्ह्याची भीती वाटायची परतु, एक दिवस १९५० साली या ओसाड माळरानावर माणसाची नजर वळली त्यानी या ओसाड जमिनीचा कायापालट करून तेथे पोलाद कारखान्याचा पाया घातला ओसाड माळ-रानाच स्वप्न भगल अन त्या ठिकाणी मानवी स्वप्नान आकार घेण्यास प्रारभ केला आज याच जागी भव्य पोलाद कारखाना उभारला गेला आहे

आम्ही हॉटेल 'लुनिक' नावाच्या आलिशान हॉटेलात उतरलो होतो या

ठिकाणीसुद्धा आम्हाला प्रत्येकी स्वतंत्र खोली देण्यात आली होती हॉटेलमध्ये प्रत्येकाला कार्ड देण्यात येते यावर खोलीचा क्रमांक असतो खोलीची किल्ली काऊंटरवरील मुलीच्या स्वाधीन करायची असते

बाहेरून परतल्यावर क्रमांक सांगून किल्ली मागायची पुष्कळदा काऊंटर-वरील मुलींना आमचं इंग्रजी समजायचं नाही अन् त्या भलत्याच क्रमांकाच्या किल्ल्या द्यायच्या किल्ली देते-घेते वेळी 'डान्केन श्योन'चा मंत्र जपायचा निरोप घेताना 'विडरझेन' (गुड बाय) म्हणायचं असे काही निवडक रोजच्या व्यवहारापुरते जर्मन शब्द मी गाठीला मारून ठेवले होते माझ्या खोलीच्या समोर मैदान होते जवळच टाऊन हॉलची इमारत दिसत असे मी सकाळी उठल्यावर खिडकीतून बाहेरचं दृश्य पाहात असे रस्ता जवळ जवळ निर्मनुष्य तुरळक बायका सायकलवरून अगर हातात बाबागाडी घेऊन जाताना दिसायच्या उन्ह वर आली तरी वातावरणात फारसा फरक पडत नसे

हॉटेलच्या काऊंटरवर स्टॅम्पस अगर कव्हर मिळण्याची सोय असते एक साधं पोस्टकार्ड पाठवायचं झालं तर याला ५० पेनिग (म्हणजे अर्धा मार्क) खर्च येतो कार्डाला २५ पेनिग व तिकिटाला २५ पेनिग परदेशात निष्कांचन स्थितीत वावरणाऱ्या माझ्यासारख्या मुसाफिराला पोस्टातून पत्र पाठविणं म्हणजे भलतीच चैन वाटायची मार्क म्हणजे आपल्याकडील जवळ जवळ दोन रुपये चलन जपून वापरायचं ही जाणीव सतत मनात असल्यानं मी कुठंच काही विकत घेण्याच्या फंदात पडलो नाही फक्त ड्रेस्डन शहर सोडते वेळी तेथील एक आठवण म्हणून कलाकुसरीचं नक्षीकाम केलेली एक लाकडी पेटी तेवढी घेतली होती दागिन्यासाठी उपयोगात आणता येईल. या उद्देशाने सौ साठी केलेली जर्मनीतील ही माझी पहिली खरेदी

आयसनहुट्टेनस्टाड या शहरात पहिल्या दिवशी माझे सकाळचे सर्व व्यवहार आटोपल्यावर मी एकटाच शहरातून प्रभात फेरी करून आलो रस्ता चुकणार नाही अशी खबरदारी घ्यायला मी विसरलो नाही सकाळच्या वेळी प्रशस्त रस्त्याच्या फूटपाथवरून चक्कर मारायला प्रसन्न वाटत होतं हवेत चांगलाच गारठा असायचा त्यांच्या दृष्टीनं ती गुलाबी हवा कारण 'समर' (उन्हाळा) सुरू झाला होता ना ! जर्मनीत दोन प्रकारचे फूटपाथ आहेत

एक केवळ पादचाऱ्यांसाठी व दुसरा बाबागाड्या, सायकली वगैरे छोट्या वाहनांसाठी मी सकाळचा फिरत असताना एक मोटार रस्त्याच्या कडेनं सथपणं आवाज करीत जाताना दिसली मोटारीत फक्त ड्रायव्हर होता ती मोटार रस्ता साफ करून वर पाण्याचा शिडकावा मारून गेली त्यांची रस्ते सफाईची ही व्यवस्था गमतीची वाटली आपल्याकडे जशा झाडूवाल्या बाया अगर बुवा रस्ते साफ करायला येतात, थोडा कचरा काढतात अन निघून जातात असली भानगड नाही फूटपाथच्या एका कडेला काही माणसं रांगेत उभी दिसली सहज कुतुहल म्हणून जवळ जाऊन पाहिलं ताज्या भाजीपाल्याचा स्टॉल होता तो पहाटेच्या वेळी बहुतेक सर्व बायका रांगेत भाजीसाठी उभ्या होत्या स्टॉलवर एक तरुणी होती निवडक तीन चार प्रकारच्या भाज्या विकायला होत्या गडबड नाही, गोंधळ नाही, घासाघीस नाही अगर हुज्जत घालण्याची बात नाही शांतपणे एक शब्दसुद्धा न बोलता बायका भाजी घेऊन जात होत्या भाजीपाला संपला की स्टॉल बंद

सकाळची न्याहरी घेतली आमची टेबलं ठरली होती मिसेस रेईन्के प्रत्येकाला काय हवं, काय नको ते विचारून ऑर्डर द्यायची प्रथम ज्युस, मागाहून स्क्रॅम्बल्ड एग्स अगर ऑमलेट, ब्रेडबटर, चीज, मध, जाम, फळं नंतर कॉफी भरपेट ब्रेकफास्ट घेऊनच आम्ही बाहेर पडायचो वेटर मुलींचा एकजात काळा पोषाख दोन खिसे असलेले काळे फ्रॉक घालणाऱ्या मुलींचा गोरा रंग उठून दिसतो सर्वच वेटर हसऱ्या चेहऱ्याच्या, अदबीनं गिऱ्हाई-काशी बोलणाऱ्या, तत्परतेने ऑर्डर स्वीकारणाऱ्या वाटल्या


न्याहारीनंतर आम्ही मोटारीनं जवळच असलेला ‘स्टील कोम्बाईन’ (पोलाद कारखाना) बघायला गेलो प्रथम कारखान्याचे संचालक सैफेल्त यांनी आमचं दरवाजात स्वागत केलं ते आम्हाला कॉन्फरन्स हॉलमध्ये घेऊन गेले तेथे बिस्किटस, केक्स, निरनिराळ्या प्रकारची पेयं व कॉफी आमची वाटच पाहात होती त्यांचा समाचार घेता घेता संचालकांनी पोलाद कारखा-न्याच्या उत्पादनासंबंधी माहिती निवेदन केली

पूर्व जर्मनीच्या पहिल्या पंचवार्षिक योजनेत ओडर नदीच्या काठी वार्षिक ५ लक्ष टन बीडाच्या लोखंडाच्या उत्पादनाचा कारखाना स्थापन करण्याचं ठरलं त्या सुमारास पश्चिम जर्मनीत १२० ब्लास्ट फर्नेस (भट्ट्या) चालू

होत्या पूर्व जर्मनीत अवघ्या ४ भट्ट्या होत्या जर्मनीची फाळणी झाल्यावर पूर्व जर्मनीचा कच्च्या मालाचा पुरवठा तुटला देशाची अर्थव्यवस्था भक्कम पायावर उभारण्यासाठी त्याना लोखंड व पोलादाची गरज होती ओसाड माळरानातील पाईन वृक्षाचे पहिले झाड १८ ऑगस्ट १९५० रोजी तोडण्यात आल १ जानेवारी १९५१ रोजी पहिल्या ब्लास्ट फर्नेसची पायाभरणी घालण्यात आली १९ सप्टेंबर १९५१ रोजी उत्पादनाला प्रारभ झाला दुसऱ्या फर्नेसमध्ये लोखडाच प्रथम उत्पादन डिसेंबर १९५१ अखेर सुरू झाल चौथ्या फर्नेसच उत्पादन ११ नोव्हेंबर १९५२ रोजी सुरू झाल व ११ ऑगस्ट १९५४ रोजी एकूण सहाही ब्लास्ट फर्नेसमध्ये बीडाच्या लोखडाचे उत्पादन सुरू झाल इस्ट इटिग्रेटेड मेटालर्जिकल वर्क्स (सक्षिप्त इको) या कारखान्याचा थोडक्यात इतिहास असा आहे ओडर नदीच्या काठचे शेतमजूर, वुरूड, गवंडी वगैरे कामगार या कारखान्यातील पहिले कामगार बनले त्यांना कारखान्याच्या कामाच प्राथमिक शिक्षण देण्यात आल होत. परतु ब्लास्ट फर्नेस या आधुनिक यत्रसामग्रीवर काम करण्याच ज्ञान त्याना नव्हत या कामी रशियन तत्रज्ञाकडून त्याना बहुमोल साहाय्य झाल जर्मन कामगाराना रशियात नेऊन प्रशिक्षण देण्यात आल पोलडमधून कोळसा आला अशा प्रकारे बीडाच लोखड या कारखान्यात उत्पादन होऊ लागल

१९६८ साली याच कारखान्यात 'कोल्ड–रोलीग मिल' (पोलाद निर्मिती विभाग) सुरू करण्यात आला कारखान्याच्या या विस्ताराला जोडूनच आयसनहुट्टेनस्टाड या आधुनिक नगरीचा उदय झाला १९६७ पर्यंत १०,३०० नवीन गाळे तयार झाले १९७० पर्यंत या शहराची सख्या ४७ हजारावर गेली

पोलाद कारखान्याच्या इतिहासावरून जर्मन कामगारानी जिद्दीन, प्रतिकूल परिस्थितीवर मात करून हा अवाढव्य कारखाना उभारला याची कल्पना आली आता कारखान्याची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी आम्हाला नेण्यात आल पोलाद कारखान्याच्या आवारात प्रवेश करण्यापूर्वी आम्ही डोक्यावर पोलादी शिरस्त्राण चढविल सचालकानीसुद्धा अशाच प्रकारच हेल्मेट डोक्यावर चढवल होत त्या शिरस्त्राणाच वजन आमच्या डोक्यापेक्षा अधिक होत त्यामुळे डोक्यावर सामानाचा डाडगा बोजा ठेवल्याचा भास



रोस्टोक येथे दर वर्षी जुलै महिन्यात 'बाल्टिक सागर सप्ताह' साजरा केला जातो अशा वेळी लोकनृत्यासारखे अनेक सांस्कृतिक कार्यक्रम केले जातात.



बर्लिन या पूर्व जर्मनीच्या राजधानीच्या शहरातील उटर डेन लिंडेन (निंबोणीच्या झाडाखाली) मार्ग व त्या मार्गावरील त्याच नावाचे हॉटेल.

व्हायचा शिरस्त्राण चढविल्यान आम्ही आता पुरे तज्ञ दिसत होतो तेथील सर्व कामगार धष्टपुष्ट त्याना डोक्यावर पोलादी हेलमेटस म्हणजे खादी टोपी एवढी हलकीफुलकी वाटत असावी आम्हाला मात्र ती शिक्षा वाटली करणार काय ? तोंड दाबून बुक्क्याचा मार पाहुणे असल्यान काही बोलायची सोय नव्हती

संचालक महाशय आम्हाला प्रथम ब्लास्ट फर्नेस (पोलाद गाळण्याची भट्टी) दाखवायला घेऊन गेला बर, भट्टी दुरून तरी दाखवायची ? 'ती समोर दिसते ती भट्टी बर का एवढ सांगितल असत तरी पुरे होत त्यावर आम्ही हसून म्हटल असत, 'अरे वा ! हीच भट्टी का ? छान आहे' तथापी, पाहणी अशी वरवर करून पाहुण्यांना काय समजणार डोंबल ? म्हणून संचालक महाशय पाहुण्याना घेऊन जेथे भट्टी होती तेथे घेऊन गेले तो आम्हाला बहुधा भलतेच धीट समजला असावा, त्याचा हा गैरसमज दूर करण्याची सोय नव्हती आहा रे भागूबाई, भट्टी पाहायला घाबरतात काय ? अशी आमची रेवडी उडण्याची भीती होती म्हणून मुकाट्यान त्याच्या मागोमाग गेलो एका लोखंडी शिडीवरून भट्टीच्या भागात शिरलो पाहुण्यांना भट्टीच काम प्रत्यक्ष पाहायला मिळाव म्हणून भट्टी खास चालू करण्यात आली भट्टी पेटताच भडका उडाला अंगावर फुलबाजाच्या ठिणग्या उडू लागल्या एक ठिणगी तर चक्क मिसेस रेईन्केच्या पायावर उडाली त्याबरोबर बाई सात कोस दूर पळाल्या भट्टीतून रसरसणारा पोलादी रसाचा ओहोळ वाहात होता त्याच्यावरून उडी मारून आम्हाला कंट्रोल रूममध्ये प्रवेश करावा लागला जीव मुठीत घेऊन या अग्निदिव्यातून जाव लागल कंट्रोल रूममध्ये भट्टीचा एवढा आवाज होत होता की, संचालक काय बोलतात ते समजत नव्हत धड ऐकू येत नव्हत त्या रूमपर्यंत येण्याच धाडस मिसेस रेईन्के करू शकल्या नसल्यान त्याची जर्मन भाषा आमच्या डोक्यावरून जात होती जाड भिंगाच्या 'डोळ्या' च्या साहाय्यान भट्टीत पोलाद कस गाळल जात हे पाहिले कधी एकदाचे या भट्टीच्या तावडीतून आम्ही मुक्त होतो अस आम्हाला झाल होत संचालक मात्र अगदी रंगात येऊन भट्टीच वर्णन करत होता पदोपदी आम्हाला दुभाषी लागतोच, तोंडात बटाटेवडा कोंबून बोलल्यावर जसा घोगरा आवाज येतो तशी त्याची जर्मन भाषा वाटते

अखेर भट्टीपासून आम्हाला सुट्टी मिळाली मग आम्ही सुटकेचा नि श्वास सोडला दुपारची वेळ झाल्यामुळे प्रथम आमचा मोर्चा कामगाराच्या कॅन्टीन-कडे वळविण्यात आला कारखान्यातील कामगार आहार कुठ व काय काय घेतात हे प्रत्यक्ष पाहाता याव यासाठी आमचा दुपारचा भोजनाचा कार्यक्रम तेथेच आयोजित करण्यात आला होता

कॅन्टीनचा हॉल चागलाच ऐसपैस होता दोन दोन टेबलात भरपूर अतर होत येथ सेल्फ सर्व्हिसच प्रस्थ आहे प्रत्येकान आपापली थाळी घेऊन यायच अन् टेबलावर बसून खायच जेवणावर पाणी प्यायची कुणालाच सवय नाही इकडच पाणी पिण्याच्या लायकीच नसत अस सागण्यात आल—आपल्या-कडे लोकाना जेवणावर पहिला घास घेताच पाणी लागन पाणी नसेल तर लोकांना जेवण जाणार नाही परतु, जर्मन लोक पाण्याचा थबसुद्धा घेत नाहीत ते पाण्याऐवजी बिअर घेतात कॅन्टीनमध्ये मात्र बिअर दिली जात नाही

जेवणात उकडलेले बटाटे, मास व कच्चा भाजीपाला एवढेच पदार्थ होते 'स्वीट डीश' म्हणून चॉकलेटपासून बनविलेला कसला तरी पदार्थ होता आमच्या पक्तीला जर्मन कामगार होते पाहुण्यांसाठी खास बेत करता आला नाही म्हणून कॅंटीन मॅनेजर हळहळला आम्ही म्हटल की, आपल नेहमीच जेवण कस असत हेच आम्हाला बघायच होत आमचा हेतू सफल झाला आहे

कामगाराच्या समवेत जेवण घेताना आमचे फोटो काढण्यात आले सचा-लक महाशयानीसुद्धा आमच्या बरोबरच जेवण घेतल कॅन्टीनमधून बाहेर पडताना दरवाजाच्या कडेला एक मशीन दिसल—आपल्याकडे वजन करायची मशीन्स असतात त्याच प्रकारच ते मशीन होत कुतुहल म्हणून चौकशी केली स्वीट ड्रिक्सच ते मशीन होत दोन रगाची पेय असतात वीस पेनिगचे नाण टाकायच अन् हव्या त्या रगाच बटन दाबायच मशीन चालू होऊन प्लॅस्टिकचा ग्लास टपकन बाहेर येतो व बाजून रासबेरीसारख गोड पेय त्या ग्लासात ओतल जात ग्लास भरताच पेय पडण्याच थाबत आपण ग्लास उचलून पेय प्यायच व रिकामा ग्लास जवळच्या पिपात फेकायचा. आम्ही हॅमबिअर प्यायलो (प्रथम त्या नावात बिअर हा शब्द

पाहून मी घ्यायला कांकू करीत होतो तथापि, ती बिअर नसून तो केवळ फळाचा रस आहे असं समजल्यावर पेय तोंडाला लावलं) आम्ही सर्वांनीच पेय घेतलं तेवढ्यात एक वयस्क कामगार आला त्यानही पेय घेतलं. त्यानं ग्लास फेकून न देता फरशावर ठवलं व त्याच्यावर जोरानं पाय दिला त्याबरोबर मोठा आवाज झाला पाहुण्याना कश खूष केलं अशा समाधानान तो हसला आम्ही त्याला हसून प्रतिसाद दिला

नंतर आम्हाला पोलादी पत्रे बनविण्याच्या कारखान्या दुसऱ्या विभागात नेलं हा विभाग अफाट व अजस्त्र आहे या ठिकाणी पोलादाचे पत्रे तयार केले जातात डोक्यावर पोलादी शिरस्त्राण असलं तरी एकादा लोखंडी पत्रा डोक्यावर पडला तर कधी कपाळमोक्ष होईल याचा नेम सांगवत नव्हता काम चालू असताना चालक महाशय निःशंकपणे वावरत होते आम्हाला मात्र भीती वाटत होती ' जर्मन कारखान्यात भारतीय पत्रकाराचा अपघाती मृत्यु ' अशी बातमी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होण्याची पाळी तर येणार नाही ना अशी मनात धाकधूक वाटत होती

एके ठिकाणी प्रचंड पात्र्याच्या पिंपात पोलादाचा रस धगधगत होता त्याच्या जवळून जाताना जीव अर्धमेला झाला- कारण तेथील वातावरणसुद्धा चांगलंच तप्त होतं उष्णतामान ७५ डिग्रीवर होतं त्या ' गरमागरम ' वातावरणातून जाताना ब्रह्मांड आठवलं मध्येच तो थांबून काहीतरी सांगायचा आमच्यापैकी एकादा दीडशहाणा पत्रकार (सर्वच पत्रकार असेच असतात असा सर्वसामान्य जनतेचा अनुभव) मध्येच सर्वांना थांबवून शंका विचारायचा मग आली पंचाईत ? कोंबडीप्रमाणं जिवंत भाजून निघायची वेळ आलीय येथे अन हे शंका विचारायला निघालेत काळ-वेळ, स्थळ याचं काही भान ? छे छे त्या ' आगी 'तून कधी एकदा बाहेर पडतो असं झालं.

पोलादी पत्रे यंत्राच्या साहाय्यानं उचलून एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी नेतात त्यावेळी आम्ही त्याच्या खालून जात होतो क्रेनच्या साहाय्यानं भारी वजनाचे पत्र अलगद उचलले जातात त्यावेळी पत्र्याचा धक्का लागणार नाही अशी खबरदारी घ्यावी लागत होती हो, चुकून धक्का लागलाच तर आमचा पोलादी पत्रा व्हायचा क्रेन चालविणाऱ्या तरुण मुली पाहून आम्ही आश्चर्यानं थक्क झालो उंचावरून क्रेन चालविणाऱ्या त्या मुली आम्हाला

हात दाखवून अभिवादन करीत होत्या मी मात्र हात दाखविण्याच्या भानगडीत पडलो नाही म्हटल, हात दाखवून अवलक्षण नको व्हायला त्या पोरीची क्रेनच्या व्हीलवरील पक्कड सुटली तर भलतीच आफत ओढवायची. कारखाना पाहून झाल्यावर आवाराबाहेर पडलो तेव्हा जीव भाड्यात पडला (अर्थात, भाड पोलादीच होत बर का !)

तेथून मोटारीन आमची वरात पुन्हा मुख्य कचेरीत आली वाटल होत आता सुटलो, पण कसचे काय मोकळे व्हायला ?

कारखान्यातील कामगारासाठी उभारण्यात आलेल्या पोलिक्लिनिकमध्ये (इस्पितळ+दवाखाना) नेण्यात आल लेडी डॉक्टरनी सबध दवाखाना दाखविला कामगाराना कसा उपचार केला जातो याची माहिती करून दिली डेन्टीस्टच्या विभागात पोचल्यावर मला माझी पोकळ दाढ भरून घ्यायची आठवण झाली मी दाताच्या डॉक्टरना विचारल, काय हो, कारखान्यातील कामगाराचे दात पोलादासारखे टणक आहेत का ? तुम्हाला पुरेसे पेशट मिळतात की नाही ? यावर डॉक्टर म्हणाले, 'पेशट आमच्याकडे येत नाहीत आम्ही पेशटकडे जातो सर्व कामगारांच्या दातांची तपासणी करतो व खराब दातावर इलाज करतो '

वारे वा ! हे चांगलच की पेशटला रांगेत नबर लावून वाट पाहात बसाव लागत नाही उलट डॉक्टरच पेशटकडे जातो आपल्या देशात कामगाराच्या नशिबी अशी परिस्थिती कधी येणार कुणास ठाऊक !

त्यानतर आम्ही टेक्निकल ट्रेनिंग सेंटर बघायला गेलो एक मुलगी होती आमच्याबरोबर. माझी समजूत ती केन्द्रातील एकादी विद्यार्थिनी असावी चौकशीअती ती इजिनियरिंग ग्रॅज्युएट व तपासणी अधिकारी असल्याच समजल सेंटरच्या निरनिराळ्या विभागात हिंडलो प्रशिक्षण घेणाऱ्या विद्यार्थी-विद्यार्थिनीशी बातचीत केली परत मुख्य कचेरीत परतलो आम्हाला वाटल की, आम्ही निदान आता सुटलो, पण छे ! पुन्हा सचालक महाशयानी आम्हाला तावडीत पकडल पुन्हा ज्ञानामृत पाजायला सुरुवात केली माजर उदराला जस खेळवत, प्रथम जरास मोकळ सोडत पुन्हा पजात पकडत, पुन्हा सोडत, पुन्हा पकडत असा प्रकार सचालक आमच्या बाबतीत करीत होता त्यान आम्हाला भरपूर माहित्य, फोटो दिले पुन्हा कॉफी पाजली व निरोप दिला

कारखान्यातून थेट हॉटेल 'लुनिक' वर आलो थोड खाण झाल गरम गरम कॉफी घेतल्यावर बर वाटल हवा सुरेख पडली होती सुटाला रजा दिली व चक्क बुशशर्ट चढवून पाय मोकळे करायला बाहेर पडलो सहा वाजून गेले होते तरी बाहेर उन्ह होत आमच्या बरोबरच जर्मनीत 'समर' (उन्हाळा) समरागणात उतरला अस मिसेस रेईन्की म्हणाल्या त्यावर मी म्हटल, 'हा आमचा पायगुण आहे आम्ही भारतीय जर्मनीत येताना भारतीय वातावरण बरोबर घेऊन आलो, म्हणजे 'होमसीक' वाटायला नको.

आम्ही निमन्त्रित पाहुणे असलो तरी आमच्या हालचालीवर निर्बंध मुळीच नव्हते आमचा दिवसाभराचा ठरलेला कार्यक्रम आटोपला की, आम्ही मोकळे मन मानेल त्या ठिकाणी सोबत न घेता हिंडत भटकत असू पोलाद कारखान्यातून मिळालेल साहित्य खोलीवर टाकल व माझे मित्र श्री रोमेश चदर यांना घेऊन भ्रमतीला निघालो बाकीचे खोलीवर विश्रांती (म्हणजे प्यायला) घ्यायला गेले वाटेत मिसेस रेईन्केनी हटकल त्या म्हणाल्या, 'अनोळखी मुलीपासून ' जरा बचके ' मी म्हटल, डोन्ट वरी आम्ही अनोळखी मुलखात अनोळखी मुलीच्या वाटेला मुळीच जाणार नाही ' कम्युनिस्ट देशात पाहुण्याना ठराविक गोष्टी दाखविल्या जातात वाटेल तेथे जाण्याची मुभा नसते अस ऐकल होत, परतु येथे प्रत्यक्षात अनुभव वेगळाच आला आमच्या हालचालीवर मुळीच निर्बंध नव्हते कारण त्याच्याकडे जगापासून लपविण्या-जोग काहीच नव्हत उलट आपली सर्व क्षेत्रातील प्रगती पाहुण्यानी पाहावी अशी त्याची इच्छा दिसली

आम्ही दोघेजण गल्ली बोळातून, मोहल्ल्या मोहल्ल्यातून हिंडलो आम्हाला कुठच काही आक्षेपार्ह अस आढळल नाही. रस्ते नीट ध्यानात ठेवून हिंडलो, कारण कुठ हरवलो तर पचाईत व्हायची फेरफटका मारून परतलो रात्री पोलडच्या सीमेवरील फ्रँकफर्ट (ओडर) या टुमदार शहरातील एका हॉटेलात जेवण घेतल या निमित्तान पोलडच्या सीमेपर्यंत जाऊन आलो जेवण चालू असताना म्युझिक डान्स पाहिला डान्सरचा ड्रेस सोवळा होता म्युझिकच्या तालावर अनेक ग्राहक जोडपी डान्स करू लागली

**दुसऱ्या** दिवशी आयसनहुट्टेनस्टाडच्या सिटी कौन्सिलनं (नगरपालिकेनं) आम्हाला खास निमंत्रण दिलं होतं आमच्या हॉटेलच्यासमोर तर त्याची मुख्य इमारत होती लॉर्ड मेयरचे प्रतिनिधी मॅक्स रिच-फर व सिटी कौन्सिलचे काही निवडक पदाधिकारी टाऊन कौन्सिलच्या मुख्य हॉलमध्ये आमच्या स्वागताय उपस्थित होते नगरपित्यात एक स्थानिक पत्रकार होता पत्रकार– मग तो भारतीय असो अगर जर्मन असो–एकजात सारखाच घाई ही नेहमी त्याच्या पाचवीला पुजलेली नगरपित्यातला पत्रकार भारतीय पत्रकार शिष्टमंडळाच्या सिटी कौन्सिल भेटीचं वृत्त आपल्या वृत्तपत्रात देण्यासाठी घाईघाईनं निघून गेला

मॅक्ससाहेब मोठ्या गमत्या माणूस वयानं साठी ओलांडलेली, परंतु उत्साह तरुणांना लाजविणारा असा त्यांनी जर्मन भाषेत शहरासंबंधी माहिती सांगितली मिसेस रेईन्केचा तोंडपट्टा नॉनस्टॉप चालूच होता. त्यांनी सांगितलं की, आयसनहुट्टेनस्टाड शहरात टाऊन पार्लमेंट ही सर्वोच्च अधिकार असलेली संस्था आहे या पार्लमेंटचे ८५ सदस्य १० मतदारसंघातून (बरोज) निवडले जातात याखेरीज १७ सदस्य राखीव सदस्य असतात या सदस्यांची निवडीची मुदत चार वर्षांची असते. प्रत्येक खेपेला नवीन सदस्यांची पार्लमेंटवर निवड केली जाते तेच तेच चेहरे दिसत नाहीत तरुणांना संधी दिली जाते. आज ३० टक्के सदस्य महिला, ३० टक्के युवक (सरासरी २६ वर्षे वयाचे) आहेत आमचे टाऊन पार्लमेंट तरुण आहे आयसनहुट्टेनस्टाड शहर वयात आले आहे म्हणजे २१ वर्षांचं झालं आहे शहराचा सतत विकास हेच आमचं धोरण शहराचं अंदाजपत्रक ५ कोटी १० लक्ष मार्क्सचं आहे यापैकी ७५ टक्के सामाजिक सेवा, आरोग्य वगैरे गोष्टींवर खर्च होतो अंदाजपत्रक तुटीचं

नसत तूट आलीच तर ती राष्ट्रीय अर्थव्यवस्थेकडून भरून काढली जाते. राष्ट्रीय उत्पन्नाचा ६ टक्के हिस्सा राष्ट्रीकृत मालकीच्या उद्योग समुहातून येतो जनतेच्या मालकीच्या उद्योगधंद्याकडून नफ्याचा काही हिस्सा मिळतो. व्यापारी, शिंपी, वगैरे व्यावसायिक वाहन यावर कर आकारला जातो शहरातील लोकांच्या कल्याणाची सपूर्ण जबाबदारी टाऊन कौन्सिलवर असते एकूण ८५ सदस्यांपैकी १६ सपूर्ण वेतनधारी असतात व बाकीचे ऑनररी असतात

शहरात पाच स्थानिक वृत्तपत्रे आहेत सर्वात मोठ्या वृत्तपत्राचा खप १ लक्ष २० हजार आहे ७० हजार ग्राहक आहेत सास्कृतिक कार्यासाठी ८४ हजार मार्कस मजूर केलेले असतात चार सास्कृतिक केन्द्रे आहेत शहराची लोकसख्या ४६ हजार आहे ८१ हजारापर्यंत लोकसख्या वाढविण्याची योजना आहे शहरात १३ हजार फ्लॅट (गाळे) आहेत

मॅक्ससाहेब स्वत पूर्वी अनेक वर्षे लॉर्ड मेयर होते त्यामुळे त्यानी नगरपालिकेच्या विविध योजना, शहराच मॉडेल वगैरे समजावून दिल टाऊन हॉलमध्ये टेबलावर दारूच्या बाटल्या माडून ठेवल्या होत्या मी दारू घेण्यास नकार दिलेला पाहून मॅक्ससाहेबाना अचबा वाटला 'नो गुड' अशा अर्थाच जर्मन भाषेत ते काही तरी बोलले टाऊन हॉलमध्ये दीड-दोन तास घालविल्यावर आम्ही मोटारीतून एका गगनचुंबी इमारतीत गच्चीवर जाऊन शहराच अवलोकन केल लिफ्टमधून वर जाण्यापूर्वी ज्या ब्लॉकमध्ये आपल्याला जायच असेल या ब्लॉकचा नबर दाबायचा व तेथील माणसाना आगमनाची वर्दी द्यायची खालून वरच्या कोणत्याही मजल्यावरील भाडेकरूशी इटरकॉमवरून बोलतादेखील येत ही अगदी झकास सोय आहे आम्ही प्रथम सोळाव्या मजल्यावरील एका बुढीला भेटलो व तिला घेऊन गच्चीवर गेलो याच कारण गच्चीची किल्ली तिच्याकडे होती गच्चीवरून शहराच दृश्य अप्रतिम दिसत पोलडची सीमा दिसते पोलडमधील वस्ती दिसते लिफ्टमधून खाली येताना वाटेत लिफ्टमध्ये अडकून पडलो मॅक्ससाहेब भलतेच विनोदी गृहस्थ ते स्वत' चागलेच लठ्ठभारती आहेत, परतु ते मिसेस रेईन्केला म्हणतात कसे, 'अग, तुझ्या अगाचा घेर भलताच वाढलाय ना? त्यामुळे बिचारा लिफ्ट हलायलाच कबूल नाही' त्यावर मिसेस रेईन्के म्हणाल्या, 'तुम च्याएवढी काही मी जाडी नाही'

नंतर लिफ्ट चालू झाला आम्ही हॉटेलवर परतलो मॅक्सबरोबर विनोदी वातावरणात खाना घेतला लगेच दुपारी आम्हाला गेऱ्हार्ड आयस्लर स्कूल-मध्ये नेण्यात आलं हे अद्यावत स्कूल आहे दरवाजात प्रिन्सिपॉल व त्यांची मदतनीस स्वागतार्थ उपस्थित होते एक चुणचुणीत मुलगी हातात फ्लगगन घेऊन उभी होती स्कूलमध्ये प्रवेश करण्यापूर्वी त्या मुलीनं आमचा ग्रुप फोटो घेतला ती मुलगी स्थानिक वृत्तपत्राची स्टाफ फोटोग्राफर होती आमचा फोटो वृत्तपत्रात छापण्याची घाई असल्यानं ती मुलगी टुणटुण उड्या मारीत पळत सुटली

प्रिन्सिपॉलनी दिवाणखान्यात नेऊन आम्हाला शाळेसंबंधी माहिती निवेदन केली त्यांच्याकडे माध्यमिक शाळेतील शिक्षण दहावीपर्यंत असतं चौथी ते सहावीपर्यंत मुलांचा कल कोणत्या विषयाकडे आहे याची पारख केली जाते व त्याप्रमाणे सातवी ते दहावीपर्यंत मुलांना गणित, रसायन शास्त्र, शेतकी व तांत्रिक शिक्षणाच्या खास शाळात घालण्यात येतं याखेरीज मुलांना क्रीडा संगीत वगैरे विषयात पारंगत होण्यासाठी शाळा असतात जर्मन माध्यमिक शाळांचं वैशिष्ट्य असं की, मुलांना बहुविध तांत्रिक शिक्षणाचे धडे दहावी पर्यंतच्या अभ्यासक्रमात दिले जातात

माध्यमिक शाळा असली तरी या शाळेची प्रयोगशाळा अद्यावत शास्त्रीय उपकरणांनी सुसज्ज अशी आहे आपल्याकडे कॉलेजातसुद्धा सापडणार नाही अशी अत्याधुनिक उपकरणं तेथील लॅबोरेटरीत आहेत शाळेत मुलांची राहण्याची सोय आहे समरच्या सुटीतसुद्धा मुलं शाळेत राहतात बागेत खेळ-तात आम्ही शाळेच्या निरनिराळ्या विभागात हिंडताना आम्हाला काही मुलं आत शिरताना दिसली सुटीत शाळेत कोण आलं असेल बरं असं कुतूहल त्यांच्या चेहऱ्यावर दिसत होतं मी काही मुलांना शेकहॅंड दिला इतर सर्व मुलांनी त्याचं अनुकरण केलं पाहुण्यांनी आपल्या अस्तित्वाची दखल घेतलेली पाहून मुलांना बरं वाटलं मुलांना वर्गात बसण्याची बाकं मॉडर्न आहेत शाळेची इमारत भव्य आहे शाळेचं आवार प्रशस्त आहे बाग छान आहे शाळेतील मुलं फावल्या वेळेत बागकाम करतात वेळेचा सदुपयोग करतात शाळा पाहून निघालो शाळेच्या खास शेरेबहीत पाहुण्यांचा अभिप्राय लिहून देण्याबद्दल विनंती करण्यात आली शाळेबद्दल उत्तम अभिप्राय लिहून आम्ही सर्वांनी

सह्या केल्या शाळेचा आदर्श नमुना होता तो नतर त्याना 'फिदाझीन' करून परतलो

संध्याकाळ एका कुटुबाच्या सहवासात घालविली स्वेनशोन नावाच पाच जणाच कुटुब नवरा-बायको व तीन मुल पूर्व जर्मनीत लोकसख्या कमी महायुद्धात एक पिढीच्या पिढी गारद झाल्यामुळ पुरुषापेक्षा स्त्रियाची सख्या अधिक पूर्व जर्मनीची एकूण लोकसख्या १ कोटी ७१ लक्ष यापैकी९० लक्ष स्त्रिया (५४ १ टक्के) व ७० लक्ष पुरुष (४५ ९ टक्के) प्रत्येक शभर पुरुषामागे ११८ स्त्रिया अस प्रमाण आहे वयानुसार २० लक्ष बालके, ९० लक्ष काम करणारे लोक व ३० लक्ष पेन्शनर आहेत प्रत्येक शभर नागरिकात ५७ ८ काम करणारे लोक, २३ ५ बालके (पधरा वर्षाखालील) व १९ १ पेन्शनर आहेत

नवऱ्याच नाव वेर्नर स्वेनशोन वय ४४ वर्षे टाऊन हॉलमध्ये नोकरीला मासिक पगार ७६० मार्कस पत्नीच नाव वेरा स्वेनशोन वय ३४ वर्षे शाळेत इग्लिशची शिक्षिका पगार ८०० मार्कस त्याना एकूण तीन मुल दोन मुलगे व मुलगी मारिओ (११) व निकोल (१०) आणि डायना (७)

स्वेनशोन कुटुबाकडे चार रूमचा फ्लॅट आहे महिना भाड ११० मार्कस फ्लॅटमध्ये अद्यावत फर्निचर आहे टी व्ही सेट आहे सेंट्रल हिटींगसिस्टीम आहे. सर्व काही सरकारकडून मिळालेले दोन मुलगे एका खोलीत झोपतात मुलगी निराळ्या खोलीत झोपते नवरा-बायकोंची बेडरूम स्वतत्र आहेत एक खोली पाहुणे अगर आई-वडीलासाठी राखून ठेवलेली आहे उभयताचे आई-वडील पश्चिम जर्मनीत राहतात नाताळच्या सुटीत कधीतरी येतात मुला-मुलीकडे राहतात नातवडांच्या सहवासात रमतात व निघून जातात

आम्ही त्याच्या घरी गेलो तेव्हा सात वाजून गेले होते उभयतानी आमचे उत्तम आदरातिथ्य केले दारू घेणाऱ्याना दारू दिली दारू न घेणाऱ्यासाठी कॉफी केली मिसेसे वेरा स्वेनशोन इग्रजीच्या टिचर असल्यान आम्हाला सभाषण करताना दुभाषाची मदत घेण्याचा प्रसग आला नाही

आम्ही विचारलेल्या सगळ्या प्रश्नांना त्यानी मनमोकळेपणे उत्तरे दिली. आडपडदा न ठेवता कौटुबिक बजेटबद्दल प्रश्न केला असता सर्व माहिती दिली. त्याच बजेट शिलकीच होत घरभाड ११० मार्कस, घरातल्या कामासाठी

५६ मार्क्स (यामध्ये ससाराला लागणारा सर्व खर्च आला) इलेक्ट्रिसिटी गॅस २० मार्कस कपडालत्ता १०० मार्क्स दरमहा किमान ४०० मार्कस शिल्लक पडतात. शिलकीचा विनियोग घरात एकादी नवीन मोठी वस्तू आणण्यासाठी अगर परदेशात ट्रीप काढण्यासाठी केला जातो मिसेस स्वेनशोनना शाळेतून घरी आल्यावर पुढील परीक्षेची तयारी करण्यासाठी अभ्यास करावा लागतो मिस्टर स्वेनशोन बायकोला घरकामात सर्व प्रकारची मदत करतात बायकोन नोकरी साभाळून घरही सांभाळायच म्हणजे नवऱ्यान तिला हातभार लावलाच पाहिजे मुल सकाळचा ब्रेकफास्ट घेऊस स्कूलबसन शाळेत जातात व दुपारचे जेवण शाळेत घेतात व सध्याकाळी स्कूल बसन घरी येतात. सध्याकाळी खेळून झाल्यावर जेवण घेऊन साडेसातच्या आत झोपायला जातात आम्ही गेलो त्यावेळी तिन्ही मुल आपापल्या खोलीत झोपायला म्हणून गेली होती, परतु घरात पाहुणे आल्यामुळ त्यांना कुठली झोप येते ? काही ना काही तरी निमित्त काढून धाकटी डायना सारखी हॉलमध्ये यायची आईला आपला (न) सुजलेला हात दाखवायची व औषध लावायला सांगायची हळूच तिरक्या डोळ्यानी आमच्याकडे बघायची मोठी मिस्कील व गोड पोरगी आई दटावून तिला खोलीत झोपायला जायला सागायची दोन्ही मुलगे बाहेर आले नाहीत खरे परतु खोलीत गडबड दगा करून आपल अस्तित्व जाणवून देत होते

आठवडयातून दोन दिवस सुट्टी स्वेनशोन कुटुब कुठल्यातरी पार्कमध्ये जायच नपेक्षा 'वुडस' (जगल) मध्ये 'मश्रुम' (अळबी—कुत्र्याच्या छत्र्या) पकडायला मोहिमेवर जायच. हा याचा आवडता छद गोव्यातील लोकांना अळब्याचे केवढ अप्रूप मटणाप्रमाण अळब्याची गरम मसाल्याची भाजी करून खाण्यात गोमतकीयाचा हातखडा जर्मन लोकसुद्धा आमचेच भाऊबद दिसतात त्याच्याकडेसुद्धा अळब्याच प्रस्थ फार. हॉटेलमध्ये 'मश्रुम'ची खास प्लेट दिली जाते अडयाच्या पोळचात 'अळबी' तळून खातात. अर्थात, जर्मन लोकांना मसाल्याच वावड असल्यान ते अळबी मटणाप्रमाण खात नाहीत

मुल जगलात 'मश्रुम'ची शिकार करतात आई-बाप पण तेवढयाच आस्थेन त्याच्या मोहिमेत सहभागी होतात नवरा-बायको कधी तरी ऑपेरा

अगर पिक्चरला जातात मुलांना बरोबर नेत नाहीत मुलं आपली बागेत खेळतात खास मुलासाठी असलेली पिक्चर्स त्याना दाखवण्यात येतात स्वेन-शोन कुटुंबाची स्वतःची कार आहे त्याना निरनिराळ्या देशात भटकायची आवड आहे भारताविषयी, विशेषत भारतीय संस्कृतीविषयी मिसेस स्वेन-शोन यांना आदर आहे बांगला देशसंबंधी यांनी बरीच माहिती समजून घेतली

मिस्टर मिसेस स्वेनशोन याचा जोडप्याचा फोटो आल्बममध्ये मला कुठच दिसला नाही मी त्याचा फोटो आणणार होतो शेवटी आपल्या मुलाचे फोटो मिसेस स्वेनशोनन मला दिले पत्रव्यवहार चालू ठेवण्यासाठी पत्त्यांची देवघेव झाली जर्मन कुटुंबाची पाहुण्याच आदरातिथ्य करण्याची पद्धत भार-तीयाप्रमाणेच वाटली निघण्यापूर्वी बाईनी आपला फ्लॅट दाखविला निरोप घेऊन निघालो स्वेनशोन दांपत्य दरवाजापर्यंत पोचवायला आलं नतर खिडकीत उभं राहून हात हलवून निरोप दिला

दुसऱ्या दिवशी आम्ही आयसनहुट्टेनस्टाडपासून काही मैलावर असलेल्या मोबीसबर्ग या खेडेगावातील सहकारी शेतीचा प्रयोग पाहायला गेलो सह-कारी कृषी सोसायटीच्या मुख्य कचेरीच्या दरवाजात बर्गोमास्टर (सरपंच) बोएम व चेअरमन वेलकीश यांनी आमचं हार्दिक स्वागत केलं आम्हाला पुष्पगुच्छ देण्यात आले सुमारे तीनशे लोकवस्तीचे हे छोटस, टुमदार गाव. छोटी छोटी बैठी घर आजूबाजूला हिरवीगार राईची शेतं भारतातल्या एकाद्या खेड्यासारखंच वातावरण.

बर्गोमास्टरच्या समवेत मिसेस बुद्रस (गोव्यात मुद्रस हे नाव ऐकलं होतं त्याची मला आठवण झाली) व ट्रॅक्टर ड्रायव्हर मुएलर अशी गावची कार्य-कर्ती मंडळी होती मिसेस बुद्रस सहकारी डुक्कर पैदास केन्द्रात या प्रमुख आहेत. (तरीच त्यांची शरीरयष्टी अशी गलेलठ्ठ का झाली असावी याचे रहस्य समजलं) मुएलर धिप्पाड होते (कदाचित अवजड ट्रॅक्टर चालविण्याचा परिणाम असावा )

प्रथम कचेरीत पेयपानाचा कार्यक्रम झाला त्यांच्याकडील फळाचा रस मधुर वाटला. सहकारी शेतीसंबंधी चर्चा झाली गाव टुमदार असलं तरी सुखसोयीच्या दृष्टीनं गाव व शहर यात फर्क असा मुळीच दिसला नाही.

प्रत्येकाच्या घरी वीज आहे. अद्यावत सुखसोईची, फर्निचर, टी व्ही सेट सर्व काही आहे इतके असूनसुद्धा गावाच स्वरूप गावाला साजेलस आहे प्रत्येकाच्या घरासमोर बागबगीचा आहे पशुपक्षी पाळलेले आहेत

गावात ११३ कुटुंबे आहेत प्रत्येक सहकारी कृषी सोसायटीच्या सदस्याला ० २५ हेक्टर जमीन वैयक्तिक वापरासाठी ठेवण्याची मुभा आहे ती त्याने सहकारी पद्धतीने लागवडीखाली आणावी अगर वैयक्तिक मशागत करावी गावातील ३०० लोकसंख्येपैकी १०० कृषी संघाचे क्रियाशील सदस्य आहेत ७० वृद्ध पेन्शनर आहेत व उरलेले १३० मुल अगर औद्योगिक कामगार आहेत

गावातील सहकारी कृषी सोसायटीच्या सदस्याचे सरासरी वार्षिक उत्पन्न ७२०० मार्कंत म्हणज दरमहा ६०० मार्कसएवढे आहे १९७० मध्ये सहकारी कृषी सोसायटीला ८४ हजार मार्कसचा नफा झाला.

नतर आम्हाला गावातून हिंडविण्यात आल पाहुण्याच्या समवेत सहकारी कृषी सोसायटीचे नेते अशी जगी वरातच काढण्यात आली अस म्हटल तर ते अतिशयोक्तीच ठरणार नाही प्रथम आम्हाला डुक्कर पैदास केंद्रात नेण्यात आल या केंद्रातील डुक्कर गोरे गोरे, गुबगुबीत व धिप्पाड वाटले त्याच्यासाठी खास घर बाधण्यात आली आहेत (ते नशिबवान डुक्कर. नाही तर आपल्याकडे माणसांना धड राहायला झोपडया मिळत नाहीत) प्रत्येक डुकराच्या कानाच्या पाळीवर त्याचा क्रमाक डागलेला असतो डुकराना व्हिटॅमीनयुक्त सात्विक आहार दिला जातो तेथील टापटीप व साफसफाई पाहाण्याजोगी होती आजारी डुकरावर खास उपचार चाललेले पाहिले आजारी डुकराची खास काळजी घेतली जाते आम्हाला नमुन्यादाखल एक छोटस डुकराच पिल्ल आणून दाखविण्यात आल एक एक डुक्कर जगली जनावराएवढ दाडग मासासाठी डुकराची पैदास केली जाते

नतर आम्ही सहकारी दुग्धोत्पादन केद्र पाहायला गेलो या ठिकाणच्या गाई काळ्या रगाच्या, वर पाढुरके ठिपके असलेल्या जाफरावाद म्हशीवर ताण करतील अशा दाडगट, धिप्पाड त्याच्यासाठी खास तबेले बाधलेले आहेत तबेले स्वच्छ. कुठच घाणीचा मागमूस नाही वैरण व खास व्हिटॅमिनयुक्त खाद्यपदार्थ त्याना देण्यात येतात वासराला तीन दिवसाहून अधिक

गाईजवळ ठेवीत नाहीत वासराशिवाय गाईला पान्हा फुटत नाही असले लाड तेथे चालत नाहीत आचळाला हस्तस्पर्श न करता दूध काढल जात हे दूध पाईपन पिंपात नेण्याची सोय केली आहे नतर ही पिंपे डेअरीत नेऊन पोचविली जातात डेअरीत दुधावर पाश्चराईझेशन वगैरे प्रक्रिया केल्या जातात

सहकारी पद्धतीन केलेला शेतीचा प्रयोग पाहिला प्रचड यत्राच्या साहाय्यान सामुदायिक शेती केली जाते रस्त्यात दुतर्फा पीच, सफरचद वगैरे फळझाड पाहिली झाडावर लटकलेली सफरचद, पीच पाहून मजा वाटली गावात रस्त्याच्या कडेला असलेल्या झाडावरील फळांना कोणीच दगड मारीत नाहीत (आपल्याकडे कैऱ्या दिसायला लागताच दगडाचा वर्षाव होतो व सर्व कैऱ्या पळविल्या जातात अन् त्याबद्दल कुणालाच काही वाटत नाही )

गावात फेरफटका मारून झाल्यावर कचेरीच्या मुख्य कचेरीत परतलो दुपारच जेवण सहकारी कृषी सोसायटीच्या सदस्यासमवेत जेवण झाल. जेवण साधच होत सुप, मास, कच्चा भाजीपाला, फळ मुखशुद्धीला बेरीज फळानी सजविलेली आईसक्रीमची प्लेट होती वर काळी कडू कॉफी जेवणाचा कार्यक्रम झकास झाला

नतर थोडा वेळ विश्रांती घेतल्यावर सामुहिक फोटो काढण्याचा कार्यक्रम झाला फोटो काढताना मी जरा दूर उभा होतो, परतु उपस्थित सदस्यांपैकी एका महिलेन माझ्या हाताला धरून आपल्याजवळ ओढल व ती मला खेटून फोटोला उभी राहिली (तरी बर हे दृश्य पाहाण्यासाठी त्यावेळी आमच्या सौ पुढचात नव्हत्या) गावात ४० जणांजवळ मोटारी आहेत ट्रॅक्टर ड्रायव्हरचीसुद्धा स्वत'ची गाडी आहे

पूर्व जर्मनीतील शेतकरी हा शेतकरी असा वाटतच नाही त्याचा पोशाख अपटूडेट असतो त्याच शिक्षण झालेल असत त्याला तांत्रिक ज्ञान असत खेड्यातील जीवनाला तो मुळीच कटाळलेला नसतो करमणुकीसाठी तो अधूनमधून आयसनहुट्टेनस्टाड शहरात जाऊन येतो कधी कधी टुरिंग टॉकीजचा मुक्काम खेड्यात पडतो शहरातील कामगाराएवढाच शेतकरी सुखी आहे

सहकारी शेतीचा प्रयोग पाहून परतलो पाहुणचार केल्याबद्दल स्वेनशोन

कुटुंबियांचे आभार मानण्यासाठी आम्ही पुष्पगुच्छ घेऊन यांच्या घरी पुन्हा गेलो पळणाला पान तीन सगळीकडे मातीच्याच चुली अनपेक्षितरित्या भेट दिल्यामुळे मिसेस स्वेनशोन चांगल्याच गोंधळून गेलेल्या दिसल्या कारण घर चांगलच अस्ताव्यस्त होत यावर मी मिसेस स्वेनशोनला सांगितल की, आपण अस्वस्थ होण्याच कारण नाही आमच्याकडे भारतात हीच स्थिती असते आमच्या घरी अनपेक्षित कुणी पाहुणा आला तर मुलांनी घर असच अस्ताव्यस्त केलेल सापडत

मी आठवण म्हणून भारतातून आणलेली रंगीबेरंगी मण्यांची माळ मिसेस स्वेनशोन यांना दिली नंतर फुलाच गुच्छ दिला माळ पाहून बाईंना आनंद झाला लगेच त्यांनी आपल्या गळ्यात घातलीदेखील इतकच नव्हे तर माळ मला आणली तुला नाही अस म्हणून छोट्या डायनाला चिडवलदेखील रोमेश चंद्रन उदबत्त्या व भारतीय संस्कृतीसंबंधीच पुस्तक दिल नंतर आमचे ग्रुप फोटो घेतले डाय आम्हाला पोचवायला खाली आली होती तिला मोटारीत घातल व गल्लीच्या नाक्यावर नेऊन सोडल बेटी खूष झाली रात्री मॅक्ससाहेब आमच्याबरोबर जेवायला होते त्यांनी अनेक गमती-जमती सांगितल्या आमचा तीन दिवसांचा आयसनहुट्टेनस्टाडचा मुक्काम संपला उद्या न्यू ब्रँडनबर्गला जाण्यास निघणार आहोत

४ ४ ४

कुटुंबियांचे आभार मानण्यासाठी आम्ही पुष्पगुच्छ घेऊन यांच्या घरी पुन्हा गेलो पळमाला पान तीन सगळीकडे मातीच्याच चुली अनपेक्षितरित्या भेट दिल्यामुळे मिसेस स्वेनशोन चांगल्याच गोंधळून गेलेल्या दिसल्या कारण घर चांगलच अस्ताव्यस्त होत यावर मी मिसेस स्वेनशोनला सांगितल की, आपण अस्वस्थ होण्याच कारण नाही आमच्याकडे भारतात हीच स्थिती असते आमच्या घरी अनपेक्षित कुणी पाहुणा आला तर मुलांनी घर असच अस्ताव्यस्त केलेल सापडत

मी आठवण म्हणून भारतातून आणलेली रंगीबेरंगी मण्यांची माळ मिसेस स्वेनशोन यांना दिली नंतर फुलांच गुच्छ दिला माळ पाहून बाईंना आनंद झाला लगेच त्यांनी आपल्या गळ्यात घातलीदेखील इतकच नव्हे तर माळ मला आणली तुला नाही असं म्हणून छोट्या डायनाला चिडवलदेखील रोमेश चंदरने उदबत्त्या व भारतीय संस्कृतीसंबंधीच पुस्तक दिल नंतर आमचे ग्रुप फोटो घेतले डाय आम्हाला पोचवायला खाली आली होती तिला मोटा-रीत घातल व गल्लीच्या नाक्यावर नेऊन सोडल बेटी खूष झाली रात्री मॅक्ससाहेब आमच्याबरोबर जेवायला होते त्यांनी अनेक गमती-जमती सांगि-तल्या आमचा तीन दिवसांचा आयसनहुट्टेनस्टाडचा मुक्काम संपला उद्या न्यू ब्रॅंडनबर्गला जाण्यास निघणार आहोत

४ ४ ४

आयसनहुट्टेनस्टाड शहराला 'फिदाझीन' (बाय बाय) करून आम्ही न्यूब्रॅंडनबर्ग या शहराच्या दिशेने प्रयाण केले. मुंबईत गुजरातीपारशी मंडळीत निरोप घेतेवेळी 'आवजो' (शिरापुरी खावजो ही महाराष्ट्रीयांची मल्लीनाथी) करण्याची प्रथा रूढ आहे. तशीच जर्मनीत हस्तांदोलन करून 'फिदाझीन' म्हणण्याची पद्धत आहे. न्यूब्रॅंडनबर्ग हे शहर तोलेन्सी तलावाच्या उत्तर काठावर वसलेले आहे. मोटार व रेल्वे यांचे जंक्शन असल्याने ईशान्य-पूर्व जर्मनीचे हे एक अत्यंत महत्वपूर्ण केंद्र आहे. (लोकसंख्या ४१ हजार) फ्रित्झ रुटर नावाचा जर्मन लेखक १८५६ ते १८६३ या काळात या शहरात राहिला. त्याच्या पुस्तकात या शहराचा उल्लेख 'निगेनब्रॅम्बर्ग' असा सापडतो. त्याच्या पुस्तकामुळे या शहराचे नाव सर्वत्र फैलावले.

आयसनहुट्टेनस्टाड (हट! आपण हे अवघड नाव उच्चारण्याच्या भानगडीतच पडलो नाही. कारण ते नाव घेताना नेमकी आमची बोबडी वळायची) ते न्युब्रॅंडनबर्ग साडेतीन तासाहून अधिक लांबचा पल्ला होता. सकाळची भरपेट न्याहरी झाली असली तरी वाटेत गाड्या थांबवून एका छोट्याशा पबमध्ये पेय घेण्याचे ठरले. पब अगदी छोटा होता. मालक एक बुढ्ढा जर्मन होता. त्याने प्रत्येकाला बिअर आणून दिली. माझ्याबरोबर रॉमेश चंदर पण लेमन पिणारा होता, परंतु त्या म्हाताऱ्याने फक्त लेमन बाटली कुरकुरत माझ्या पुढ्यात आणून ठेवली. रॉमेशसाठी दुसऱ्या लेमन बाटलीची मागणी केली तेव्हा तो जाम तडकला. पबमध्ये येऊन लेमन पिणारे हे कुठले महाभाग (की गावढळ ?) आपल्या पबमध्ये सकाळच्या प्रहरी घुसले अशा चमत्कारीक नजरेने आमच्याकडे पहातच राहिला. पबमध्ये केवळ मुले अगर ड्रायव्हर

मंडळी यांच्यापुरत्याच लेमन बाटल्या आम्हां ठवता आहे तो मर्यादित लेमन स्टॉक संपवून काय करू असं तो जर्मन भाषेत तणतणत होता शेवटी मिसेस रेईन्केनी मोठ्या मिनतवारीनं त्याला बाबापुता करून (जर्मन भाषेत बाबापुतासाठी कोणता शब्द वापरला हे काही आमच्या टाळक्यात शिरलं नाही ) दुसरी लेमन बाटली फ्रीजमधून काढायला लावली पबमध्ये इतर दारू पिणाऱ्याच्या समवेत लेमन प्यालो असं सांगितलं तर कुणाला खरंदेखील वाटणार नाही गुत्त्यात जाऊन ताक प्यालो असं सांगितलं तर त्यावर कोणत्या शहाण्याचा विश्वास बसेल ?

रस्त्याच्या दोन्ही बाजूंनी राईची (राई म्हणजे आपल्याकडची मोहरी नव्हे जर्मनीत राई नावाचे ज्वारी बाजरीप्रमाणे एक अन्नधान्य आहे) शेत पसरलेली दिसली राईची कणसे कशी असतात हे पाहाण्यासाठी वाटेत आमच्या गाड्या थांबविण्यात आल्या (खरे म्हणजे राईची कणसे पाहाण्याचे वरकरणी निमित्त होते ड्रायव्हरना पाण्याचे नळ सोडण्याची घाई लागली होती म्हणून त्यांनी गाड्या उभ्या केल्या होत्या अर्थात, या संधीचा आम्ही फायदा घेतला ही गोष्ट निराळी) आपल्या ज्वारी–बाजरीच्या कणसासारखी राईची कणसे भरदार नसतात अगदी नाजूक धान्याचा दाणा जवळजवळ नाचणी एवढा बारीक

दुपारी बाराच्या सुमारास नॉयब्राडेनबुर्ग शहर गाठले शहरात रस्त्यावर माणसाची गर्दी, रहदारी बघून बरे वाटले (मुंबईत गर्दी पाहून उबग येते व निवांत रस्ता दिसला की बरे वाटते परंतु, इतके दिवस रस्त्यावर माणसांची गर्दी दिसलीच नव्हती त्यामुळं चुकल्याचुकल्यासारखं, अस्वस्थ वाटायचं या शहरात त्या मानानं बरीच माणसं दिसल्यामुळं माणसात आल्यासारखं वाटायला लागलं )

या शहराचं वैशिष्ट्य म्हणजे मध्ययुगीन काळातील शहराभोवतालची तटबंदी अद्याप जशास तशी मूळ स्वरुपात कायम ठेवण्यात आली आहे (या तटबंदीची भिंत २३०० मीटर लांब व सहा ते आठ मीटर उंच आहे ) दुसऱ्या महायुद्धात शहरातील मध्य वस्तीचा भाग जमीनदोस्त झाला परंतु ही तटबंदी मात्र अभंग राहिली या तटबंदीचे दरवाजे शिल्पकलेचे उत्कृष्ट नमुने असल्यानं ते मूळ स्थितीत जतन करून ठेवण्यात आले आहेत शहरात

मात्र आधुनिक भव्य इमारती उभारण्यात आल्या आहेत नगररचनेची भव्य योजना आखून या शहराची बांधणी करण्यात आली आहे

शहरातील एका झक्क हॉटेलमध्ये खाना घेतला बाल्टिक सागरातील 'बाजार (म्हणजे मासा हो) ट्राऊट मासा टेस्ट केला गोव्यातील समुद्रात जसा बागडा लोकप्रिय मासा तसा बाल्टिक समुद्रातील ट्राऊट मासा प्रसिद्ध

'आधी पोटोबा अन् मग विठोबा' असं म्हणतात तसच आधी पोटोबा शांत केला व नतर आमच्या स्वा-या शहराच्या चीफ आर्किटेक्ट श्रीमती डलीन ग्रन्ड याना कल्चरल सेंटरच्या इमारतीत भेटायला गेल्या ही पधरा मजली भव्य इमारत असून ते सामाजिक व सास्कृतिक केंद्र आहे मिसेस ग्रन्डनी आम्हाला शहराचा प्लॅन, मॉडेल, आतापर्यंतची इमारत बाधणीची कामगिरी, शहर विस्ताराची योजना वगैरे सर्व काही समजावून सांगितल पत्रकाराना एक वाईट सवय आहे जातील तेथे लोकांना प्रश्नांची सरबत्ती करून भडावून सोडतील परतु, नॉयब्रान्डेन्बुर्ग चीफ अर्किटेक्ट बाईचा अपवाद केला. त्यांना आम्ही फारसा त्रास दिला नाही मी बाईंचा निरोप घेतेवेळी सांगितले की, आपल्या शहरविस्तार योजनेमुळ न्यूब्रँडनबर्ग या शहराच्या नावातील नॉय (न्यू) या शब्दाला खराखुरा अर्थ प्राप्त झाला आहे ते ऐकून बाईसाहेब खूष झाल्या

नॉयब्रान्डेन्बुर्ग शहरातून फेरफटका मारला नवीन नवीन हवेल्या बघितल्या नतर रॉस्टॉकच्या दिशेने कूच केल

रॉस्टॉक, बाल्टिक सागराच्या किनाऱ्यावरील जर्मनीच प्रसिद्ध बदर नॉयब्रँडनबर्ग ते रॉस्टॉक अतर सुमारे २०० कि मी आहे रॉस्टॉक हे जर्मन लोकशाही प्रजासत्ताकातील एक अत्याधुनिक बदर, नौकाबांधणी केंद्र व पूर्व जर्मनीच प्रवेशद्वार आहे अगदी उत्तरेला असलेल्या या शहराची लोकसख्या २ लक्ष असून तेथील उत्साही व त्यागी जनतेन या शहराला आर्थिक, राजकीय व सास्कृतिक जीवनाच महत्त्वापूर्ण केंद्र बनविल आहे युद्धात सपूर्णपणे उध्वस्त झालेल्या रॉस्टॉक शहराचे सपूर्णपणे पुनरुज्जीवन झाले असून आज तेथे २० हजाराहून अधिक आधुनिक गाळे बाधण्यात आले आहेत जहाजबाधणी उद्योग, मच्छीमारी उद्योग व बदरातील वाहतूक हे रॉस्टॉकच्या आर्थिक जीवनातील महत्त्वाचे टप्पे आहेत या शहरात

१९ बहुविध विद्यालये व ८००० बालगृहे आहेत याखेरीज आरोग्य व सांस्कृतिक केन्द्रे आहेत तसेच तीन बांधकाम केन्द्रे व अनेक औद्योगिक केंद्रे आहेत नुकताच रॉस्टॉक विद्यापीठाने आपला ५५० वा वर्धापन दिन साजरा केला ७५० वर्षांच्या या हान्सीटीक शहराबरोबर या विद्यापीठाने आपला विकास साधला आहे

रॉस्टॉकच्या परिसरात पोचल्यावर आम्हाला महोत्सवाचे वातावरण जाणवले रॉस्टॉक हे बाल्टिक सागर किनाऱ्यावरील प्रमुख शहर असल्याने दरवर्षी उन्हाळ्यात रॉस्टॉकमध्ये बाल्टिक सागर महोत्सव सप्ताह साजरा केला जातो यदा ११ जूलैपासून हा महोत्सव सुरू होणार असल्याने या महोत्सवाला खास पाहुणे म्हणून आम्ही उपस्थित राहाण्यासाठी रॉस्टॉकला येत होतो शहराच्या सीमेवर रंगीबेरंगी ध्वजपताका उभारण्यात आल्या होत्या रोषणाई करण्यात आली होती लोकांचा उत्साह दुथडी भरून ओसंडत होता नॉर्वे, स्वीडन, डेन्मार्क वगैरे बाल्टिक देशातील, स्कॅन्डीनेव्हीयन राष्ट्रातील लोक महोत्सवासाठी आले होते शहरात धमाल उडालेली दिसली

रॉस्टॉक शहरातील इंटरहॉटेल वॉर्नो (वॉर्नो हे नदीचे नाव ही नदी बाल्टिक सागराला जाऊन मिळते गोव्यातील मुरगाव बंदर जसे जुवारी नदीच्या विशाल पात्रात बसले आहे तसे रॉस्टॉक बंदर वॉर्नो नदीच्या पात्रात उभारले आहे) या खास बड्या बड्या व्ही आय पी साठी राखून ठेवण्यात येणाऱ्या भव्य व आलिशान हॉटेलात आमची उतरण्याची सोय करण्यात आली होती

मी, मिसेस रेईन्के व श्री हेन्रीक असे तिघेजण दुसऱ्या मजल्यावर व बाकीचे चौघे पत्रकार व दोन ड्रायव्हर तिसऱ्या मजल्यावर अशी विभागणी झाली प्रत्येकाला प्रशस्त स्वतंत्र खोल्या देण्यात आल्या खोलीला जोडून बाल्कनी (सज्जा) आहे आमचे हे हॉटेल बंदरासमोर असल्याने बंदरातील दृश्य खोलीत बसून पाहायला मिळत होते

रात्रीचे जेवण घेतल्यावर रॉस्टॉक शहरात फेरफटका मारायला बाहेर पडलो हवेत चांगलाच गारठा जाणवत होता (खास फॉरीन ट्रीपसाठी शिवलेल्या गरम कापडाच्या सुटाची महती पटली) 'विंडो शॉपिंग' (म्हणजे प्रत्येक दुकानाच्या काचेच्या तावदानाच्या खिडकीतून हारीने मांडून

ठेवलेल्या विविध वस्तूंचे निरीक्षण करणे अगर खरेदीच्या दृष्टीने हेरून ठेवणे यालाच 'विंडो शॉपिंग' म्हणतात) केले रात्रीच्या वेळी आमच्यासारखे भटकणारे बरेच निशाचर भेटले यात तरुण जोडप्याचा विशेष भरणा होता भर रस्त्यात त्यांचा प्रणय चालायचा भटकून दमल्यावर हॉटेलवर परतलो

× × ×

सकाळी रस्त्यावरून पांढऱ्या शुभ्र गणवेशातील नौदल सैनिकाची परेड बघितली हॉटेलच्या आवारात टी व्ही शुटिंग पाहिले ते बघण्यासाठी तुफान गर्दी लोटली होती शुटिंग पाहाण्याचे कुतूहल सर्वांना सारखच असाव आपल्याकडील फिल्मी शुटिंग पहाण्यासाठी (की नटनटयांचे चेहरे पाहाण्यासाठी ?) तोबा गर्दी जमते पोलिसांची मदत घ्यावी लागते त्या मानाने जर्मन प्रेक्षक सयमी वाटले कुठेच रेटारेटी धक्काबुक्की आढळली नाही सर्वजण शिस्तीत उभे राहून बघत होते मी तर सज्जात खुर्ची टाकून आरामात शुटिंग पाहिले

रॉस्टॉक येथे महोत्सव असल्याने प्रेस इन्फर्मेशन खात्याने खास कचेरी येथे उघडली होती आम्ही या कचेरीत जाऊन आलो सेंटरमध्ये आमचे उत्तम स्वागत करण्यात आले आकर्षक व्यक्तिमत्व लाभलेल्या श्रीमती वोगलनी आमचे आदरातिथ्य केले (जर्मनीत बाईला 'फ्राऊ' म्हणतात, परतु ती कुमारिका असेल तर तिला 'फॉईलान' म्हणतात) आमच्यासाठी पेये मागविली नंतर प्रसिद्धी खात्याचे प्रमुख डॉ म्युएलर आम्हांला येऊन भेटले आमची अगत्याने विचारपूस केली आम्हाला हवे असलेले साहित्य दिले

नतर मी मिसेस रेईन्केच्याबरोबर दुकानात थोडीफार खरेदी करण्यासाठी गेलो शक्यतो बर्लिनलाच खरेदी करू येथे वस्तू कदाचित महाग मिळतील अशी शका मी बोलून दाखविली त्यावर मिसेस रेईन्के म्हणाल्या, 'तुम्ही कुठेही खरेदी करा सर्व वस्तूच्या किमती एकच सापडतील जर्मनीतील कुठल्याही खेड्यात घड्याळ घ्या त्याला तेथे २५ मार्क्स पडतील तर बर्लिनसारख्या अद्यावत शहरातील डिपार्टमेन्टल स्टोअरमध्ये त्याच घड्याळाला २५ मार्कसच पडतील किमतीत मुळीच फरक पडणार नाही दर्जात बदल होणार नाही

दुपारचे लच आटोपल्यावर लगेच आम्हाला रॉस्टॉकच्या शीप बिल्डिंग यार्ड (जहाजबांधणी कारखाना) च्या मुख्य कचेरीत नेण्यात आले तेथे कारखान्याचे प्रमुख अधिकारी डिट्रीश स्ट्रॉबेल यांनी आमचे स्वागत केले त्यांनी जहाजबांधणी कारखान्याच्या यशस्वी वाटचालीची माहिती निवेदन केली

मालवाहतुकीच्या जहाजबांधणीत सध्या जगात पूर्व जर्मनीचा चौथा क्रमांक लागतो १९५० पासून आतापर्यंत बाल्टिक समुद्र किना यावरील व एल्ब नदीच्या काठावरील जहाजबांधणी कारखान्यातून तीन हजाराहून अधिक जहाजे बाहेर पडली समाजवादी जर्मनीची स्वत:ची १७१ जहाजे असून त्यांची वाहनशक्ती १२ लक्ष टनाहून अधिक आहे १९६९ साली ३,२४,००० ग्रॉस टनाची नोंदणी झाली आतापर्यंत पूर्व जर्मनीच्या जहाजबांधणी उद्योगाने उच्चांक गाठला आहे दर ५५ तासांनी एकादे जहाज जलपर्यटनाला निघते अगर बांधून पूर्ण होते महासागरी व किनारी वाहतुकीच्या उद्योगात १९६० सालापासून दर वर्षाला '१३ कोटी १७ लक्ष मार्क्सवरून ८० कोटी २ लक्ष मार्क्सपर्यंत वाढ झाली आहे

पूर्व जर्मनीतील जहाजबांधणी कारखान्यांना २३ देशात कायम ग्राहक आहेत १९६९ साली ११ देशातील ग्राहकांना २ जहाजे पुरविण्यात आली याच वर्षी रशिया, नॉर्वे फ्रान्स, रुमानिया व क्युबा या देशातून ८० हून अधिक महासागरी वाहतुकीच्या जहाजांचा मागणी नोंदविण्यात आली. भारत हे एक नवे ग्राहक राष्ट्र आहे भारताने १३ मोठ्या मालवाहतुकीच्या जहाजांची मागणी नोंदविली होती यापैकी १३ हजारांच्या 'जयमंगला' या चौथ्या जहाजाचे जलावतरण नुकतेच झाले

मुंबईच्या सिंदिया स्टीम नेव्हीगेशन कंपनीच्या मागणीनुसार चार जहाजे बांधून रवाना झाली आणखी दोन जहाजे यंदा बांधायला घेतली आहेत पुढील वर्षी आणखी दोन जहाजे बांधायला घेतली जाणार आहेत याचा अर्थ १९७२ पर्यंत एकूण आठ जहाजे पूर्व जर्मनीच्या या जहाजबांधणी कारखान्यात बांधण्यात येणार आहेत आतापर्यंतच्या जहाजांची नावे—जलमणी, जलमयूर, जलमत्स्य, जलमंगला, जलमोहन व जलमोती

याखेरीज पुढील काही वर्षात शिपिंग कॉर्पोरेशन ऑफ इंडियासाठी

आणखी सहा जहाजे बांधण्यात येणार आहेत (त्याची एकूण क्षमता जवळ-जवळ साठ हजार टनावर असेल (प्रत्येक जहाजे दहा हजार टनाचे असेल. याचा अर्थ भारत पूर्व जर्मनीकडून १४ जहाजे बाधून घेणार आहे पूर्व जर्मनीच्या जहाज निर्यातीत रशियाच्या खालोखाल भारताचा दुसरा क्रमांक लागतो मच्छिमार बोट बाधणी उद्योगात जगात पोलडच्या नतर पूर्व जर्मनीचा दुसरा क्रमाक लागतो जागतिक टनेजमध्ये पूर्व जर्मनीचे प्रमाण १७ ६ टक्के आहे १९६९ साली पूर्व जर्मनीने एकूण ९४ ३१४ ग्रॉस रजिस्टर्ड टनाच्या ५५ मच्छीमार बोटीची निर्यात केली हा आकडा आता ५८ वर गेला आहे

एक जहाज साधारणपणे ९० ते १०० दिवसात बाधून पूर्ण होऊ शकते पूर्व जर्मनी बहुताशी मालवाहू जहाजाची निर्मिती करते रशियाकडून मोठ्या प्रमाणावर ऑर्डरी मिळाल्यामुळे पूर्व जर्मनीच्या जहाजबाधणी कारखान्याची उत्पादनक्षमता वाढली आहे १९४८ साली या धद्याला प्रारभ करुन अल्पाव-धीत पूर्व जर्मनीने जगात आपले वरचे स्थान पटकावले आहे

कॉफीपान झाले स्ट्रॉबेल यानी आठवणीदाखल पत्रकाराना छोटी डायरी दिली मी सागरी किनाऱ्याच्या प्रदेशातला असल्याने जहाजबांधणी कार-खान्याच्या सचालकाचे आभार मानण्याचे काम मी केले जहाजबाधणी क्षेत्रात पूर्व जर्मनी व भारत यानी सहकार्य करावे, उभय देशानी सयुक्तरीत्या (Joint Venture) जहाज बांधणी कारखाना भारतात सुरू करावा अशी सूचना मी केली व अशा प्रकारे भारत-जर्मन मैत्रीचे भक्कम जहाज बनवावे असे सागितले

त्यानतर आम्हाला छोटयाशा ' याच ' (नौका) मधून जहाज बाधणी कारखाना दाखविण्यासाठी सागरी सहलीवर नेण्यात आले ' याच ' च्या कप्तानाने आमचे जगी स्वागत केले पाहुण्यासाठी विविध प्रकारची पेय दिली माझ्यासाठी ' कोक ' (कोकाकोला) आणला गप्पागोष्टी करीत आमची सागरी सहल मजेत झाली समुद्रात बाधण्यात येणारी जहाजे आम्हाला दाख-विण्यात आली. बरोबर पॉवरफुल दुर्बीण असल्याने आम्हाला जहाजाच्या बाधणीची कल्पना येत होती सिंदीयाची एक बनत असलेली ' जलमोती ' बोट पाहिली

जहाजबांधणी कारखाना पाहून झाल्यावर (या कामी आमचे जवळजवळ दोन तास खर्ची पडले) बाल्टिक सागरात (High Seas) दूरवर फेर-फटका मारून आणण्याचे 'याच' वाल्यानी ठरवले छोटयाशा नौकेतून मोठ्या समुद्रातून विहार करणे धोक्याचे असते एवढेसुद्धा या मंडळींना कळू नये ? इतका वेळ खाडीतील समुद्रात फिरलो तेव्हा सुद्धा आमची नौका हेलकावे खातच होती, पण ते सुसह्य होते, पण आता हे भर सागरात हिंडवून आणायला निघालेत कप्तानाने थट्टेने म्हटलेसुद्धा, बरे का मंडळी घाबरू नका, पण काळ वेळ सांगवत नाही नौका डुबली तर पोहायला येते ना ? तयारी ठेवा (यांना थट्टा बरी सुचते) माझी छाती धडधडू लागली, पण बोलायची सोय नव्हती मघाशी मारे कोकणातला–सागरी किनाऱ्यावर राहणारा पत्रकार या नात्याने स्ट्रोबलचे आभार मानले होते आता भोगा त्याची फळे मनातून चांगलाच टरकलो असूनसुद्धा वरकरणी भीती दाखवि-ण्याची सोय नव्हती मन घट्ट केले देवाचे स्मरण केले (कम्युनिस्ट देशात देव पावतो किंवा नाही हे काही नीटसे माहीत नव्हते, परतु ऐनवेळी धावा केला झाले )

आमची छोटी नौका बाल्टीक सागरात लाटाच्या हिंदोळ्यावर वरखाली अन् खालीवर झोके घेऊ लागली पर्वतप्राय लाटाबरोबर कागदी होडीप्रमाणे गिरक्या घेणारी आमची नौका डळमळू लागली नौकेबरोबर आमचे काळीज वर खाली, खालीवर होऊ लागले तरी बर आमच्या नौकेच्या पाठोपाठ काही अतरावरून एक लाँच येत होती न जाणो पाहुण्यांसकट नौकेने जलसमाधी घेतली तर पाहुण्याना सुरक्षित किनाऱ्यावर उचलून आणता यावे हा त्या लाँच आणण्याचा उद्देश असावा आपल्याकडे 'गगेत घोड न्हाल' अशी म्हण आहे मला तर आमच घोड बाल्टिकच्या सागरात न्हाण्याची भीती ग्रासू लागली आमच्या बरोबरचे पत्रकार म्हणत होते एक वेळ आम्ही घाबरून जाऊ, पण बोरकर काही या लाटांना घाबरणार नाही कारण ते पडले समुद्र किनाऱ्यावरचे रहिवासी मला उसने अवसान आणून म्हणावे लागले छे, छे, मी मुळीच घाबरत नाही अहो, मला तर झोपाळ्यावर बसून झोके घेतल्यासारखे सुख लाभतय दुर्बीण घेऊन मागून येणाऱ्या लाँचकडे पाहिले अन दरदरून घाम सुटला, कारण ती प्रचड लाटाबरोबर झुज देताना

दिसली म्हणजे ? आमची नौकासुद्धा अशीच झुंज देत आहे तर ? अरे बापरे बाप ! पटकन दुर्बीण खाली ठेवली डोळे मिटून घेतले आमच्या नौकेत लाटेचे पाणी घुसत होते, परंतु त्याचे कुणालाच काही वाटत नव्हते प्रत्येक-जण दारूचे घुटके घेत अन् सिगारेटचे झुरके घेत 'एन्जॉय' करीत होते

नौका खवळल्या पाण्यातून शांत पाण्यात परतल्यावर माझे मन शांत झाले आमची नौका सुखरूप परतल्यावर किनाऱ्यावरील यार्डच्या लोकांनी तोफांचे आवाज काढले व पाहुणे सुखरूप परतल्याबद्दल आनंद व्यक्त केला हात हलवून आमचे स्वागत केले हा माझ्या आयुष्यातील अगदी रोमहर्षक, चित्तथरारक प्रसंग मी कालत्रयी विसरणार नाही ही सागरी सफर अत्यंत अविस्मरणीय अशी झाली

नौकेतून किनाऱ्यावर उतरलो रात्रीच्या जेवणाचे आमंत्रण नौकेच्या तसेच जहाजबांधणीच्या अधिकाऱ्यांना देऊन आम्ही परतलो बंदरावर मोटा-रीत न बसता गंमत म्हणून ट्राममध्ये बसलो व ट्राममधून हॉटेल वॉर्नोबर परतलो रात्री नाईट क्लबमध्ये कॅबेरे नृत्याचा प्रकार बघितला

■ ११ जुलै रोजी सकाळी १० वाजता बाल्टिक सागरी महोत्सवाला प्रारंभ झाला टाऊन हॉलच्या समोर उभारण्यात आलेल्या खुल्या खास दालनात पूर्व जर्मनीचे परराष्ट्रमंत्री ओटो विन्झर, पक्षाचे पदाधिकारी व इतर निमंत्रित पाहुणे बसले होते त्यांच्या समोरच एका दालनात पत्रकार पाहुण्यांची व्यवस्था करण्यात आली होती साडे नऊच्या सुमारास आम्ही स्थानापन्न झालो. मिसेस रेइन्के बरोबर असत्या तर बरे झाले असते कारण त्यांनी आम्हाला इंग्रजीतून सर्व काही समजावून सांगितले असते, परंतु पाहुण्यांच्या दालनात प्रवेश करण्याची मिसेस रेईन्के व श्री हेन्रीक या दोघानाही परवा-नगी नाकारण्यात आली मिसेस रेईन्के मोठी खटपटी–लटपटी बाई त्यांनी प्रेस इन्फर्मेशन सेन्टरमध्ये जाऊन स्वतःसाठी निमंत्रणपत्रिका मिळविली व त्या आमच्यात येऊन सामील झाल्या, पण बिचारा हेन्रीक (आम्ही त्याला हिज एक्सलन्सी सर हेन्री असे चिडवत असू) परराष्ट्र मंत्रालयाचा अधि-कारी असूनसुद्धा त्याला आमच्या दालनाजवळच दिसेल अशा ठिकाणी फुट-पाथवर उभे राहावे लागले

प्रखर उन्ह पडले होते. उन्हात रहावे लागेल याची कल्पना असल्याने

मिसेस रेईन्कीने आधल्या दिवशी उन्हाळी हॅट खरेदी केली होती आम्हाला युरोपमधल्या त्या उन्हाचे विशेष काही वाटत नव्हते दालनात बसायला जागा होती, पण बहुतेक सर्वजण उभे होते प्रथम आम्ही बसलो होतो परतु मार्च पास्ट (सचलन) सुरवात होताच सर्वच उभे राहिले कुणीतरी दालनात रगीत जाळीदार रुमाल वाटायला सुरवात केली आम्हाला वाटले. कपडे खराब होऊ नये म्हणून बसण्यासाठी त्याचा वापर करायचा असेल, परतु थोड्या वेळाने मिसेस रेईन्के आल्यावर त्यांनी आम्हाला एक एक रुमाल आणून दिला सचलनात भाग घेणाऱ्याना रुमाल हलवून त्याचे स्वागत करण्यासाठी पाहुण्याना सिल्कचे जाळीदार रुमाल वाटले असल्याचे त्यानी सागितले लगेच बसण्यासाठी घेतलेला तो सुदर रुमाल झटकला व हातात घेतला

प्रथम बड्या अधिकाऱ्याची भाषणे झाली नतर उपस्थिताचे स्वागत झाले नतर भव्य मिरवणुकीला प्रारभ झाला कवाईतीच्या कार्यक्रमात विविध बाल्टिक देशातील तसेच पूर्व जर्मनीतील पथके हातात ध्वज घेऊन जाऊ लागली आपल्याकडे प्रजासत्ताक दिनाच्या सोहळ्याला जसे चित्ररथ (फ्लोटस) निघतात तसे जर्मन लोकशाही प्रजासत्ताकाच्या वतीने निरनिराळे फ्लोटस काढले होते ठिकठिकाणी इमारतीवर भितीवर, झाडावर ध्वज फडकत होते लोकाचा अमाप उत्साह ओसडून जात होता तरुण स्त्री-पुरुष, मुले मुली, कामगार, म्हातारे-कोतारे, बाबागाडीत तान्हे मूल ठेवून आयासुद्धा मिरवणुकीत होत्या. बँड पथके तालावर वाजत, गाजत, नाचत जात होती व आम्ही पाहुणे मडळी जाळीदार रुमाल हलवून त्यांचे स्वागत करीत होतो मिरवणुकीतील लोक रुमाल अगर हातातील पुष्पगुच्छ हलवून आमच्या स्वागताला प्रतिसाद देत होते बहुत बडा मजा आया यार ! (रुमाल हलवून हलवून माझा उजवा हात पार दुखायला लागला ती गोष्ट निराळी) रुमाल हलवून मिरवणुकीचे स्वागत करताना आमचे फोटो घेण्याची व्यवस्था करण्यात आली

मिरवणूक रॉस्टॉक शहरातील सर्व प्रमुख रस्त्यावरून जात होती दुतर्फा लोक उभे होते रॉस्टॉक शहराला जत्रेचे स्वरूप प्राप्त झाले होते (फक्त खेळण्याची दुकाने अगर फुगेवाले कुठेच नव्हते) फुटपाथवर खाद्यपेयाची

दुकाने थाटली गेली होती लोक रांगेत उभे राहून खायला–प्यायला घेत व तेथेच उभे राहून खात निरनिराळ्या देशातील बहुरंगी बहुढंगी पेहराव नजरेत भरत होता फक्त आपल्याकडे जत्रेच्या वेळी जसे भिकारी रांगेत उभे राहून भीक मागतात तसे भिकारी मात्र कुठेच दिसत नव्हते त्यामुळे मला ती आपल्याकडील जत्रेसारखी वाटत नव्हती

ठिकठिकाणी खुल्या नाट्यगृहात सांस्कृतिक कार्यक्रम चालले होते आम्ही काही ठिकाणी उभे राहून कार्यक्रम पाहिले दुपारचे जेवण घेतल्यावर काही मैलावरील ' वॉर्न मुंडे ' नांवाच्या बीचवर गेलो हे रॉस्टॉकचे ' कळगूट बीच ' होनोलुलू अगर हवाई बेटाप्रमाणे येथील बीचवर अर्धनग्न, स्त्री–पुरुष सूर्यस्नान व समुद्रस्नान करतात उबदार हवेत वाळूत लहान मुलाप्रमाणे अर्धनग्नावस्थेत लोळून सूर्यकिरणाचा मनसोक्त आस्वाद घेणाऱ्या जर्मन लोकांना पाहून आपण निराळ्याच दुनियेत वावरत असल्यासारखे वाटले बीचवरील एका हॉटेलात ' ट्राय युवर लक ' चा गेम चालला होता प्रत्येकाने बरेच पैसे खर्च केले मीसुद्धा गमतीदाखल २५ पेनिंग खर्च केले, पण प्रत्येक चिठीत ' नित्स ' (म्हणजे नथिंग ) निघाले नंतर आम्ही हॉटेल वार्नोवर परतलो

× × ×

दुसऱ्या दिवशी सकाळी रॉस्टॉक विद्यापीठाच्या डीनसाहेबानी चहासाठी पाचारण केले पाचशे वर्षांहून अधिक वयाचे हे विद्यापीठ १४१९ मध्ये स्थापन झालेले अडीच वर्षापूर्वी या विद्यापीठाने ५१० वा वाढदिवस साजरा केला या विद्यापीठात सुरुवातीला ८०७ विद्यार्थी होते आता ही संख्या ५५०० वर गेली आहे येत्या पंधरा ते वीस वर्षांत आणखी बारा हजार विद्यार्थ्यांची सोय केली जाणार आहे आज या विद्यापीठात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांत ६० टक्के शेतकरी कामगार वर्गातील मुले आहेत विद्यार्थ्यांना स्टायपेंड मिळतो शिष्यवृत्त्या मिळतात वसतिगृहात अल्प दराने जेवायची-राहायची सोय केली जाते (दरमहा फक्त ७० मार्क्स) पैशाच्या अभावी शिक्षणात खण्ड पाडण्याची पाळी एकाही विद्यार्थ्यावर येत नाही

डीनसाहेबानी काफी देऊन आमचे स्वागत केले नंतर आम्ही आंतरराष्ट्रीय पत्रकार परिषदेला गेलो बाल्टिक महोत्सवासाठी आलेल्या देशी-परदेशी सर्व पत्रकारांसाठी ही परिषद होती भाषेची अडचण असल्याने

या परिषदेत आमच्यापैकी फक्त श्री हसन यांच्या एका प्रश्नाची वर्णी लागली प्रश्नोत्तराचा कार्यक्रम जर्मन भाषेतच चालला असल्याने काहीच समजत नव्हते ही पत्रकार परिषद टेलिव्हिजनवरून प्रक्षेपित करण्यात आली अनेक फोटोग्राफरनी आमची छायाचित्रे घेतली मध्ये मी व सरकार असे दोघेजण हळूच बाहेर सटकलो परिषद संपेपर्यंत बाहेर मोकळ्या हवेत थांबलो नंतर सगळे पत्रकार बाहेर पडताच त्यांच्या-बरोबर हॉटेलवर परतलो

दुपारी जेवण घेतल्यावर लगेच आम्हाला वॉर्नमुंडे येथील बीचवर असलेल्या एका प्रशस्त हॉटेलमध्ये परराष्ट्रमंत्री ऑटो विन्झर यांनी आम्हा पत्रकार शिष्टमंडळाला खास मुलाखत दिली मुलाखतीसाठी प्रथम अर्धा तासच ठरला होता, परंतु ही लांबल्यामुळे मंत्रीमहाशयांनी मुदत वाढविली त्यांच्याकडे सुद्धा कॉफी घ्यावी लागली जर्मन मंडळी कॉफीची भोक्ती वाटली अर्थात मी कॉफीवाला असल्याने ते अनायसे माझ्या पथ्यावर पडले म्हणा मुलाखतीत बर्लिनचा प्रश्न, जर्मन लोकशाही प्रजासत्ताकाला भारताची संपूर्ण राजनैतिक मान्यता वगैरे विविध प्रश्नावर चर्चा झाली पूर्व जर्मनीचा बांगला देश प्रकरणी भारताच्या भूमिकेला निःसंदिग्ध पाठिंबा असल्याचे परराष्ट्र-मंत्र्यांनी सांगितले भारताने पूर्व जर्मनीला संपूर्ण राजनैतिक मान्यता द्यावी असा आग्रह धरला ही मुलाखत अत्यंत खेळीमेळीच्या वातावरणात पार पडली

मुलाखतीनंतर आम्ही हॉटेलच्या गच्चीवरील हॉलमध्ये बसून रिफ्रेशमेन्टस घेतली या गच्चीवरून सबंध रॉस्टॉक शहर व बाल्टिक समुद्राचा देखावा दिसतो बीचवरील रंगीबेरंगी राहुटया मुंग्यासारखी दिसणारी माणसे व टिपक्या टिपयासारखी घरे फारच सुंदर दृश्य दिसत होते नंतर वॉर्नमुंडेहून आम्ही हॉटेल वॉर्नोला परतलो इकडची सगळी दुकाने सहा वाजता बंद होतात ते पाहून मला गोव्याची आठवण झाली गोव्यातली पोर्तुगीज अमदानीत सहा—सात वाजताच सर्व दुकाने बंद व्हायची (अद्याप गोव्यात काही काही दुकाने लवकर बंद होतात ) मला वाटते, ही युरोपियन देशाची प्रथा असावी गोव्यात पोर्तुगीजानीच ती रूढ केली असावी

४ ४ ४

रात्री जेवणाच्यावेळी एक दांपत्य आमच्याबरोबर पाहुणे म्हणून उपस्थित होते शिप्टमंडळातील एक सदस्य श्री हसन यांचे एक मित्र श्री असदुल्ला जर्मन पत्नीसह जेवायला आले होते ते उन्हाळ्याच्या सुटीनिमित्त रॉस्टॉक बंदरात आले होते व श्री हसन यांना भेटायला आले होते बरोबर दीडदोन वर्षांचे मूल होते रात्रीची वेळ टळून गेली असल्याने ते मूल पेंगायला लागले जेवण न घेता ती कर्तव्यदक्ष माता मुलाला घेऊन बाहेर लाऊन्जमध्ये बसली मुलाला खेळवू लागली श्री असदुल्ला यांनी आमच्याबरोबर जेवण घेतले तोपर्यंत त्यांच्या पत्नीचे जेवण टेबलावर हिटिंगची सोय असलेल्या स्टॅण्डवर झाकून ठेवण्यात आले जेवण आटोपताच श्री असदुल्ला बाहेर गेले व त्यांनी पत्नीला जेवायला पाठविण्याचा आग्रह केला, परंतु मूल पुन्हा त्रास देईल व जेवणाच्या बैठकीचा ‘ मूड ’ बिघडेल या भीतीने त्या माऊलीने जेवण घेण्याचे नाकारले नवरा मुलाला घेऊन खेळवत बसण्यास तयार असताना ती माऊली मुलाला त्या स्थितीत नवऱ्याकडे ठेवून स्वत जेवायला तयार होईना घरी काही तरी खाईन आता आपण घरी जाऊ या असे सांगून त्यांनी आमचा निरोप घेतला येऊन जाऊन सगळीकडे मातृहृदय सारखेच भारतीय माता काय जर्मन माता काय। मुलाला झोप आलीच हे पाहिल्यावर तिला मुलापुढे कशाची म्हणजे कशाचीच पर्वा वाटत नाही एका बाजूने ती माऊली उपाशीपोटी परत गेली हे पाहून वाईट वाटले व एका बाजूने जर्मनीतसुद्धा आपल्याकडील भारतीय मातेप्रमाणेच प्रेमळ माता पाहून बरे वाटले

रॉस्टॉकमधील मुक्काम संपला उद्या आम्हाला बर्लिनला लवकर निघायचे असल्याने रात्रीचा फेरफटका फारसा न लांबविता आम्ही लवकर ताणून दिले

रॉस्टॉक शहराला ' विडरझेन ' करून आठच्या सुमारास आम्ही बर्लिनच्या दिशेने मार्गस्थ झालो रॉस्टॉक शहर आम्हाला आवडल मुरगाव बंदराच्या परिसरात विकसित झालेल्या वास्को शहराच्या धर्तीच हे टुमदार शहर सोडल ताना जीव जड झाला प्रथम आमचा बेत आरामशीर उठून ब्रेकफास्ट घ्यायचा, दहाच्या सुमारास रॉस्टॉक सोडायच, दुपारी बर्लिनला पोचल्यावर जेवण घेऊन आराम करायचा अन् मग सुप्रसिद्ध ' बर्लिनची भित ' अर्थात बाडनबर्ग गेटला भेट द्यायची, परतु सकाळीच आमच्या हॉटेलवर परराष्ट्र खात्याकडून निरोप आला की, पाहुण्याना ठरल्याप्रमाण बर्लिनला दुपारी १ वाजता बर्लिनच्या भितीला भेट देण्याच्या कार्यक्रमाला घेऊन या त्यामुळ आम्हाला सकाळी लवकर उठून बर्लिनचा मार्ग धराव। लागला आमच्या जर्मन यात्रेचा प्रारभ बर्लिन शहराने झाला होता व यात्रेची सागता बर्लिन शहरात तीन दिवसाच्या मुक्कामाने होणार होती जर्मन भूमीवर पाऊल टाकले तेव्हा बर्लिन शहर झोपेत होते आता आम्हाला बर्लिनचे व्यवस्थित दर्शन घडणार होते बर्लिनला येण्याच्या सुमारास आमचा ड्रायव्हर गेहार्ट जरा आजारी झाला होर्मूद ड्रायव्हर मात्र तेजीत होता बर्लिनला येताना दोघजण चांगलेच खुषीत होते कारण इतके दिवस आमच्याबरोबर दौऱ्यावर असल्याने ते होमसीक झाले होते व कधी एकदा बर्लिन गाठतो अस त्याना झाल होत आम्हीसुद्धा त्यांच्याइतकेच किंबहुना त्याच्याहून अधिक होमसीक झालो होतो ते ड्रायव्हर बर्लिनलाच राहणारे व काही दिवस बर्लिनच्या बाहेर पण जर्मनीतच होते आम्ही तर हजारो मैल दूर देश, घरदार, मुलबाळ सोडून आले होते आता घरी परतण्याचे वेध आम्हालाही लागले होते

रॉस्टॉक ते बर्लिन चार तासांचा प्रवास दोन्ही ड्रायव्हर वाटेत पोरीबाळींची टिंगल, थट्टामस्करी करीत आपल मनरजन करून घेत होते रस्त्यात जाताना एकादी तरुणी दिसली की, गाडी किंचित स्लो करून या पठ्ठ्यानी तिला शेलका अहेर पोचविला म्हणून समजाव अन् त्या जर्मन पोरी तरी कसल्या ? अगदी बस्ताद स्मार्ट व स्पोर्ट त्या हसून अहेराला प्रतिसाद देत प्रथम आम्हाला ते किंचित खटकायच मिसेस रेईन्के प्रौढ आजीबाई असून देखील त्या ड्रायव्हरना पोरीबाळींची छेड काढण्याच्या कामी प्रोत्साहन

द्यायच्या ड्रायव्हराची जर्मन भाषेत मनमुराद थट्टामस्करी करीत त्याच्यात सामील व्हायच्या. ड्रायव्हराचे हे वर्तन कदाचित पाहुण्यांना खटकेल म्हणून त्यांनी खुलासा केला की, 'दोघही ड्रायव्हर विवाहित आहेत त्यांना मुलबाळ आहेत केवळ मजा म्हणून ते मुलींची थट्टा करीत आहेत त्यात त्यांचा वाईट हेतू नसतो अगदी निष्पाप, निर्लेप मनान ते, 'पासटाईम' करीत आहेत जर्मन मुलीसुद्धा त्यांची थट्टा जाणतात म्हणून त्या चिडत नाहीत

दोघेही ड्रायव्हर अगदी रुबाबदार कपड्यात होते त्यांचा थाट साहेबी होता जर्मनीतील ड्रायव्हरना गाडी हाकतेवेळी दारू प्यायला बंदी आहे साधी बियरदेखील त्यांना पिता येत नाही ड्रायव्हरने झोकली असल्याचा ट्रॅफीक पोलिसाना सशय आला तर ते त्याला बलून फुगवायला लावतात बलून फुगवेपर्यंत त्याची नशा तर उतरतेच, पण फुग्यातील रगीबेरंगी थुंकीवरून त्यान मद्य घेतल किंवा नाही हे सिद्ध होत लगेच त्याला शिक्षा होते

आमच्या ड्रायव्हरन तर आपल्या रुबाबान कशी गमत झाली याचा किस्सा सुनावला एकदा असेच पाहुण्यांना घेऊन एका कार्यक्रमाला जायचे होते त्या कार्यक्रमाला पाहुणे उशिरा पोचणार होते म्हणून पाहुण्यानी ड्रायव्हरमार्फत निरोप पाठविला की, आपणास थोडा विलंब होईल ड्रायव्हर निरोप देण्यासाठी एकटाच पुढ गेला कार्यक्रमाच्या ठिकाणी प्रवेशद्वारावर लोक पाहुण्यांची वाट पहात होते ड्रायव्हर उतरला व त्यान तोंड उघडण्यापूर्वीच पुष्पगुच्छ देऊन ड्रायव्हरच स्वागत करण्यात आल ड्रायव्हरलाच पाहुणे समजल्यान त्याची फसगत झाली होती व त्याचा हा गैरसमज दूर करता करता त्या ड्रायव्हरच्या नाकी नऊ आले

वाटेत थोडा वेळ थाबलो आईस्क्रीम घेतल थोडे फ्रेश झाली जर्मनीतली. आईस्क्रीम छानच असत अस्सल दुधाच्या क्रीमपासून बनविलेल हॉटेलमध्ये 'टॉयलेटेन' (म्हणजे लॅव्हेटरी) ची चौकशी केली आपल्याकडे स्त्रियांसाठी निराळी व पुरुषासाठी निराळी असते तशीच त्यांच्याकडे दोन निरनिराळ्या 'टॉयलेटेन' असतात एकावर 'हरेन (म्हणजे पुरुष) व दुसऱ्यावर 'दामेन' (म्हणजे स्त्रिया) असे चित्रफलक असतात काही ठिकाणी लघवीला जाऊन आल्यावर हात तोंड धुण्यासाठी बेसीनचा उपयोग करायचा झाला तर त्याबद्दल दहा पेनिंग मोजावे लागतात प्रत्येक 'टॉयलेटेन'च्या येथे एक इसम

बसलेला असतो त्याला ते पैसे द्यावे लागतात जर्मन लोक लघवीला जायचे असेल तर ' जरा हात धुऊन येतो' असे अलंकारिक मोघम भाषेत बोलतात आम्ही असेच मोघम बोलायचे म्हणून त्याचा जर्मन ' हरेन' हा शब्द गाठीला बांधून ठेवला होता बराच वेळ झाला व हॉटेलमध्ये मुक्काम करावा लागला तर प्रथम आम्हाला ' हरेन'ची आठवण व्हायची

ड्रायव्हर घरच्या ओढीने गाडी हाकत असल्याने त्यांनी घोड्याच्या वेगाने गाड्या दौडत आणल्या बाराच्या आत बर्लिनचा परिसर दिसू लागला- बर्लिन शहर कसं दिसतं हे आता दिवसा उजेडी पहायला मिळाले बर्लिनच्या उपनगरातील घर प्रशस्त होती बर्लिन शहरात शिरताना मिसेस रेईन्के यानाही भलताच आनंद झालेला दिसला कारण त्या अगदी लहान मुला- प्रमाणे बडबडत सुटल्या बर्लिनच्या महतीचे पोवाडे गाताना त्याचा घसा बसला

बर्लिनची शान-नजाकत पाहून थक्क झालो त्या भव्य गगनचुंबी इमारती पाहून डोळे दिपले ऐसपैस रस्ते, आधुनिक ट्रामगाड्या, ट्यूब रेल्वे महा- युद्धात बर्लिन शहर बेचिराख झालेले ऐकून माहीत होते, परंतु त्याचा नामोनिशा कुठच दिसत नव्हता उध्वस्त इमारतीच्या ढिगाऱ्यातून एक नवीन रमणी उदयास आली होती व ती पाहुण्यांचं स्वागत करीत होती काळोखा- तून एकदम झगझगीत प्रकाशात आल्यावर माणसाचे डोळे कसे दिपतात तसा अनुभव आला

अलेक्झांड्रा प्लाझ (म्हणजे चौक) मध्ये हॉटेल बरोलीना नावाचं एक आलिशान हॉटेल आहे या हॉटेलमध्ये या खेपेला आमची उतरण्याची व्यवस्था झाली होती या हॉटेलमध्ये आम्हाला स्वतंत्र खोली देण्यात आली होती दोन बेडस, रेडिओ, टेलिफोन, टब सर्व काही होतं खिडकीतून बर्लि- नच्या हमरस्त्यावरील रहदारी दिसायची आम्ही प्रथम सामान हॉटेलमध्ये आणून टाकलं वाटेत मिसेस रेईन्केनी आपल्या फ्लॅटवर गाडी थांबविली, सामान नेऊन वर टाकलं तिच्याबरोबर आम्ही सर्वजण तिचा चार रूमचा फ्लॅट पाहून आलो घरात दोघंच नवरा बायको राहतात एकच मुलगा त्यानं इंग्लिश मुलीशी लग्न करून तो इंग्लंडलाच स्थायिक झाला होता बाईनी फ्लॅट टिपटॉप ठेवलेला होता


नंतर आम्ही बर्लिनच्या निरनिराळ्या भागातून हिंडत ब्रॅंडनबर्ग गेटवर गेलो बर्लिनच्या मुख्य रस्त्यावर ही 'बर्लिन भिंत' उभारण्यात आली आहे अद्याप एक वाजला नव्हता ब्रिटनहून एक प्रतिनिधी मंडळ दौऱ्यावर आलं होतं त्या मंडळालाही आमच्याबरोबर ठीक १ वाजता भिंतीला भेट देण्याचं निमंत्रण होतं थोडा वेळ होता म्हणून आम्ही जवळपास भटकायला गेलो 'उन्टर डेन लिन्डेन' हा भाग एकेकाळी सावली देणाऱ्या लिंबाच्या झाडासाठी प्रसिद्ध होता ३२१ लिंबाच्या झाडाची लिंबराई उन्हाळ्यात विसाव्याचे ठिकाण होते जर्मन भाषेत लिंडेन म्हणजे लाईम ट्री (लिंबाचे झाड) १९४५ च्या आत बॉम्बहल्ल्यातील ढिगाऱ्यात ही लिंबाची झाडे नाहीशी झाली आज 'लिंडेन' निराळ्या अर्थाने प्रसिद्ध झाले आहे लिंडेनच्या टोकाला जगप्रसिद्ध ब्रॅंडनबर्ग गेट आहे हुम्बोल्ट विद्यापीठ आहे जर्मन स्टेट ऑपेराहाऊस, स्टेट लायब्ररी, फॅसिझमला बळी पडलेल्या हुतात्म्याचे स्मारक, निरनिराळ्या देशांच्या वकिलाती 'उन्टेर डेन लिन्डेन' भागातच आहेत आपली भारतीय वकीलात पण येथेच आहे. हुतात्म्यांचे स्मारक पाहिले हुतात्मा स्मारकाची इमारत छोटीशी आहे प्रवेशद्वारावर पुतळ्याची पोझ घेऊन दोन सशस्त्र पहारेकरी खडे असतात पापणीची हालचालसुद्धा न करता अर्धा तास पुतळ्यासारखे राहतात व अर्धा तास संपताच ताज्या दमाची नवी पहारेकरी जोडी त्यांची जागा घेतात व ते पण अर्धा तास पुतळ्यासारखे राहतात अर्ध्या अर्ध्या तासाच्या इंटरव्हलने पहारेकरी बदलत असतात चोवीस तास हुतात्मा स्मारकासमोर खडा पहारा चालूच असतो अवघ्या काही सेकंदाच्या आत अदलाबदली होते ते दृश्य प्रेक्षणीय असतं आत शिरलो चौकोनी आकाराची इमारत मध्यभागी विद्युत् ज्वलत ज्योत धगधगत असते हुतात्म्याची आठवण राहावी यासाठी ज्वलंत ज्योतीच स्मारक उभारण्याची कल्पना अभिनव वाटली भिंतीवर हिटलरच्या अत्याचाराची गाथा कोरलेली आहे शूर वीराच्या पराक्रमाची नोंद केली आहे

लिंडेन हे शॉपिंग सेंटर आहे कपड्याची, दागदागिन्याची, पुस्तकाची, कलात्मक वस्तूंची दुकानं या भागात पुष्कळ आहेत रस्त्यावरून पांढऱ्या पिवळ्या डबलडेकर (दुमजली) बसेस धावतात मोटारींच्या रांगा लागलेल्या असतात दोन्ही बाजूनी रस्त्यावरून माणसांची रहदारी, वर्दळ चालूच असते नव्या बर्लिनचा हा भाग फारच छान आहे

लिंडेनमधून फेरफटका आटोपून आम्ही ठीक एक वाजण्याच्या सुमारास ब्रँडनबर्ग गेटवर परत आलो १९४९ साली बर्लिनची फाळणी झाली पूर्व व पश्चिम बर्लिन अशी दोन शहरे अस्तित्वात आली पूर्व बर्लिन ही पूर्व जर्मनीची राजधानी बनली पश्चिम बर्लिन हे शहर तेवढे पश्चिम जर्मनीच्या ताब्यात राहिले, परंतु सभोवतालचा प्रदेश पूर्व जर्मनीच्या ताब्यात आहे पूर्व जर्मनीच्या मध्यभागी पाश्चिमात्याचे हे मोक्याचे ठाणे आहे येथून पूर्व जर्मनीची समाजवादी समाजव्यवस्था उलथून पाडण्याची कारस्थाने शिजली जातात. म्हणून स्वसरक्षणार्थ पूर्व जर्मनीने पश्चिम व पूर्व बर्लिन याच्यामध्ये ही जग-प्रसिद्ध भित उभारलेली आहे या भितीवर कडेकोट सशस्त्र पहारा बसविण्यात आला आहे

ब्रँडनबर्ग गेटच्या प्रवेशद्वारावर सीमा रक्षकाच्या कमाडटने (सेनानी) आमचे हार्दिक स्वागत केले मुख्य इमारत म्हणजे सहा खांबी प्रवेश दरवाजा आहे वर चौखुर उधळणारे घोडे व सिह सारथी बसलेला असे चित्र आहे वर राष्ट्रीय ध्वज फडकत आहे मुख्य कचेरीत येऊन आम्हाला बर्लिन भितीचा इतिहास समजावून सागितला सेनानीचे नाव होते कॅप्टन बायर गेली दहा वर्षे तो बर्लिन सीमारक्षक सेनेचा प्रमुख होता आपणास पाश्चिमात्य राष्ट्राच्या प्रक्षोभक कृत्याना कसे तोंड द्याव लागते याचा त्यानी आढावा घेतला ते म्हणाले, '१९६१ पासून आतापर्यंत पश्चिम जर्मनीकडून ५० हजारांवर प्रक्षोभक कृत्ये झाली आहेत १९६४ पर्यंत पूर्व जर्मनीची समाजव्यवस्था उलथून पाडण्यासाठी त्यानी शिकस्त केली, परंतु आम्ही सीमेच्या रक्षणाचा कडेकोट बदोबस्त केल्यामुळे आता हा धोका कमी झाला आहे पश्चिम जर्म-नीच्या लष्करशहानी पूर्व जर्मनीत बेकायदा प्रवेश करण्यासाठी बोगदे खोदले. १८० किलोमीटर क्षेत्रफळ व २ हजार लोकवस्ती असलेल्या त्याच्या छोट्याशा भागात ८० हेरगिरीची केंद्रे व व ७७ संघटना आहेत तीस हजार सशस्त्र सैनिक आहेत

पश्चिम बर्लिनमध्ये प्रवेश करण्यासाठी २० क्रॉसिंग पॉईंट (नाकी) आहेत दर वर्षी या ठिकाणाहून सुमारे चार कोटीहून अधिक लोक ये-जा करीत असतात रेल्वेगाड्यातून ३० हजार व बोटीतून २० हजार लोक येत जात असतात



रोस्टोक येथील
वार्षिक महोत्सवाचे दृश्य.



फ्रान्कफुर्ट ऑन ओडर येथील एका पोलाद कारखान्याचे दृश्य

प्रचलित सीमारेषेला मान्यता देणे हा युरोपियन सुरक्षिततेचा मुख्य प्रश्न आहे जर्मन लोकशाही प्रजासत्ताकाला मान्यता व शांततामय सहजीवन एवढ्याच आमच्या माफक अपेक्षा आहेत आम्हीसुद्धा पश्चिम बर्लिनचा खास दर्जा मान्य करायला तयार आहोत असे कमांडटनी सांगितले

आम्हाला सिने स्लाईड दाखवून पाश्चिमात्याच्या प्रक्षोभक कृत्यांचा परिचय करून देण्यात आला नंतर बर्लिन भिंतीचा बिल्ला प्रतीक म्हणून भेट देण्यात आला ब्रँडनबर्ग गेट व बर्लिन शहरातील प्रमुख इमारतींच्या रंगीत छायाचित्रांचा सेट दिला बर्लिनची भिंत म्हणजे सात आठ फूट उंचीच्या कम्पाउंडसारखी आहे भर मुख्य रस्त्यावर ही भिंत बांधून रस्ता अडविण्यात आला आहे आम्ही गेटवर उभे राहून पश्चिम बर्लिनमधील रहदारी बघितली सोव्हिएत युद्ध स्मारक पाहिले ओव्हल आकाराचा चबुतरा असून त्या ठिकाणी हिटलरच्या फॅसिझमपासून देशाचे व बर्लिनचे संरक्षण करताना धारातीर्थी पडलेल्या पाच हजार रशियन सैनिक व अधिकाऱ्यांचे दफन करण्यात आले आहे प्रतीकादाखल त्या चबुतऱ्यावर हिरवळ राखण्यात आली आहे त्या स्मारकाचे रक्षण करण्यासाठी खडा पहारा असतो गेटवरून हिटलरच्या राजकारणाची सूत्रे ज्या ठिकाणाहून हलत होती त्या रेईशतागची भव्य इमारत दिसते. आता त्या इमारतीवर शोककळा पसरली आहे

भिंतीच्या जवळ असंख्य पश्चिम बर्लिनर उभे होते हातात कॅमेरे घेऊन गेटमधील लोकांचे ' फोटू ' घेत होते कमांडटच्यासमवेत आम्ही गेटवर उभे असताना आमचीही छायाचित्र घेतली भिंतीवर सर्व ठिकाणी सशस्त्र सैनिक डोळ्यात तेल घालून पहारा करतात त्यांना वश करण्यासाठी पैसा, अश्लील चावट साहित्य, वेश्या, सिगरेटी वगैरे प्रलोभने दाखविली जातात, परंतु सीमारक्षकांना सीमेपलीकडे चाललेले काहीच दिसत नाही काहीच ऐकू येत नाही बिगर परवाना पूर्व जर्मन हद्दीत प्रवेश करणाऱ्यांना गोळ्या घालण्याचे हुकूम त्यांना देण्यात आलेले आहेत ब्रँडनबर्ग गेटच्या बॅकग्राऊंडवर सेनानीसमवेत आमचे फोटो घेण्यात आले नंतर आम्ही बर्लिन भिंत सोडली (ही भिंत पाहून झाल्यावर मला का कुणास ठाऊक उगाच संत ज्ञानेश्वर महाराजांनी चालवून दाखविलेल्या भिंतीची आठवण झाली आळंदीला गेलात तर ज्ञानोबा माऊलींनी चालवून दाखविलेली प्रसिद्ध भिंत ती हीच बर का ! येथे पाच

आणे ठेवा असे तेथील पंडे सांगतात ही रेड्याची समाधी, ज्ञानेश्वरांनी ज्या रेड्याच्या तोंडून वेद वदवून दाखविले त्याच रेड्याची ही समाधी बर का ! येथे पाच आणे ठेवा असे पंडे महाराज सांगतात व भाविकांच्या भावनांचा गैरफायदा घेतात, परंतु समाजवादी जर्मनीत अगदी तशाच भावनेने पाहुण्यांना बर्लिन ' भिंत ' दाखविली जाते फरक एवढाच की पंड्यासारखे येथे पाच आणे ठेवा असे कुणीच सांगत नाही )

दुपारचे अडीच वाजून गेलेले, पोटात कावळे कोकलू लागले होते मिसेस रेइन्के आम्हाला घेऊन थेट एका उत्तमपैकी हॉटेलात गेल्या ' या हॉटेलमधले जेवण उत्तम असते अस शिफारसपत्र बाईंनी दिले आम्ही जाऊन बसलो ऑर्डर दिली गेली खास वाईल्ड बोअरचे मांस आणतो असे सांगून वेटर जो गडप झाला तो तास लोटला तरी उगवलाच नाही तो बहुधा जंगलात वाईल्ड बोअरच्या शिकारीला गेला असावा असे आम्हाला वाटायला लागले चौकशी अंती तो पाहुण्यासाठी खास जेवण बनविण्यास स्वयंपाकात गर्क असल्याचे कळले साडेचार वाजले तरी जेवणाचा पत्ता नव्हता आता आमची भूक मेली होती बाईंनी बर्लिनमध्ये आम्हाला चांगले जेवण घातले होते असे म्हणायचे नंतर जेवण आणले आम्ही कसेबसे पोटात रिचवले व हॉटेल बरोलीनावर आलो इतके काही कंटाळलो, दमलो होतो की, कधी खोलीवर जाऊन विश्रांती घेतो असे आम्हाला झाले

हॉटेल बरोलीना सोळा मजली आहे कार्ल मार्क्स अॅली (आळीसारखेच वाटते जर्मनीत अॅली म्हणजे गल्ली नव्हे तर विभाग) नंतर अलेक्झांडर प्लाझ आहे याच्यामध्ये आमचं हॉटेल आहे समोर आधुनिक पद्धतीच ' इंटरनॅशनल सिनेमा ' नावाचं थिएटर आहे रस्ता ओलांडला की, मॉस्कावा रेस्टॉरंट आहे हॉटेल बरोलीनात शिरताना स्वयंचलित काचेचे दरवाजे दिसले आपण जवळ येताच आपोआप उघडले जातात व लगेच बंद होतात प्रवेश करण्यासाठी एक दरवाजा व बाहेर पडण्यासाठी निराळा दरवाजा हॉटेलमध्ये जाऊन कपडे बदलले, परंतु विश्रांती घेण्याऐवजी बर्लिन शहरात एकटेच हिंडण्यासाठी श्री चंदर यांना घेऊन निघालो प्रशस्त रस्त्यावरून क्रॉस करताना तारांबळ उडते विशाल रस्ते आहेत रस्ते ओलांडून जाण्यासाठी भुयारी मार्ग आहेत मुंबईत चर्चगेटला रस्ता ओलांडण्यासाठी भुयारी

क्रॉसिंग आहे, परतु जर्मनीत भुयारी रस्त्याचे विशाल जाळे पसरले आहे. भुयारात उतरल्यावर पातळात शिरल्यासारखे वाटते कुठल्या कुठ जाता येत. वाटेल तेथे वर येता येते चढण्या–उतरण्यासाठी स्वयचलित जिने आहेत नुसते उभे राहायची खोटी आपोआप आपण वर चाललो बिनासायास बर्लिनच्या विशाल रस्त्यावरून हिंडताना आपण निराळ्याच दुनियेत वावरत असल्याचे जाणवत होत तेवढ्यात आमच्यापासून उच, भव्य, मध्यभागी गोलाकार मनोरा दिसला

हा बर्लिनचा टेलिव्हिजन टॉवर जर्मन लोकात 'टेलिसपार्गेल' या नावाने प्रसिद्ध आहे या नवीन टी व्ही टॉवरची उची ३६५ मीटर आहे. युरोपमधील उच टॉवरमध्ये बर्लिनच्या टी व्ही टॉवरचा दुसरा क्रमाक लागतो हा बर्लिन नगरीच्या गळ्यातील सर्वांत मोठा दागिना आहे या टी व्ही जवळच रेड टाऊन हॉल आहे या हॉलच्या इमारतीला लाल विटा वापरल्या असल्याने त्याला 'रेड' (लाल) टाऊन हॉल हे नाव पडल. एकोणीसाव्या शतकाच्या दुसऱ्या मध्यात हा बाधण्यात आला

टी व्ही टॉवर ९९ मीटर लाब, ८८ मीटर रुद व ७४ मीटर उच आहे. मनोरा 'आयत' (Rectangular) आकाराचा आहे दिल्लीच्या कुतुब-मिनाराची आठवण करून देणारा फरक एवढाच की, मनोरा वर वर निमुळता होत गेला आहे व टोकाला पृथ्वीच्या आकाराचा गोल आहे

लेलिन प्लाझा ओलाडून आम्ही टी व्ही टॉवरच्या पायथ्याशी आलो. तळमजल्यावर वर जाण्याचे तिकीट खरेदी करण्यासाठी मोठी राग लागलेली होती आम्ही पण त्या रांगेत उभे राहिलो एक मार्क देऊन तिकीट घेतले लिफ्टच्या साहाय्याने मनोऱ्याच्या टोकावरील गोलात जाऊन पोचलो तो गोल म्हणजे एक फिरते हॉटेल (रेस्तॉरा) होते हे मागाहून समजले तो गोल पृथ्वीप्रमाणे फिरत होता या गोलाला ३६ काचेच्या तावदानाच्या खिडक्या होत्या या तावदानावर शहराच्या इतिहासाची व विकासाची चित्रे चितारण्यात आली होती आम्ही हॉटेलमधील खुर्च्यांवर विराजमान झालो गोल फिरताना बर्लिन शहराचे दर्शन नेत्राच पारण फेडत होत मलबार हिलवरून मुबापुरीच्या काही भागाच दर्शन घडत, परतु या मनोऱ्यातील गोलात बसून बर्लिनचे निरनिराळे भाग एकाच वेळी बघता येत होते

महालक्ष्मीच्या जत्रेत मुलाना गोलाकार फिरणाऱ्या चक्रातील पाळण्यात अनेकदा बसविल होत, परतु मी स्वत. कधी चक्राकार फिरणाऱ्या पाळण्यात बसल्याच आठवत नाही बर्लिन शहरात मात्र टी व्ही टॉवर पाहण्याच्या निमित्तान गोल गोल फिरणाऱ्या या हॉटेलमध्ये बसून ते सुख अनुभवण्यास मिळाल

टी व्ही टॉवर पाहून झाल्यावर लिफ्टमधून खाली उतरलो पहिल्याच दिवशी बर्लिन नगरीच सम्यक दर्शन घडल होत दुपारी नीट जेवण न झाल्यामुळ असेल कदाचित पण अगदी गळून गेल्यासारख वाटल मित्र भटकायचा आग्रह करीत होता, परतु मी खुल्या बागेतील सिमेंटच्या बाकड्यावर टेकलो आजूबाजूच्या बाकावर प्रणयी जोडपी प्रणयाराधनेत गुग झाली होती उघड्या जागेत मुल बागडत होती हवेत गारठा होता थोडा वेळ विश्रांती घेऊन हॉटेल बरोलीनावर परतलो

४ ४ ४

**बर्लिन** हे प्राचीन शहर आहे पाच हजार वर्षा-पूर्वी सुद्धा शहरात मानवी वस्ती असल्याचा पुरावा आहे १२२४ सालच्या कागदपत्रात बर्लिनचा उल्लेख सापडतो आज बर्लिन शहराची लोकसख्या १०,८२,००० आहे बर्लिन व कॉलीन या दोन स्वतत्र राज्याच मीलन होऊन चौदाव्या शत-काच्या प्रारभी बर्लिनचा उदय झाला त्यानतर शभर वर्षाच्या आत ते मोठे व्यापारी केंद्र बनले अठराव्या शतकाच्या अखेर ते सास्कृतिक केद्र बनले. शहराच्या इतिहासात जोहान वोल्फगॉग गटे यांनी ७७८ साली बर्लिनला भेट दिल्याची नोंद सापडते त्याचे कवी मित्र फ्रेडरिक शिलर १८०४ साली बर्लिन येथे होते 'बर्लिनहून लिहिलेली पत्रे' या पुस्तकाची निर्मिती याच मुक्कामात कवीकडून झाली १८३६ व १८४१ याच्या दरम्यान शास्त्रशुद्ध समाजवादाचे प्रणेते कार्ल मार्क्स १८१० साली स्थापन झालेल्या विद्यापीठात होते त्याच्या नतर काही कालाने तरुण फ्रेडरिक अँगल्स सैनिक या नात्याने बर्लिनच्या हद्दीत आले

हिटलरच्या काळात बर्लिन हेच त्याचे मुख्य सत्ताकेंद्र होते बर्लिन शह-राने दोन महायुद्धांचा अनुभव घेतला १९४५ नतर बर्लिनच्या इतिहासात नवीन पर्व सुरू झाले पॉसडॅम करारानुसार बर्लिनची फाळणी होऊन पूर्व विभागात समाजवादी जर्मनीची राजधानी स्थापन झाली

जर्मन लोकशाही प्रजासत्ताकच्या राजसत्तेचे सर्वोच्च अधिष्ठान पीपल्स चेम्बर हे आहे या चेम्बरमध्ये ४३४ डेप्युटी आहेत पैकी बर्लिनचे ६६ प्रतिनिधी आहेत या डेप्युटींचे प्रमाण पुढीलप्रमाणे आहे औद्योगिक व कचेरी कामगार ७२ टक्के, सहकारी शेतकरी ९ टक्के, बुद्धिवादी ७ टक्के व इतर १२ टक्के 'अत करण व झटपट चालणारी जीभ' यासाठी बर्लिनवासियांची

ख्याती आहे ते सडेतोड, हुशार, गंभीर, पण तेवढेच आनंदी लोक आहेत आदरातिथ्य व पाहुणचार करण्याबाबत भारतीयाएवढेच तत्पर आहेत

बर्लिनचा अस्वलाशी अभेद्य असा संबंध आहे किंवा अस्वलाचं बर्लिन-वासियांशी अतूट असं नातं आहे असं म्हटलं तरी चालण्यासारखं आहे शतकानुशतकापासून बर्लिनवासीय अस्वलांच्या हातात हात घालून नांदत आले आहेत 'बर्लिन अस्वल' हे या शहराचं प्रतीक बनलं आहे प्रत्येकाच्या गळ्यातला ताईत बनलं आहे मार्किशीस म्युझियममधील प्राणी संग्रहालयात अस्वल उद्यान आहे या उद्यानातील जिवंत अस्वलाचं फार कोडकौतुक केलं जातं

मी बर्लिनच्या एका दुकानात हिंडताना मीठ व मिरी यांच्यासाठी प्लॅस्टिकची दोन भांडी घेतली केवळ आठवण म्हणून जवळून एक सेल्स गर्ल जात होती तिचं लक्ष माझ्या छोट्या खरेदीकडे गेलं ती माझ्याकडे वळून म्हणाली, 'आपण बर्लिन अस्वल कोरलेले ते भांड अवश्य घ्या बर्लिन शहराची आठवण म्हणून असू द्या '

इतके बर्लिनवासियांना अस्वलाचं प्रेम आहे सातशे वर्षांपूर्वी म्हणे बर्लिन शहराच्या जंगलभागात अस्वलाचा स्वैरसंचार चालत असे आता अवाढव्य विस्तार पावलेल्या बर्लिन शहरातील कोलर्नीचेर पार्कमध्ये अस्वलांना मर्यादित जागेत संचार करण्यासाठी सोय करण्यात आली आहे हा पार्क पाहण्यासारखा आहे, परंतु मुंबईतील राणीबागेसारखा हा काही ऐसपैस प्राणीसंग्रहालय वाटला नाही. मार्किशीस म्युझियम प्रेक्षणीय आहे आर्किटेक्ट ममहार्ड यांनी तयार केलेला १६४८–५ सालचा जुना शहर प्लॅन पाहण्यासारखा आहे

बर्लिनमधील रेड टाऊन हॉलची इमारत शहराच्या मध्यभागी आहे या इमारतीत म्युनिसिपल असेंब्लीची बैठक भरते निरनिराळ्या क्षेत्रातील लोकांचे २०० प्रतिनिधी महापालिकेत निवडून दिले जातात २० डेप्युटींपैकी ७ तरी कामगार अगर पगारवाले कर्मचारी असतात पूर्व जर्मनीत पुरुषांइतकेच स्त्रियांना समान हक्क आहेत बर्लिनच्या १०,८२,२२८ लोकसंख्येपैकी ६०२,५८८ स्त्रिया व ४,७९,६४० पुरुष आहेत म्हणजे प्रत्येक १०० पुरुषामागे १२६ स्त्रिया असं प्रमाण आहे

१९४५ साली युद्धानंतर उध्वस्त नगरीचा ढिगारा उपसण्याचं काम करण्या-साठी जवळ जवळ ६० हजार लोकांनी कंबरा कसल्या पैसे न घेता व बरोबर कोरडा काळा पाव एवढ्या सामग्रीनिशी या लोकांनी श्रमदानानं प्रचंड काम-गिरी पार पाडली यापैकी २२ हजार स्त्रिया होत्या या स्त्रियांच्या मेहनतीचं प्रतीक म्हणून रेड टाऊन हॉलच्या समोर प्रसिद्ध शिल्पकार प्रो फ्रित्झ क्रेमर यांनी घडविलेले ब्राँझचे दोन पुतळे उभारण्यात आले आहेत खांद्यावर फावडं टाकून उभी असलेली 'रबल वुमन' (ढिगारा महिला) जर्मन स्त्री व तिच्या बाजूला 'बिल्डिंग हेल्पर' (बांधकाम मदतनीस) मदतनीस स्त्री दाखविण्यात आली आहे

महायुद्धात बर्लिनमधील १ लक्ष ८५ हजार घरे संपूर्णपणे उध्वस्त झाली होती व ४,००,००० घरांची बरीच मोडतोड झाली होती समाजवादी जर्मन सरकारने १९६८ पर्यंत ९८,४०० नवीन घरे बांधली हजारो घरांची दुरुस्ती केली ७५० हेक्टर जमिनीच्या भागावर बांधकामासाठी रोज १० लक्ष मार्क्स खर्च केले जातात बर्लिनमध्ये गगनचुंबी इमारतीचं बांधकाम अवघ्या एका महिन्याच्या अवधीत पुरे केले जाते घराच्या भिंती, दार, खिडक्या, फ्लोअर वगैरे सर्व भाग कारखान्यात तयार होतात क्रेनच्या साहाय्याने ते भाग आणून असेंबल् केले जातात की झाली इमारत तयार झटपट रंगाऱ्याचे काम. पूर्व-रचित इमारतीमुळे बर्लिन शहराचं स्वरूप आमूलाग्र बदलून टाकलं आहे

मॉस्कोतील गॉर्की स्ट्रीट, वॉर्सा येथील मार्शलकोवस्का व लंडनचा ट्रॅफ-ल्गर स्क्वेअर जसा प्रसिद्ध आहे तसा बर्लिनचा अलेक्झांड्रा प्लाझ प्रसिद्ध आहे पाच मोठे रस्ते व ट्रामरस्ते यांचं भलं मोठं क्रॉसिंग या ठिकाणी आहे मोटारीनं 'ॲलेक्स' क्रॉस करून जाणं किती अवघड असतं याचा अनुभव बर्लिनमध्ये मोटारीनं प्रवास करणाऱ्यांना सहज येतो प्रत्येक तासाला १३६ ट्रामगाड्या स्क्वेअर क्रॉस करतात

बर्लिन शहराचं रस्त्यांचं जाळं १९०० किलोमीटर लांब आहे. सगळ्या रस्त्यांची एकत्रित लांबी मोजली तर बर्लिन ते मॉस्कोएवढं अंतर होईल ३८,८०० रस्त्यावरच्या दिव्यामुळे रात्रीच्या वेळी झगझगीत प्रकाश असतो. ४६ किलोमीटर भुयारी रेल्वेलाईन आहे २१ स्टेशनं आहेत याखेरीज ३६० किलोमीटर लांबीची म्युनिसिपल इलेक्ट्रिकल रेल्वे आहे त्यामुळे बर्लिन हे

जलद वेगाने धावणारे शहर बनले आहे रोज रेल्वेच्या गाड्यातून ६,३०,००० ते ६,५०,००० याच्या दरम्यान उतारूंची ये–जा चालते प्रत्येक गाडीला आठ डबे असतात

भुयारी रेल्वेने कुठही जा आपणास फक्त वीस पेनिंगच तिकीट काढाव लागत या तिकिटावर दिवसभर जरी गाडीतून प्रवास करीत राहिलात तरी कुणीच आपणास विचारणार नाही फक्त भुयारी स्टेशनातून वर रस्त्यावर आलात की आपल तिकिट संपल

बर्लिनचे 'बोरीबंदर' म्हणजे प्रमुख टर्मिनस रेल्वे स्टेशनचे नाव आहे बर्लिन ओस्टबाहनहोफ (ईस्टर्न) रेल्वेस्टेशन रोज दोनशेहून अधिक गाड्या युरोपच्या निरनिराळ्या भागात ये–जा करतात ट्राम, ट्रॉली बसेस, साध्या म्यु बसेस, टुरिस्ट कोचीस, मोटारी याची वाहतूक चालूच असते इंटरफ्लुग' ही पूर्व जर्मनीची विमान कंपनी अनेक देशातील ३० हून अधिक विमान-तळावर कंपनीची विमाने जातात बर्लिनचा 'सान्ताक्रूझ' विमानतळ म्हणजे बर्लिन शोनेफेल्ड सेंट्रल एअर पोर्ट

बर्लिन हे महत्त्वाचे औद्योगिक केंद्र आहे निरनिराळ्या उद्योगधंद्याच्या ६०० हून अधिक शाखा आहेत १,७०,००० हून अधिक लोक काम करतात पूर्व जर्मनीतील प्रत्येक शभर नागरिकापैकी सहा नागरिक बर्लिन शहरात राहतात तथापी संबध जर्मन अर्थव्यवस्थेच्या गरजेपैकी ९ टक्के उत्पादन राजधानीच्या शहरात होते

बर्लिन जसे अद्यावत् शहर आहे तसेच ते शेतकी व्यवसाय करणारे खेडेही आहे असे सांगितले तर कुणाचा त्यावर विश्वास बसणार नाही परंतु ते खर आहे बर्लिनमध्ये २९,३६० हेक्टर लागवडीयोग्य जमीन (१ हेक्टर = २ ४७ एकर) आहे बर्लिन राजधानीत ७८०० शहरी शेतकरी आहेत मांस, दूध, भाजीपाला, फळे, कुक्कुटपालन, अंडी हा त्याच्या शेतकी व्यवसायाचा प्रमुख उत्पादन माल याखेरीज काकड्या, टॉमेटो, कॉलीफ्लॉवर व लेट्यूस (सॅलडची पान) याचीही लागवड केली जाते बर्लिनमध्ये ३८,५०० छोट्या बागा आहेत काही लोक बागाचा उपयोग खेळण्यासाठी व विश्रातीसाठी करतात तर पुष्कळजण पीक काढण्यासाठी करतात

बर्लिनमधील प्रत्येकजण बचत रक्कम बँकेत ठेवतो. बर्लिन सेव्हिंग बँकेच्या

५२ शाखा व २९ कचेऱ्या आहेत १२०० कर्मचारी बँकेत काम करतात बर्लिनवासियांची बँकेतील बचत ठेवींची सरासरी रक्कम २,२०० मार्कस एवढी असते १९६२ ते १९६८ याच्या दरम्यान लोकसंख्येचे उत्पन्न जवळ-जवळ एक चतुर्थांशाने वाढले पण किमती मात्र स्थिर राहिल्या बर्लिन सेव्हिंग बँकेचा रोज २० हजार ग्राहकांशी व्यवहार चालतो म्हणजे दरवर्षी ६० लक्ष लोकांशी संबंध येतो प्रत्येक बर्लिनर वर्षातून किमान सहा वेळा सेव्हिंग बँकेला भेट देतो

मॉस्कोनिवासी सकाळच्या न्याहरीला बुलकी खातो न्यूयॉर्कर कॉफी-बरोबर सँडविच घेतो बर्लिनर न्याहरीला ताजे पावाचे रोल बटर–जाम लावून खातो ५०० सहकारी वा खाजगी बेकरी आणि राष्ट्रीय मालकीचा प्रचंड बेकरी कारखाना बर्लिनकरांच्या गरजा भागविण्यासाठी ताजे पावाचे रोल व इतर खाद्यपदार्थ बनवितात दरवर्षी बर्लिन शहराला सुमारे एक लक्ष टन पाव व इतर बेकरी खाद्यपदार्थ लागतात यापैकी १३ टक्के वाटोळे ५० ग्रॅमचे रोल लागतात बर्लिनच्या रोजच्या गरजा भागविण्यासाठी दोन हजार केक व ७५ हजार पेटीट फोर (गोड खाद्यपदार्थ) कमी पडतात...

बर्लिनर सकाळचे कॉफी घेतात त्यांच्या दुसरा ब्रेकफास्ट बाहेर कामाच्या ठिकाणी अगर कुठे तरी रस्त्यावर होतो ब्रेकफास्ट म्हणजे बोकवर्स्ट, फ्रँक-फर्टर किंवा हॅम्बर्गर व प्लॅस्टिकच्या पिशवीत दूध बस्स ! शहरात प्रत्येक ठिकाणी स्वयंचलित गरम व थंड पेयाची मशीन्स असतात नाणं टाकलं की पेय हजर

बर्लिन मीट कोम्बाईन (मांसाचा उत्पादन कारखाना) मध्ये रोज सुमारे २५ लक्ष मार्कस एवढ्या किंमतीचं मांस तयार होतं रोज शहराच्या निर-निराळ्या भागात ८० हजार फ्रँकफर्टर सोसेजच्या जोड्यांचा पुरवठा केला जातो

दुपारचं जेवण प्रत्येक कचेरीत सुसज्ज अशा डायनिंग हॉलमध्ये मिळ-ण्याची व्यवस्था असते निरनिराळ्या किंमतीच्या किमान तीन व्हिटॅमिनयुक्त प्रकाराची प्लेट मिळते

रात्रीचं जेवण बहुधा कौटुंबिक स्वरूपाचं असतं कधी कधी गरम जेवण असतं तर कधी कधी सॅलड अगर इतर थंड खाद्य पदार्थ असतात. तयार

जेवण घेण्याची पद्धत बर्लिनमध्ये लोकप्रिय होऊ पाहात आहे 'गोल्डब्रॉयलर' नावाची डिश बर्लिनमध्ये लोकप्रिय आहे (गोल्डब्रॉयलर म्हणजे ५६ दिवसांच्या कोंबडीच्या पिल्लाच्या मांसापासून बनविलेला पदार्थ ) बर्लिन-मध्ये हॉटेलमध्ये व घरी मिळून रोज २५ ते ३० हजार भाग (ग्रिल्ड चिकन) मोठ्या चवीन खाल्ले जातात

जर्मन बियर हे बर्लिनराच सर्वांत आवडत पेय त्याना पावगोगावळी बियर लागते बियर पाण्यासारखी वापरली जाते बर्लिनमध्ये कुणी पाणी पिण्याच्या भानगडीत पडतच नाहीत

प्रत्येक जर्मन नागरिकाजवळ ( यामध्ये बर्लिनरसुद्धा आले) छोटस हिरव्या बाधणीचं पुस्तक असत त्याच नाव आहे 'सोशल इन्शुअरन्स बुक' या बुकानुसार प्रत्येक व्यक्तीला मग त्याचा हुद्दा अगर उत्पन्न केवढही असो —आजारीपणात अगर अपघात प्रसगी समाजवादी आरोग्य सेवेने विनामूल्य उपलब्ध करून दिलेल्या अनेक सामाजिक सवलतीचा फायदा करून घेता येतो पाळण्यापासून दफनभूमीपर्यंत पोचलेल्या प्रत्येक व्यक्तीच्या सुरक्षिततेच्या भावनेची हमी सरकारन दिलेली असते १९६७ साली प्रत्येक बर्लिनरच्या मागे २७४ मार्कस खर्च करण्यात आले सोळा वर्षापूर्वी आरोग्य व सामाजिक सेवेने उपलब्ध करून दिलेल्या सवलतीच्या जवळ जवळ ३० टक्के रक्कम देण्यात आली गरोदर स्त्रियांना वैद्यकीय सल्लामसलत व इतर मदत मिळते गरोदर-पणाच्या काळात व प्रसुतीच्या काळात चौदा चौदा आठवड्याची भरपगारी रजा मिळते नोकरीवाल्या स्त्रियाना गरोदरपणाच्या काळात अगर प्रसूतीनतर बडतर्फ केले जाऊ नये म्हणून कायद्यान सरक्षण दिल आहे १९६७ साली बर्लिन मध्ये १२ हजार माना व १४,९०० बालकाची देखभाल करण्यात आली मुलामागे सरकारकडून खास ग्रँट मिळते पहिल्या मुलाला ५०० मार्कसपासून १ हजार मार्कस चौथ्या मुलाला ग्रँट मिळते त्यानतरच्या प्रत्येक मुलामागे १ हजार मार्कसची ग्रँट मिळते १९६८ साली याच कामासाठी ९४,६०,७० मार्कस एवढी रक्कम बाजूला काढून ठेवण्यात आली होती प्रत्येक नाग-रिकाच्या आरोग्याची काळजी सरकार घेते क्षय, डांग्या खोकला, घटसर्प, गोवर, पोलिओ वगैरे साथीविरुद्ध प्रतिबधक लस सक्तीने टोचण्यात येते बारा वर्षाच्या वरील प्रत्येक व्यक्तीची वर्षातून एकदा क्ष किरणाने तपासणी

केली जाते कामगाराना क्षय व फुफ्फुसाचा कॅन्सर झाला किंवा काय याची तपासणी केली जाते व त्याच्यावर तज्ज्ञ डॉक्टराकडून प्रतिबंधक इलाज केले जातात

बर्लिनमधील मुक्कामात मी भारतीय, रशियन, झेक वगैरे विविध वकिलातीत हिंडलो रशियन वकिलातीत नागपूरकडील श्री पालीवाल नावाचा विद्यार्थी भेटला त्याच्याशी मराठीतून बोलताना मला मनस्वी आनद झाला तो लायपझिग या शहरात शिक्षण घेतो उन्हाळ्याच्या सुटीत तो भारतात जाणार होता प्रवासाचे पैसे वाचविण्यासाठी तो रेल्वेने ताश्कदपर्यंत जाणार होता व तेथे विमान पकडून दिल्लीला जाणार होता ताश्कद ते दिल्ली विमानाचे भाडे कमी आहे रशियन वकिलातीतून ताश्कदपर्यंत प्रवासाचा व्हिसा मिळविण्यासाठी तो तेथे आला होता झेक वकिलातीच्या आवारा-बाहेर मला काही भारतीय विद्यार्थी भेटले त्याच्याशी मी इग्रजीतून बोललो काही जणांशी हिंदीतून बोललो परदेशात भारतीय भेटला तर कातडी कातडीला ओळखते जवळ ओढते

पत्रकार असल्याने बर्लिनमधील वृत्तसस्था व वृत्तपत्र कचेरी पाहण्याची सधी मी सोडली नाही ए डी एन नावाच्या जर्मन वृत्तसस्थेच्या कचेरीला भेट दिली एका भव्य इमारतीत ही कचेरी आहे जगातील सर्व भागातून वृत्त येण्याची सोय आहे प्रत्येकाला काम करण्यासाठी प्रशस्त जागा कुठेच शिपाई नावाचा प्राणी दिसला नाही कॉपी एका विभागातून दुसऱ्या विभा-गात नेण्यासाठी स्वयचलित यत्राचा उपयोग केला जातो कॉपी आपोआप प्रवास करते स्वावलबन हा त्याचा पिंड आहे मी मोठा अन् तू छोटा ही भावना दिसली नाही प्रत्येकजण दुसऱ्याविषयी आदराने बोलताना आढळतो कामाचा ताण पडू नये अशी खबरदारी घेतली जाते टेबलावर फुले ठेवलेली असतात कर्मचाऱ्याना कपडे ठेवण्यासाठी स्टॅण्ड आहेत स्थानिक वृत्तपत्रां-साठी रिपोर्ट आणण्याचे कामसुद्धा ही वृत्तसस्था करते त्याचे कामकाज पाहून बर वाटल

त्यानतर आम्ही ' न्यूईश डचुश लँण्ड ' नावाच्या बड्या जर्मन वृत्तपत्राच्या कचेरीला भेट दिली या वृत्तपत्राचा खप दहा लाखावर आहे या वृत्तपत्रात उपसपादकाचा दरमहा पगार १२०० मार्कस आहे जर्मन वृत्तपत्र कचेरीत

दुपारी कामाला प्रारंभ होतो व रात्रौ १० ते १०–३० वाजेपर्यंत खेळ खतम ! एकाच वेळी या वृत्तपत्राच्या चार पाच ठिकाणाहून आवृत्या निघतात जर्मन वृत्तपत्राच्या मॅटस आपल्याकडील रोटरी मशीनप्रमाणे हार्डकार्डबार्डवर काढत नाहीत त्यासाठी प्लॅस्टिकचा पेपर वापरला जातो सबंध पेपर तयार झाला की सर्व पानाच्या मॅटस काढतात व खास यंत्रे बसविलेल्या खोलीत त्या मॅटस यंत्रावर चढवितात बटन दाबले की यंत्र चालू होते व त्या मॅटसची नक्कल वृत्तपत्राच्या दूर दूर ठिकाणच्या कचेरीत रिसिव्हींग यंत्रावर नियते हा प्रोसेस पंधरा मिनिटात पुरा होतो त्यामुळे एकाच वेळी बर्लिन व जर्मनीतील निरनिराळ्या शहरातील त्यांच्या कचेऱ्यातून पेपर निघतो जर्मनीतील वृत्तपत्र आवृत्त्या काढण्याचे हे आधुनिक तंत्र आपल्याकडे सुरू झाले तर केवढी तरी मोठी क्रांती होऊन जाईल वृत्तपत्र कचेरीत छापखाना भागात पुरुषाच्या बरोबरीने स्त्रिया कामे करतात स्त्रियानासुद्धा रात्रपाळ्या दिवसपाळ्या कराव्या लागतात वृत्तपत्राचे अंक छापून झाले की रात्रीचे पोस्ट कचेरीचे नेऊन पोचविले जातात पहाटे पोस्टमन प्रत्येकाच्या घरी जाऊन वृत्तपत्राचे अंक टाकतो आपल्याकडे रस्त्यात पोर पेपर विकत हिंडताना आढळतात तशी त्यांच्याकडे कुठेच दिसली नाहीत

४ ४ ४

**बर्लिनमधील** वास्तव्य आता संपत आले होते. यजमान सरकारने दिलेल्या पॉकेट मनीतून थोडीफार खरेदी करायचे काम बाकी होते. सकाळी ब्रेकफास्ट आटोपल्यावर आम्ही सत्तारूढ सोशॅलिस्ट युनिटी पार्टीच्या मुख्य कचेरीत गेलो. प्रेसिडियमचे अध्यक्ष हॉर्ट पॅटस्के, प्रेसिडियमचे सदस्य हलबर्ट, प्रेसिडियम अध्यक्षाच्या कचेरीचे प्रमुख हॉर्स्ट ब्रिलोस्की या नेत्यांनी आमचे हार्दिक स्वागत केले. या नेत्यांनी पूर्व जर्मन प्रजासत्ताकच्या राज्यघटनेचा परिचय करून दिला.

पूर्व जर्मनीत श्रमजीवी वर्ग शेतकरी, बुद्धिवादी व इतर श्रमिक वर्गीयाशी घनिष्ट युतीने राजकीय सत्ता हाताळतो. सामाजिक जीवनाच्या सर्व क्षेत्रात हीच युती जनतेच्या सर्व शक्तींना संयुक्त कृतीला प्रवृत्त करते. उत्पादन साधने राष्ट्रीय मालकीची असून ही राष्ट्रीय युती म्हणजे समाजवादी समाजाचा मूलभूत पाया आहे. माणसाने माणसाची स्वार्थासाठी पिळणूक करण्यास कायमचा प्रतिबंध करण्यात आला आहे. 'प्रत्येक व्यक्तीला त्याच्या पात्रतेनुसार काम व प्रत्येक व्यक्तीला कामानुसार दाम' या तत्त्वाची प्रत्यक्ष अमलबजावणी करण्यात आली आहे. राष्ट्राच्या व समाजाच्या राजकीय, आर्थिक, सामाजिक व सांस्कृतिक जीवनाला आकार देण्याच्या कार्यात सहभागी होण्याचा प्रत्येक नागरिकाचा हक्क हा समाजवादी जर्मन प्रजासत्ताकाच्या नागरिकाचा अत्यंत महत्त्वपूर्ण मूलभूत हक्क आहे. 'संयुक्तपणे विचार करा, संयुक्तपणे काम करा व संयुक्तपणे शासन करा.' हे या समाजवादी राष्ट्राचे घोषवाक्य आहे. घटनेचे ब्रीद आहे.

पूर्व जर्मनीची घटना कशी आहे? 'पीपल्स चेंबर' हे सर्वोच्च सत्तास्थान आहे. आपल्याकडे संसद जशी सर्वोच्च अधिकार असलेली संस्था आहे तशी

त्याच्याकडे 'पीपल्स चेंबर' ही घटनात्मक व कायदेशीरदृष्ट्या सर्वोच्च संस्था आहे पीपल्स चेंबरच्या डेप्युटीची (प्रतिनिधी) निवड गुप्त मतदान पद्धतीने लोक करतात नॅशनल फ्रन्ट ऑफ डेमोक्रॅटिक जर्मनी (सोशलिस्ट युनिटी पार्टी ऑफ जर्मनी, ख्रिश्चन डेमोक्रॅटिक युनियन ऑफ जर्मनी, लिबरल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ जर्मनी, नॅशनल डेमोक्रॅटिक पार्टी ऑफ जर्मनी व डेमोक्रॅटिक पेझंटस पार्टी ऑफ जर्मनी असे पाच प्रमुख राजकीय पक्ष या आघाडीत आहेत) आणि तीन व्यापक संघटना (कॉन्फेडरेशन ऑफ फ्री जर्मन ट्रेड युनियन्स, डेमोक्रॅटिक वुईमेन्स लीग ऑफ जर्मनी व फ्री जर्मन युथ) मिळून पीपल्स चेंबरचे पार्लमेन्टरी विभाग तयार होतात पीपल्स चेंबरचे अध्यक्ष आहेत जेराल्ड गोटिंग (ख्रिश्चन डेमोक्रॅटिक पार्टीचे सरचिटणीस) पीपल्स चेंबर स्टेट कौन्सिलची निवड करते व मंत्रिमंडळ स्थापनेवर शिक्कामोर्तब करते कायदेकानू करणे राष्ट्रीय आर्थिक व दीर्घ मुदतीच्या योजनांची अमलबजावणी करणे व राष्ट्रीय करारांना संमती देणे हे पार्लमेंटचे प्रमुख काम आहे

पीपल्स चेंबरचे कार्य प्रामुख्याने उपसमित्यात विभागून दिले जाते या समित्यावर दोन तृतीयांश डेप्युटी काम करतात परराष्ट्र संबंध, राष्ट्रीय संरक्षण, उद्योगधंदे, स्थापत्य शास्त्र व वाहतूक, शेतकी व वन, व्यापार व पुरवठा, अर्थसंकल्प अर्थ व इतर विषयांसाठी निरनिराळ्या उपसमित्या असतात पीपल्स चेंबरला सादर करण्यासाठी विधेयके तयार करणे व ही विधेयके चेंबरला संमतीसाठी सादर करण्यापूर्वी चर्चेसाठी जनतेपुढे ठेवणे हे या समित्यांचे काम असते पीपल्स चेंबरमध्ये ४३४ डेप्युटी (प्रतिनिधी) आहेत यापैकी २ महिला आहेत व बर्लिनचे ६६ प्रतिनिधी आहेत यापैकी २४ महिला आहेत

| सामाजिक व्यवस्था (व्यवसाय) | डेप्युटी | बर्लिनचे डेप्युटी |
|---|---|---|
| कामगार | १९३ | २३ |
| सहकारी शेतकरी | ६४ | ७ |
| ऑफिस कर्मचारी | ७४ | १३ |
| बुद्धिवादी | ९८ | २१ |
| इतर | ५ | २ |

१९६० साली पीपल्स चेंबरची यंत्रणा म्हणून स्टेट कौन्सिलची स्थापना करण्यात आली पीपल्स चेंबरच्या अधिवेशनाच्या दरम्यानच्या काळात पीपल्स चेंबरने तयार केलेले कायदे व ठराव यांची अमलबजावणी करण्याची कामगिरी स्टेट कौन्सिल करते स्टेट कौन्सिलचा एक अध्यक्ष, सहा उपाध्यक्ष, सोळा सदस्य व एक चिटणीस असे पदाधिकारी असतात आंतरराष्ट्रीय कायद्याच्यासमोर जर्मन लोकशाही प्रजासत्ताकचे प्रतिनिधीत्व स्टेट कौन्सिलचा अध्यक्ष करतो पीपल्स चेंबरच्या सर्व यंत्रणात सहकार्य घडवून आणण्याचे काम स्टेट कौन्सिलकडे असते

पीपल्स चेम्बरने संमत केलेले कायदे, वटहुकूम व ठराव व स्टेट कौन्सिलचे ठराव यांच्या आधारे राजकीय, आर्थिक, सांस्कृतिक, सामाजिक व लष्करी कामकाज तडीस नेण्याची जबाबदारी मंत्रिमंडळावर असते राष्ट्रीय नियोजन मंडळ, शेतकी मंडळ, संशोधन मंडळ, कामगार व शेतकरी तपासणी समिती व इतर यंत्रणांच्या पाठिंब्याने मंत्रिमंडळ सर्व कामकाज चालविते सोशॅलिस्ट युनिटी पार्टीचे विली स्टोफ हे कौन्सिल ऑफ मिनिस्टर्सचे चेअरमन म्हणजे पंतप्रधान आहेत

जर्मन लोकशाही प्रजासत्ताकाच्या प्रदेशाची विभागणी राजधानी बर्लिन शहर व चौदा ' काऊंटीज ' (परगणे) यामध्ये करण्यात आली आहे रॉस्टॉक, शवेरीन, न्यूब्रॅडनबर्ग, सॅग्डेबर्ग, पोसडॅम, फ्रॅंकफर्ट-ऑन-ओडर, कॉटबस, हॅले एरफर्ट, सूल, गेरा, लायप्झीग, कार्ल मार्क्स स्टॅड व ड्रेस्डन असे चौदा परगणे आहेत या काऊंटीजची पोटविभागणी २६ म्युनिसिपल डिस्ट्रिक्ट (नगरपालिका जिल्हे) १९१ रूरल डिस्ट्रिक्ट (ग्रामीण जिल्हे) व ९,०११ 'कम्युनिटीज (यापैकी २१८ मध्ये १० हजारावर नागरिक आहेत) करण्यात आली आहे स्थानिक यंत्रणांची निवड नागरिक मतदानाने करतात

नॅशनल फ्रन्ट (राष्ट्रीय आघाडी) सर्व संसदीय संस्थांच्या निवडणुकांची व्यवस्था करते पक्षांनी व सामुदायिक संघटनांनी उमेदवारांची सार्वजनिकरित्या तपासणी केली जाते व नंतर सर्व उमेदवारांची निवडणुकीसाठी संयुक्त यादी सादर केली जाते निवडणुकीपूर्वी व निवडणुकीनंतर नॅशनल फ्रन्ट जनतेशी चर्चा आयोजित करते अशा चर्चेच्या वेळी नागरिकांना उमेदवारांना प्रश्न विचारण्याची, त्यांच्याकडे तक्रारी गुदरण्याची व त्यांच्यावर विशिष्ट

जबाबदारी पार पाडण्याबद्दल आदेश देण्याची संधी मिळते अशा निवडणूक सभाच्या प्रसगी उमेदवारानाही आपल्या कार्याचा अहवाल लोकाना सादर करता येतो.

समाजवादी जर्मनीत विविध पक्ष असूनसुद्धा सर्वांचे सयुक्त आघाडीत एकमत कसे काय होते याबद्दल आम्ही आश्चर्य व्यक्त केले त्यावर असे सागण्यात आले की, समाजवादाच्या अमलबजावणीत हे सर्व पक्ष एक आहेत समाजवादाचे ध्येय साकार करणे ही काही केवळ एकाच पक्षाची जबाबदारी आहे असे कुणीच मानत नाही सर्व साम्राज्यवादी शक्ती पूर्व जर्मनीला नेस्तनाबूद करण्यासाठी टपून बसल्यामुळे पूर्व जर्मनीतील सर्व पक्षांनी आपली सयुक्त आघाडी बनविली आहे

शेतकऱ्यासाठी निराळी राजकीय सघटना स्थापन करण्याची आवश्यकता आहे काय ? या प्रश्नाला उत्तर देताना सांगण्यात आले की, १९४५ साली फॅसिझमचा पाडाव झाला, परतु शेतकऱ्याचे स्वप्न साकार झालेले नव्हते श्रमिक वर्गांच्या जमिनी शेतकऱ्याना वाटण्यात आल्या जमीन सुधारणा अमलात आणण्यात आल्या पुष्कळसे शेतकरी फॅसिस्ट तत्त्वज्ञानान झपाटलेले होते त्यांना मार्क्स–लेनिनचे तत्त्वज्ञान पटत नव्हते पुष्कळ शेतकरी सामुहिक शेतीच्या प्रयोगात सामील व्हायला तयार नव्हते त्याना त्याचे हित कशात आहे हे समजावून सागण्यासाठी शेतकऱ्याची निराळी सघटना आवश्यक होती श्रमिक वर्गीयानी आपल्या जमिनी देऊन शेतकऱ्यासाठी मोठा त्याग केला होता १) श्रमिक वर्गीयांशी मैत्री २) शातता व कष्ट व ३) आतरराष्ट्रीय सामजस्य या तीन तत्त्वासाठी शेतकरी सघटना झटत आली आज पूर्व जर्मनीत ११ हजार शेतकी सोसायट्या आहेत व ९ हजार शेतकरी आहेत शेतकऱ्यान्या हितसबधासाठी निराळी सघटना अस्तित्वात आली आहे

निरनिराळ्या पक्षात जागांच्या वाटपावरून तीव्र मतभेद होत नाहीत काय असा प्रश्न विचारला असता एका नेत्याने सागितले की, मूलभूत तत्त्वावर पाचही प्रमुख पक्षाचे एकमत असल्याने मतभेद असले तरी ते कधीच विकोपाला जात नाहीत हुद्याच्या जागासाठी लढत देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही प्रत्येक पक्ष आपापल्या उमेदवाराची निवड करतो, परतु राष्ट्रीय आघाडीतील पक्षात उमेदवाराबाबत तडजोड होऊन एक यादी तयार होते.

मग ते उमेदवार पक्षाचे उमेदवार म्हणून लोकासमोर न येता आघाडीचे उमेदवार म्हणून येतात मोठ्या पक्षाला अर्थात सर्वात अधिक जागा मिळतात परंतु त्यापायी इतर पक्षाचे कोणतेच नुकसान अगर गैरसोय होत नाही सोशॅलिस्ट युनिटी पार्टी हा सर्वात मोठा पक्ष असल्याने या पक्षाचे १२७ उमेदवार व इतर चार पक्षाचे ५२ उमेदवार, युवकाचे ६८ उमेदवार, महिलाचे ३५ उमेदवार व सास्कृतिक सघटनाचे २२ उमेदवार अशी विभागणी होते ही झाली पीपल्स चेंबरची गोष्ट त्याच पद्धतीने स्टेट कौन्सिलवर उमेदवार पाठविले जातात प्रत्येक पक्षाला स्टेट कौंसिलवर प्रतिनिधित्व मिळते प्रत्येक पक्षाचा अध्यक्ष स्टेट कौन्सिलवर निवडला जातो

निवडणुकीसाठी उमेदवाराची नावे सुचवायची असल्यास प्रत्येक पक्षाने ती नावे फ्रन्टकडे सादर करावी लागतात निवडणूक सभात फ्रन्टकडून ही नावे नागरिकासमोर ठेवली जातात उमेदवाराच्या कार्याची तपासणी केली जाते जनतेच्या आशा-आकाक्षाची पूर्ती करू शकेल अशाच उमेदवाराची निवड केली जाते आमच्या घटनेत प्रत्येक जागेसाठी निरनिराळी नावे मागविली जात नाहीत उमेदवाराच्या नावानी यादी सादर करावी लागते चाचणीची पद्धत गुप्त नसते ती खुल्या पद्धतीन केली जाते आमचेही मतभेद होतात, परंतु ते तात्विक स्वरूपाचे असतात उत्तम कामगिरी कशी काय साध्य करून दाखवायची, याबाबत आमच्यात मतभेद होतात एकदा हे मतभेद दूर झाले की, लोकांचे कल्याण हेच सर्वांचे समान ध्येय बनत तेथे मग मतभेदाना वाव नाही

एका पक्षातून फुटून दुसऱ्या पक्षाला सामील होण्याची 'साथ' आपल्या देशातही आहे काय ? असा मिस्कील प्रश्न मी विचारला त्यावर एका नेत्याने हसत हसत आमच्याकडे फुटीरपणाचा प्रश्न कधीच उपस्थित झाला नाही असे सागितले

आपल्या देशात आर्थिक नियोजन कोणत्या प्रकारे केले जाते असे विचारण्यात आले असता सागण्यात आले की, योजनेची आखणी लोकशाही मार्गाने केली जाते आर्थिक योजना गुप्तपणे तयार केली जात नाही प्रत्येक पक्ष आपापल्या मागण्या सादर करतो सर्व मागण्या योजना आखतेवेळी विचारात घेतल्या जातात व अतिम योजना बनविली जाते दोन अडीच तास फ्रन्टच्या

नेत्याशी चर्चा करून परतलो पूर्व जर्मनीच्या घटनेची तपशीलवार उद्बोधक माहिती मिळाली

बर्लिनमधून लंडनला जाण्याचा मानस होता, परंतु लंडहून अपेक्षित विमानाचे तिकीट न आल्यामुळे लंडन वारीचा बेत बारगळला लंडनला जाण्याची संधी मिळाली असती तर परत येताना पश्चिम जर्मनीत फँकफर्ट शहराच्या जवळपास राहणाऱ्या एका मित्राकडे एकादा दिवस थांबण्याचा बेत होता पश्चिम जर्मनीची प्रगती पाहण्यास मिळाली असती परंतु लंडन वारीच रद्द झाल्याने पश्चिम जर्मनीला भेट देण्याचा मनसुबाही रद्द करावा लागला मॉस्कोमार्गे सरळ भारतात परतण्याचा निर्णय घेऊन टाकला त्याप्रमाणे मॉस्को दिल्ली–मुंबई असे परतीचे तिकीट काढण्याची व्यवस्था करण्यास सांगितले

थोडी फार खरेदी करायची असल्याने मी कपडे करून तयार राहिलो मिसेस रेईन्के यांनी आपण इतर पत्रकार मित्रांना एक्सचेंज बँकेत घेऊन जाते व दहा वाजेपर्यंत परत येते असे सांगितले. मी आपला हॉटेल बरोलीनाच्या समोरील फुटपाथवर मिसेस रेईन्केची वाट पाहात येरझाऱ्या घालत राहिलो अकरा वाजून गेले तरी मिसेस रेईन्केचा पत्ता नव्हता सेंट्रम नावाच्या डिपार्टमेंटल स्टोअरमध्ये थोडीफार खरेदी करण्यासाठी मिसेस रेईन्के माझ्याबरोबर येणार होत्या

माझी अस्वस्थता वाढली मी एकटाच फुटपाथवरून दूरवर हिंडू लागलो समोरून एक तरुण झपझप येताना दिसला तो गडबडीत होता मी वाट पहात असल्याने रेंगाळत चालला होतो तो तरुण उंच, रंगाने काळा होता कातडीच्या रंगाने कातडीला अचूक ओळख भारतीयाची नजर भारतीयाला परदेशी मुलखात चटकन हुडकून काढते तो तरुण थांबला मागे वळला व माझ्याजवळ येऊन आपण भारतीय आहात का अशी विचारणा केली माझ्या होकारात्मक उत्तराने त्याला आनंद झालेला दिसला अर्थात मलाही बरे वाटले तो तरुण केरळच्या कॉलेजमधील प्राध्यापक होता व डॉक्टरेटसाठी पूर्व जर्मनीत आला होता तो सुट्टीत बर्लिनमध्ये आला होता मी दुभाषी बाईची (गोव्यात आडनाव आहे त्या दुभाषींकी कोणीच नव्हे) वाट पहात

यथे उभा असल्याचे सांगितले तो म्हणाला, मी दुपारी तीन वाजेपर्यंत मोकळा आहे चला, मी येतो तुमच्याबरोबर खरेदीला

त्या तरुणाचे नाव होते मथाईस तो मला घेऊन प्रथम हॉटेल बरोलीनात गेला तेथे आम्ही थंड पेय घेतले नंतर सेन्ट्रम या डिपार्टमेंटल स्टोअर्सच्या भव्य इमारतीत गेलो मथाईसला थोडं फार जर्मन येत असल्यामुळे खरेदी करताना भाषेची अडचण आली नाही मुलांना विविध प्रकारची खेळणी घेतली बायकोसाठी थोडी खरेदी केली पैसे चटणीसारखे कसे उडाले ते समजले देखील नाही बरोबर सौ नव्हती हे एका परीने बरे झाले कारण ती असती तर काय घेऊ अन् काय नको असा प्रश्न पडला असता व काहीच खरेदी न करता परतावे लागले असते प्रत्येक मजल्यावर विविध प्रकारच्या रंगीबेरंगी आकर्षक वस्तू पाहून बायका मंडळी निश्चितपणे चक्रावून गेल्या असत्या यात शंकाच नाही

मथाईसने मला सर्वत्र हिंडवले खरेदी आटोपल्यावर भुयारी रस्त्याने बर्लिनच्या तळघरातले जग पाहिले तेथे कुठेही फेरीवाला वस्तू विकायला घेऊन बसलेला दिसला नाही तसेच कुठेच घाण, केरकचरा आढळला नाही. हॉटेल बरोलिनात परतलो प्रथम हातातील वस्तू खोलीवर नेऊन टाकाव्यात अशा विचाराने काऊंटरवरून खोलीची किल्ली मागून घेतली किल्ली देताना त्या मुलीने एक बंद लिफाफा माझ्या हातात दिला माझ्या सहकारी पत्रकारांनी आपली वाट पाहून आम्ही जेवून घेतले, तुम्ही जेवून घ्या असे चिठीत लिहून कळविले होते मी व मथाईस खोलीत गेलो वस्तू ठेवल्या व खाली डायनिंग हॉलमध्ये आलो मथाईसबरोबर असल्याने मला काळजी वाटली नाही नपेक्षा उपाशी राहाण्याची पाळी आली असती कारण बरोबर दुभाषी नसताना जेवणाची ऑर्डर कशी द्यायची असा गहन प्रश्न निर्माण झाला असता कारण हॉटेलमधील वेटर मंडळींना जर्मन भाषेखेरीज अन्य भाषा समजत नव्हती मथाईस म्हणाले, मलाही जेवण घ्यायचे होते चला, बरोबरच घेऊ आम्ही जेवण घेतले मथाईस इकडचा परिचित असल्याने त्याने मेन्यू पाहून हंगेरियन सूपची ऑर्डर दिली हे सूप आपल्याकडील माशाच्या आमटीसारखे वाटत होते ती आमटी पाहून भात खाण्याची इच्छा झाली परंतु, खिरीसारखा लागणारा पचपचीत भात आठवताच माझी ती इच्छा लगेच

विस्ली जेवण आटोपेपर्यंत मिसेस रेईन्के पत्रकार मित्रासह आमच्या टेबलाकडे आल्याच मथाईसनी बाईना जर्मन भाषेत सांगितले की आपली कामगिरी थोड्या वेळापुरती मी पार पाडली आहे आता ताब्यात हे घ्या आपले बाळ

मथाईसने मुंबईत राहणाऱ्या भावाचा व स्वतःचा पत्ता दिला शक्य झाल्यास भावाला फोन करून आपण लवकरच भारतात येणार असल्याचे कळवा असे सांगितले व माझा निरोप घेतला अवघ्या काही तासाचा सहवास, मथाईस ख्रिश्चन केरळीय परंतु तो जाताना मला वाईट वाटले जवळचा नातेवाईक निरोप घेऊन गेल्यासारखे वाटले

⁕ ⁕ ⁕

उद्या दुपारी मॉस्कोला जाण्यास निघणार. आजची संध्याकाळ ही बर्लिनमधील शेवटची संध्याकाळ आहे आज रात्री पूर्व जर्मन सरकारच्या परराष्ट्र खात्याच्या वृत्तपत्र विभागाचे प्रमुख डॉ मुलर यानी दौऱ्यावर आलेल्या पाहुण्या पत्रकारांच्या सन्मानार्थ निरोपादाखल कॉकटेल पार्टी आयोजित केली होती ह्या पार्टीचा बेत हॉटेलमध्ये न करता बर्लिनमध्ये कायम स्थायिक झालेल्या एका ब्रिटीश गृहस्थाच्या फ्लॅटवर झाला त्यामुळे या पार्टीला अनौपचारिक स्वरूप आले होते या पार्टीच्या प्रसगी मला पूर्व जर्मन सरकारच्या मुबईतील कॉन्सुलेटमध्ये व्हाईस कॉन्सलच्या हुद्यावर असलेले स्टायनर भेटले त्यांचा मुबईत पूर्व परिचय झालेला असल्याने मला जणू एकादा स्वकीय भेटल्याचा आनद झाला गप्पाटप्पा झडल्या डॉ मुलर यानी आम्हाला दौऱ्याबद्दल अभिप्राय विचारला आम्ही आमचे प्रांजळ मत दिले. कॉकटेल पार्टीला उपस्थित राहून मी कोकाकोलाशिवाय काहीच घेतले नाही म्हणून यजमानाना आश्चर्य वाटले, परतु मी चुकून बिअरला देखील स्पर्श केलेला नाही अस सांगितल्यावर मला कुणी आग्रह करण्याच्या भानगडीत पडल नाही पार्टीहून परतलो. रात्री हॉटेलमध्ये जेवण घेतल. नुकताच पाऊस पडून गेला होता हवेत चागलाच गारठा होता तरीसुद्धा सर्व पत्रकारानी फेरफटका मारून येण्याचा बूट काढला बर्लिनमधील शेवटची रात्र असल्याने मी विरोध केला नाही फुटपाथवरून 'विंडो शॉपीग' करीत मैल दीड मैलाची रपेट केली थडीमुळ दातखीळ वाजत होती कधी एकदा हॉटेलवर परततो असे मला झाले होते.

दुसऱ्या दिवशी सकाळी रोमेश चदर ट्रान्स्फर टॅक्सी पकडून पश्चिम बर्लिनमध्ये जाण्यास निघाला तेथून तो विमानान लडनला जाणार होता.

त्याच्याजवळ भारतातून एअर इंडियाकडून आणलेल तिकीट होत

त्याला भेटण्यासाठी आलेल्या भारतीय पत्रकारासमवेत एक भारतीय विद्यार्थी आला होता त्याची माझी ओळख झाली तो महाराष्ट्रीय असल्याच समजून आनंद झाला. त्यान आपल नाव नाईक असल्याच सांगितल प्रिंटिंग टेक्नॉलॉजीचा डिप्लोमा कोर्स आटोपून तो दुसऱ्याच दिवशी भारतात येण्यास निघणार होता बोलता बोलता श्री नाईक हा मुंबईला जाणार आहे व तो मूळचा गोव्याचा असल्याच समजल त्याच संपूर्ण आडनाव नाईक पलग असल्याच त्यान सांगताच माझा आनंद द्विगुणीत झाला मी त्याच्याशी चक्क कोकणीत बोललो बर्लिनमध्ये कोकणी बोलीतून बोलण्याचा योग जुळून आल्याबद्दल बर वाटल बोलताना सहज मी त्याला माझी अडचण सांगितली. पैशाच्या अभावी मला इंग्लंडला जाता आल नाही अस मी त्याला सांगितल तो म्हणाला, आपली भेट काल झाली असती तर मी निश्चितपणे आपल्या इंग्लंड ट्रिपच्या पैशाची सोय केली असती आता मी खरेदी करून सर्व पैसे संपविले आहेत

त्यान मला आपण काय काय खरेदी केली अस विचारल त्यावर मी म्हटल, माझ्याकडे पैसा नव्हता जर्मन सरकारकडून मिळालेल्या पॉकेट मनीतून थोडी फार खेळणी घेतली आहेत बायकोसाठी मिक्सर न्यायच मनात होत, परंतु मिक्सरची किंमत ९० मार्कसवर आहे त्यामुळ मिक्सर घेता आला नाही

श्री नाईक यान निदान या कामी आपणास काही मदत करता आली तर पाहीन अस मला सांगितल तो मला बरोबर घेऊन गेला त्याचा मित्र पश्चिम बर्लिनमध्ये खरेदीसाठी गेला होता तो केवळ श्री नाईकना निरोप देण्यासाठी आलेला होता त्याच्याकडून पैसे घेऊन आपणास मिक्सर घेऊन देतो, आपण भारतात गेल्यावर पैसे परत करा असे नाईक यानी सांगितल आम्ही नाईकच्या हॉटेलवर त्याच्या मित्राची वाट पाहात थांबलो मला मॉस्कोला जाण्यासाठी साडेतीन वाजता विमानतळावर जायला हव होत नाईकचा मित्र पश्चिम बर्लिनहून परत येईपर्यंत साडेबारा वाजले तो आल्यावर नाईकन त्याला बरोबर घेतले सेंट्रममध्ये जाऊन मिक्सर घेऊन दिला त्याच्या मित्रान दाढी करण्याचे विद्युत यंत्र घेऊन माझ्याबरोबर दिल नाईक ते यंत्र भारतात आल्यावर त्याच्या मित्राकड पोचत करणार होता. एवढ्या खरेदी-

त्यांनी नाईकच्या मित्राजवळचे सर्व पैसे संपले माझ्याजवळ सहा डॉलर शिल्लक होते मॉस्कोत एक दिवस मुक्काम करायचा असल्याने तिथे कदाचित लागतील म्हणून मी मुद्दाम राखून ठेवले होते, परंतु नाईकच्या सांगण्यावरून मी ते सहा डॉलर त्याच्या मित्राला देऊन टाकले एक डॉलर्स म्हणजे ४ मार्क्स २० पेनिग मिक्सरसाठी नाईकच्या मित्राने दिलेल्या ९० मार्क्सपैकी २५ मार्क्स एवढी रक्कम मी बर्लिनमध्ये चुकती केली होती उरलेले ६५ मार्क्स भारतीय रुपायाच्या स्वरूपात मुंबईला गेल्यावर मी नाईकाकडे देणार होतो. या व्यवहारामुळ मला सौ ला खूष करण्यासाठी मिक्सरची भेट नेता आली जर्मनीला जाऊन बायकोला काय आणल अस कुणी विचारल तर आता छातीठोकपणे मला मिक्सरकडे बोट दाखविता येईल तथापी, अगदीच निष्कांचन अवस्थेत मॉस्कोत एक दिवस मुक्काम कसा करायचा अस मल मोठ प्रश्नचिन्ह मला सतावून सोडत होत मी ही चिंता बोलून दाखविताच नाईक म्हणाला, 'आपण उगाच काळजी करू नका मॉस्कोत आपणास कसलाच खर्च येणार नाही शिवाय माझ्याजवळ वाटखर्चासाठी काही रुबल्स आहेत मी माझे तिकीट बदलून घेऊन तुमच्याबरोबरच उद्या येथून निघणार आहे मॉस्कोत आपली भेट होईलच

नाईक व त्याचा मित्र यांनी मला हॉटेल बरोलीनावर आणून सोडल मिसेस रेईन्के व दोघे पत्रकार माझी वाट पाहात होते आम्ही जेवण घेतल आपल्याकड निरोपाच जेवण देताना गोडधोड पदार्थ पाहुण्याना खाऊ घालण्याची प्रथात आहे त्याच्याकडही तसाच रिवाज असावा कारण जेवणानतर स्वीट डिश म्हणून गोड पानपोळीसारखा पदार्थ मागविण्यात आला जेवण झाल्यावर मी रूमवर जाऊन आवरा-आवर केली बॅग भरली व खाली उतरलो मिसेस रेईन्केनी टॅक्सी मागविलीच होती आम्ही विमानतळावर जाण्यास निघालो जाताना टी व्ही टॉवर पाहून घेतला बर्लिनच ते सुदर रूप डोळ्यात साठवून घेतल शोनेफेल्ड विमानतळावर आलो. खिशात राहिलेली काही मार्कसची नाणी संपविण्यासाठी विमानतळावरील एका शॉप मधून चॉकलेटम् खरेदी केली केवळ आठवणी दाखल काही नाणी ठेवली कस्टम एन्क्लोजरमध्ये जाण्यापूर्वी मिसेस रेइन्केनी जर्मनीतील मुक्कामात घेतलेले काही फोटो प्रिंटर्स आणून दिले व बाकीचे मागाहून पाठविण्याच आश्वासन दिल

'विमानाने प्रवास करणाऱ्या प्रत्येक आप्तेष्टाला सुखरूप पोचल्याच लाबडतोब पत्र लिहिण्यास मी सांगत आले आहे आपणास सागरो भारतात सुखरूप पोचताच ख्यालीखुशालीच पत्र लिहायला विसरू नका' असं मिसेस रेईन्केनी वारवार बजावून सागितल जर्मन स्त्री हीसुद्धा भारतीय स्त्रीप्रमाण भावुक मनाची असल्याचा पडताळा पुन्हा आला तिच्या या प्रेमाच्या निरोपान डोळे ओलावले जड अत करणान हस्तादोलन करून मी मिसेस रेईन्केचा व त्याचबरोबर पूर्व जर्मनीचा निरोप घेऊन मॉस्कोला जाणाऱ्या एरोफ्लोट विमानात पाऊल ठेवण्यास निघालो

बर्लिन विमानतळावरील उतारूसाठी राखीव असलेल्या वेटिंग हॉलमध्ये एकटाच बसलो होतो वाट पाहात मॉस्कोला जाणाऱ्या विमानाची वर्दी माईकवरून कधी मिळते याची प्रतीक्षा करीत सर्व सापस्कार पूर्ण झाल्यावर बोर्डिंग कार्ड (विमान प्रवेश पत्र) कोटाच्या खिशात टाकून त्या प्रशस्त हॉलच निरीक्षण करीत वेळ काढत होतो हॉलमध्ये पुष्कळ उतारू पुढचात बॅगा ठेवून ताटकळत बसले होते बहुतेक सर्व गोऱ्या कातडीचे होते काही लालबुंद गुलाबी रगाचे अरबी उतारू होते, परतु त्या गोऱ्या रंगाच्या पार्श्वभूमीवर माझा 'काळा (आमच्या दृष्टीने माझा कातडीचा गोरा असला तरी युरोपमध्ये तो काळाच मणला जातो त्याला आपण तरी काय करणार ?) रग उठून दिसत असावा कारण बहुतेकाच लक्ष माझ्या कृष्ण-वर्णावर वळत होत मध्येच अनाउन्समेंट होई अर्थात जर्मन भाषेतून प्रथम व्हायची व मागाहून इग्रजीतून अनाउन्समेंट झाली रे झाली की मी लगेच माझी बॅग व ब्रीफकेस उचलून उठायचा प्रवेशद्वारावरील गण वेषातील एकाद्या गौर ललनेला गाठून मॉस्कोला जाणाऱ्या विमानाची वेळ झाली का अशी पृच्छा करायचो ती ललना मोडक्या तोडक्या इग्रजीतून नाही अस सागायची व मी मुकाट्यान परत जागेवर येऊन बसायचो असा प्रकार बऱ्याच वेळा घडला प्रयाणाची वेळ टळून गेली तरी मॉस्कोला जाणार एरोफ्लोट विमान कपनीच विमान निघण्याचं काही चिन्ह दिसेना मी अकारण अस्वस्थ झालो आता माझ्याबरोबर दुभाषी नसल्यान कोणाला विचारायच हा माझ्यापुढ पेच पडला वरेच उतारू आपापल विमान येताच निघून गेले. माझ आपल 'ग्यानबा तुकाराम' चालूच होत वारकऱ्याप्रमाण मी तत्परतेन

एक पाऊल टाकायचो व ते मॉस्कोच विमान नाही हे कळल्यावर एक पाऊल माग टाकायचो मॉस्कोला ४-३० वाजता प्रयाणाची वेळ ठरलेली होती साडेपाच वाजत आले तरी हालचाल दिसेना मला वाटायला लागल, बहुधा सर्वच ठिकाणी वाहन वेळेवर निघत असेल तर शपथ शेवटी पावणेसहा वाजता मॉस्कोला निघण्याच्या तयारीन उभे असलेल्या उतारूना वर्दी मिळाली मी टुणकन् उडी मारून सर्वांच्या आधी दरवाजाजवळ गेलो बोर्डिंग कार्ड दावबून व्हॅन-मध्ये चढलो व्हॅनमधून सर्व उतारूना एरोफ्लोट विमानाकड नेण्यात आल रशियात पोचण्यापूर्वी रशियन विमानात पाऊल टाकल आपल्याकडे हवाई सुदऱ्या दरवाजात सुहास्य वदनान स्वागताला उभ्या असतात तशा रशियन विमानात हवाई सुदऱ्या स्वागताला उभ्या राहिलेल्या दिसल्या नाहीत त्यामुळे जरा खट्टू झालो हवाई सुदऱ्या विमानात धावपळ करताना दिसल्या. आपल्याकड बसमध्ये चढल्यावर खिडकीजवळची जागा पकडण्यासाठी उता-रूची जशी धावपळ होते तशीच या मोठ्या बोईंग विमानातसुद्धा उतारूची झुंवड उडाली, परंतु युरोपियन लोकानी कितीही धावपळ केली तरी कुणीही आपला धक्का दुसऱ्याला बसणार नाही याची खबरदारी घेते तसेच तोंडा-वाटे ब्र देखील कुणीही काढत नाही सगळा मुक्यान व्यवहार गोंगाट नाही कमला आवाज नाही

मी एक खिडकी गाठली माझ्या बाजूची जागा बराच वेळ रिकामीच होती मॉस्कोपर्यंतच्या माझ्या सोबतीला कोणता उतारू येतो याकडे माझे लक्ष होते तेवढ्यात एक अमेरिकन वृद्धा माझ्याजवळ येऊन आपल्या शेजारच्या सीटवर नसली तर आपली हरकत नाही ना ? अस नम्र स्वरात विचारू लागली हरकत घेणारा मी कोण ? जागा विमान कपनीची आहे· कुणीही कुठही बसाव सीट रिझर्वेशनची वात नाही, परंतु एटिकेटस पाळ-ण्याची सवय पश्चिमात्याच्या रक्तातच असते माझ्या वाट्याला गोरी म्हातारी आलेली पाहून मी कपाळावर हात मारला माझ्या शेजारी एकादी बाईच येणार असेल तर ती तरुण, निदान मध्यम वयस्क असावी ! छे छे आता मॉस्कोपर्यंत ही म्हातारी माझा जीव खाणार अस वाटायला लागल कारण तिने बसल्यापासून माझ्याशी अखडपणे सभाषण पजाब मेलच्या वेगान चालूच ठेवल अमेरिकेतील म्हाताऱ्याना म्हातारी म्हटल तर लगेच राग येतो

हे मला ऐकून माहीत असल्यानं मी तिच्याशी बोलताना चुकून तिच्या वृद्धत्वाचा निर्देश करण्याच्या फंदात पडलो नाही. सगळ्या म्हाताऱ्या बाया-सारख्याच म्हाताऱ्या बायकांना कुठं चाललात, कुठून आलात वगैरे नस्त्या उठाठेवी करायची भारी आवड. मी जर्मनीत होतो. आता मॉस्कोमार्गे भारतात परत जात आहे असं सांगितलं. मी भारतीय आहे हे समजल्यावर त्या म्हातारीला माझ्याशी गप्पा मारण्याचा आणखी चेव आला. कारण ती म्हातारी यापूर्वी भारताची ट्रिप करून गेली होती. मुंबईला एक दोन दिवस होती. आता ती रशियाच्या ट्रिपवर आली होती. तिच्याशी माझ्या गप्पा हळूहळू रंगत चालल्या. संध्याकाळची वेळ असल्यानं प्रथम सर्व उतारूंना हवाई सुंदऱ्यांनी मद्याचे चषक आणून दिले. मी अर्थात त्याला नकार दिला. म्हातारीला आश्चर्य वाटलं. मद्य घेत नाहीस तर निदान थंड साधं पेय तरी घे असा आग्रह करू लागली. तिच्या आग्रहास्तव मी थंड पेय घेतलं. हवेत चांगलाच गारठा असल्यानं आणखी हुडहुडी भरली. नंतर डिनर (रात्रीचे जेवण) आले. म्हातारीने आपल्या वाटचाचा क्रीम केक, चॉकलेट चीजची वडी, फळं माझ्याकडं सरकलं. ती म्हणाली, 'मी रात्रीच्या वेळी जास्त खात नाही. तू तरुण आहेस. खा तू.' तिच्या प्रेमळ आग्रहास्तव मी त्या वस्तू घेतल्या. खाल्ल्या नाहीत. कारण पोटात जागा नव्हती. खिशात ठेवून दिल्या.

म्हातारीशी अवांतर विषयावर पुष्कळ गप्पा मारल्या. आमच्या बाजूच्या दोन सीटवर तरुण जोडपे बसले होते. म्हातारी त्यांच्याबरोबर प्रवासाला आली होती. त्या जोडप्यापैकी बाई माझ्याकडे पाहून मिस्किलपणे हसत होती व नवऱ्याला खुणावून काही तरी सांगत होती. त्यावरून मॉस्कोला पोचेपर्यंत तरी तुमची म्हातारीच्या तावडीतून सुटका होण्याची आशा दिसत नाही असं ती ध्वनित करीत होती हे मला समजले. पण म्हातारीची सोबत मला मुळीच बोअर वाटली नाही. आम्ही पुष्कळ गप्पा केल्या. म्हातारीनं आता पुढच्या खेपेला आमच्या अमेरिकेला या बरं का असं प्रेमाचं आमंत्रण सुद्धा देऊन ठेवलं.

गप्पांच्या नादात कधी मॉस्को विमानतळ आला हे समजलंही नाही. खिडकी-तून मॉस्कोचे मिणमिणते दिवे दिसू लागले. काही वेळानं एरोफ्लोट विमान मस्कवा (मॉस्कोचा खरा उच्चार) विमानतळावर थांबलं. इतरांबरोबर मी

ब्रीफकेस घेऊन खाली उतरलो उतरण्यापूर्वी म्हातारीचा निरोप घ्यायला विसरलो नाही व्हॅनमधून–एअर पोर्टच्या मुख्य इमारतीत गेलो दरवाजात हेल्थ कार्ड, पासपोर्ट वगैरेचे चेकींग झाल. पासपोर्ट परत न देता ठेवून घेतला मी अस्वस्थ झालो कारण परदेशात पासपोर्ट हाच आपला खरा आधार पासपोर्ट हीच सरक्षणाची खरी काठी पासपोर्टच ठेवून घेतल्यामुळ मी गोंध-ळलो पासपोर्ट मागितला, पण पासपोर्ट अधिकाऱ्याला इंग्रजी समजेना त्याच रशियन मला समजेना आता काय कराव असा प्रश्न पडला

जवळच टेबल–खुर्च्या माडून काही युवक बसलेले दिसले त्याच्या टेबला-वर चित्रपट महोत्सवाचा फलक होता आतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हल आपल स्वागत करीत आहे अस इंग्रजीतून लिहिलेल वाक्य दिसल तेव्हा फिल्म-वाल्याची मदत घेण्याच ठरवल त्याच्या टेबलाजवळ जाऊन इंग्रजीतून चौकशी केली माझा पासपोर्ट काढून घेतला आहे, तो मला परत द्यायला सागा अशी मी त्या युवकाना विनती केली ते तरुण सफाईदार इंग्रजीतून बोलले. त्यांनी सागितले की, आपण काळजी करू नका चोवीस तास मुक्काम करून आपण जेव्हा भारतात जाण्यास निघाल त्यावेळी आपणास पासपोर्ट परत केला जाईल तेव्हा कुठे माझा जीव भाड्यात पडला त्या युवकानी चित्रपट उत्सवाला उप-स्थित राहाण्याच निमत्रण दिल आपले राजकपूर येणार आहेत अस त्यानी मला उत्साहान सागितल मी मुबईचा राहणारा हे समजल्यावर तर एका तरुणाने मुबईच्या रशियन कॉन्सुलेटमधील एका अधिकाऱ्याशी आपल नात असल्याचही सांगून टाकल

नतर मी ट्रान्झीट विभागात गेलो तेथे माझी मोठी बॅग येईपर्यंत थाबलो ट्रॉन्झीटमध्ये उद्या सध्याकाळच्या दिल्लीला जाणाऱ्या एरोफ्लोटच्या विमानात सीट बुक केव्हा करायची याबद्दल चौकशी केली उद्या सकाळी दहा वाजता सीट रिकामी असल्यास बुक करू अस सागण्यात आल बॅग येताच एका हमालाने हातगाडीवर घातली व तो हमाल मला घेऊन विमानतळापासून एका फर्लांगावर असलेल्या हॉटेलमध्ये गेला माझ्या पाठोपाठ एक जपानी तरुण व गोरी मुलगी येत होती ती मुलगी रशियन होती हॉटेलमध्ये पोचल्यावर प्रत्ये-काला स्वतत्र खोली मिळणार नाही. एक खोली दोघांनी विभागून घ्यावी लागेल अस सागण्यात आल जपानी तरुणाबरोबर आलेल्या रशियन मुलीन

आपली काही हरकत नाही ना अशी मला विनती केली उलट मला कम्पे-निअन मिळतो आहे अस यातून वर वाटल आम्हाला दोघाना एक खोली देण्यात आली त्या जपानी तरुणाच नाव तोशिओ इरितानी अस होत ता टोकाई (म्हणजे टोकियो) विद्यापीठात असिस्टट प्रोफेसर होता तो पी एच डी होता विद्यापीठ परिसवादात भाग घेण्यासाठी तो ॲमस्टरडमला निघाला होता मॉस्कोत रात्र काढून सकाळी तो विमानान ॲमस्टरडमला जाणार होता मॉस्कोत त्याची मैत्रीण त्याला भेटण्यासाठी आली होती

तोशिओने सामान ठेवल व आपण मैत्रिणीला पोचवून येतो अस सांगून तो निघून गेला मी कपडे काढले मला भूक नव्हती, परतु हॉटेलात उतरलो असल्यान जेवणासाठी बोलावण येईल आल तर नाममात्र काहीतरी खाऊन घेईन अशा विचारात वाट बघितली, परतु हॉटेलमध्ये सर्वत्र सामसूम दिसली आमच्या खोलीजवळच बाहेर बाथरूम सडास होता हॉटेल चालिकेन आल्यावर तो दाखवून ठेवला होता कुणीच बोलवायला येईना अस पाहिल्यावर नाईट ड्रेस चढविला ब्रशला पेस्ट लावून दात घासण्यासाठी बाथरूममध्ये गेलो तेथे एक भारतीय दिसला त्याच्याकडे चौकशी केल्यावर हॉटेलमध्ये केवळ राह-ण्याची सोय आहे, जेवणासाठी ट्रान्झीटमधून कुपन घेऊन एअर पोर्टच्या रेस्तॉरांमध्ये जेवणाची व्यवस्था केली आहे, अस समजल त्या भारतीयाच नाव हरबानसिंग लडनमध्ये शिकत होता सुटीत भारतात चक्कर टाकण्या-साठी निघाला होता काही वेळान तोड धुण्यासाठी एक ब्रिटिश मुलगा आला अवघा तेरा वर्षांचा मुलगा त्याचे आई-वडील सिंगापूरला राहात होते तो एकटा इग्लडमध्ये राहून शिकत होता सुटीत तो एकटा विमानान सिंगापूरला जात होता. मला त्याच्या धीटपणाच खरच कौतुक वाटल चार्लस त्याच नाव स्मार्ट मुलगा वाटला तोंड धुऊन मी ताणून दिली दरवाजा उघडाच ठेवला माझा नवा जपानी मित्र कधी आला हे मला समजलच नाही त्यान कपडे काढले व तो दुसऱ्या कॉटवर आडवा झाला तेव्हा कॉटची फळी दुभगली अन तोशिओ खाली कोसळला त्या आवाजाने मी धडपडून जागा झालो. तो ओशाळला मी त्याला कॉटची फळी नीट लावण्यास मदत केली नतर आम्ही झोपलो

सकाळी जाग आली तेव्हा मी कुठ आहे याची प्रथम कल्पनाच येईना

झोपेत मी भारतात असल्याच स्वप्न पडले होत उठून पाहिल्यावर आपण मॉस्कोत असल्याची जाणीव झाली खिडकीतून बाहेर पाहिल विमानतळावर विमानेच विमाने दिसत होती, आजूबाजूला वस्तीचा मागमूस नव्हता

मी तोशिओचा निरोप घेतला सर्व व्यवहार आटोपून चार्लसबरोबर विमानतळावर ट्रान्झीट विभागात आलो तिथ हरबानसिंग मित्राबरोबर बसलेला होता त्यांना कुपन्स मिळाली होती चार्लसलाही मिळाली मीसुद्धा ब्रेकफास्टसाठी कुपनची मागणी केली माझ्याकडच्या तिकीटावर सीट आगाऊ रिझर्व झाल नव्हत रिक्वेस्ट करून जागा रिकामी असल्यास सीट रिझर्व्ह होणार होत, या सबबीवर ट्रान्झीटमधील रशियन तरुणी कुपन देण्यास का कू करीत होती मी विचारल माझ तिकीट ऐनवेळी दिल गेल्यामुळे आगाऊ सीट रिझर्व्हेशन झाल नसेल पण म्हणून चोवीस तासाच्या मुक्कामात मी काय उपाशी राहायच की काय अस मी चिडून विचारल त्या तरुणीन कंट्रोल अधिकाऱ्याशी विचारविनिमय करून अखेर ब्रेकफास्टच कुपन दिल ते कुपन घेऊन मी पहिल्या मजल्यावरील हॉटेलमध्ये गेलो बरे झाले हरबान्सिंग व त्याचा मित्र ज्या टेबलावर बसले होते त्याच टेबलाकडे मी मोर्चा वळविला त्यानी आम्लेट घेतले होते ब्रेड बटर मागविला होता मी म्हणूनच वेटरला आम्लेट, ब्रेड बटर आणायला सांगितल रशियन भाषा येत नसल्यामुळे वेटरशी कोणत्या भाषेत बोलायच ही पंचाईत वेटरला रशियनशिवाय अन्य कुठलीच भाषा समजत नव्हती कॉफी घेतल्यावर आम्ही ट्रान्झीटमध्ये आलो सध्याकाळच्या प्लेनमध्ये दिल्लीला जाण्यासाठी सीट रिझर्वेशन केल दहाच्या सुमारास मॉस्को शहर पाहण्यासाठी टुरिस्टाना नेण्यासाठी बस येणार होती मी चार्लसला माझ्याबरोबर ट्रान्झीटमध्ये थांबायला सांगितल काही वेळान बस आली आम्ही सर्वजण बसमध्ये बसलो बरोबर एक तरुण गाईड होती फडर्या इंग्लिशमध्ये बोलू शकणारी ती गाईड म्हणजे जणू शाळेची मास्तरीण बाई व आम्ही टुरीस्ट म्हणजे तिचे विद्यार्थी, अशा थाटात आमच्या स्वाऱ्या मॉस्को शहराच्या दिशेन निघाल्या

कित्याच मैलांचा निर्जन प्रदेश ओलांडल्यावर आमची बस मॉस्को शहराच्या परिसरात शिरली छोटीछोटी बैठी घरे पाहून हेच का जगप्रसिद्ध मॉस्को शहर असा प्रश्न मनात आला मॉस्कोतील परिसरात अद्याप जुन्याच

काळच्या पद्धतीची छोटी छोटी बैठी घरे आहेत काही वेळान एका बाजूला स्मारक स्तंभ दिसला गाईडन सांगितल की, मॉस्को शहराच्या सीमेवर या ठिकाणापर्यंत हिटलरच्या फौजा येऊन थडकल्या होत्या व तेथूनच त्याना माग हटविण्यात आल म्हणून या ठिकाणी स्मारक स्तंभ उभारण्यात आला आहे प्रथम एका नदीच दर्शन घडल सथ वाहात होती नदीचे नाव मस्कावा नदी या नदीवरूनच शहराला मस्कावा शहर हे नाव पडल ही नदी वळसे घेत शहरभर फिरली आहे

लाल चौक व लेनिन मॉसोलियम पाहून मॉस्को स्टेडियमकडे गेलो स्टेडियमच्या परिसरात हिवाळ्यात बर्फाचे खेळ खेळण्यासाठी खास सोय केली आहे स्टेडियम बघत असताना नवविवाहित दापत्य आलेल दिसल नव-वधू पाढऱ्या शुभ्र पेहराव्यात नटली होती वरान काळा सूट परिधान केला होता हातात हात घालून दापत्य आनदान जात होत काही वेळान दापत्यान टॅक्सी थाबविली व तीत बसून ते निघून गेल रशियातसुद्धा विवाह नोंदणी-पद्धतीने होतात कुणी चर्चमध्ये जात नाही

आपण वर्षातून मिळणाऱ्या सुटीत काय करता असे मी रशियन गाईडला विचारल ती थाबली व म्हणाली, 'रशियात आम्हाला कशाचीच ददात भासत नाही मुलाच्या शिक्षणाची, नोकरीची हमी सरकारने घेतलेली आहे म्हातारपणची चिंता नाही वर्षातून मिळणाऱ्या सुटीत आम्ही निरनिराळ्या देशात सफर काढतो मजा करतो मी आतापर्यंत इग्लड, अमेरिका वगैरे देशाना भेटी दिल्या आहेत इग्लंड–अमेरिकेतील समृद्ध जीवनाचा आपणास कधीच हेवा वाटला नाही' का असे विचारले असता ती अभिमानान म्हणाली, 'आमच्या देशात काय कमी आहे म्हणून मला त्याच्या जीवनाचा हेवा वाटेल ? पाश्चिमात्य देशांइतकीच माझ्या देशान सर्व क्षेत्रात प्रगती केली आहे आमच जीवन देखील तेवढच समृद्ध आहे पाश्चिमात्यापेक्षा आमच जीवन अधिक सुखी आहे कारण त्याच्याकडे जेवढी अफाट संपत्ती आहे तेवढीच बेकारीपण आहे आमच्या देशात बेकारीचा मागमूस नाही आमच्या देशातील लोक भवितव्याबद्दल नि शक असतात त्यामुळ आमच जीवन अधिक सुखी आहे'

सबध मॉस्को शहर हिडून पालथ घातल लुमुम्बा विद्यापीठ शहराच्या बाहेर असल्यान तिथ जाता आल नाही

वरचस शहर बसमधून बघितल लाल चौक, मास्को विद्यापीठ व स्टेडियम वगैरे ठिकाणी प्रत्यक्ष हिंडून पाहिल नतर दुपारी एक वाजेपर्यंत विमानतळावर परतलो गाईड इझाबेलाचे आभार मानले व निरोप घेतला मॉस्कोहून विमान उशिराच सुटल एरोप्लोटच्या विमानात सध्याकाळच जेवण झाल मॉस्को ते दिल्ली पाच साडेपाच तासाचा प्रवास नॉन स्टॉप, मी चक्क झोपलो दिल्ली आल्यावर जागा झालो

बॅग घेऊन खाली उतरलो भारतीय भूमीवर पाय ठेवताना मन उचबळून आल रात्रीचे अडीच वाजले होते सकाळी सव्वा सहा वाजता इडियन एअर लाईनच मुबईला जाणार विमान होत सकाळी जागा रिकामी असल्यास आपणास त्याच विमानान मुबईला जाता येईल अस मला इडियन एअर लाइन्सच्या कचेरीत सागण्यात आल त्यावेळी दिल्ली हॉटेलचा सप चालू होता त्यामुळ विमानतळावरील हॉटेल बदच होत नळावरच पाणी पिऊन पहाट होईपर्यंत खुर्चीत बसून रहाव लागल सकाळी जागा मिळणार असल्याच समजताच मुबईला ट्रककॉल करून घरच्या मडळीना विमानतळावर येण्याचा निरोप दिला सगळ्यात शेवटी मला तिकीट मिळाल मी इडियन एअर लाइन्सच्या विमानात बसलो विमान सुटण्यापूर्वी माईकवरून माझ्या नावाचा पुकारा झाला काय भानगड झाली तेच समजेना मी उठून हवाई सुदरीजवळ चौकशी केली खाली उतरून आपली बॅग विमानात चढविली गेली किंवा नाही याची खात्री करून घ्या अस मला सागण्यात आल मी शिडी उतरून खाली आलो बऱ्याच बॅगात माझी बॅग विमान तळावर पडलेली मला आढळली मी पर्सरला ही माझी बॅग अस सागताच ती विमानात घालण्याची व्यवस्था करण्यात आली नतर मी विमानात चढलो व विमान सुटल

रात्रीच्या जागरणामुळे डोळे चुरचुरत होते परतु डोळ्याना कधी एकदा मुबईच दर्शन घडत अस झाल होत जयपूरला थोडा वेळ विमान थाबल नतर आमचा ब्रेकफास्ट झाला दोन तासान मुबई आली शिडी उतरून विमान तळावर चालत निघालो थोड्या वेळाने सौ व मुले आणि आमचे शेजारी श्री महाजन हात हालवीत माझे स्वागत करताना दिसले माझे डोळे बहरून आले पूर्व जर्मनीच्या दौऱ्यावरून मी सुखरूप परत आलो होतो

४ ४ ४

' गंगा गये गंगादास जमना गये जमना-दास ' अशा अर्थाची आपल्याकडे म्हणच आहे मुळी युरोपमध्येही अशाच आशयाची एक म्हण रूढ आहे When in Rome do as Romans do याचा अर्थ, आपण जेव्हा युरोपमध्ये रोम शहरात जाता तेव्हा जस रोमन लोक वागतात तसच वागा भारतापासून सहस्र मैल दूर असलेल्या जर्मन देशात गेल्यावर जस जर्मन लोक वागतात तसच आपणही वागायला हव हे ओघा-ओघान आलच की

जर्मनीत लोक साध पाणी पीत नाहीत ते जेवणावर बिअर तरी घेतात अगर कुठल तरी मद्य घेतात याच कारण त्यांच्याकडच पाणी हे शुद्ध पिण्याच पाणी नसत त्याचध्याकड बिअर पाण्या सारखी पितात, पण त्याच्याकड पाणी प्यायच नसत हे तरी मला कुठ माहित होते ?

मी जर्मनीतील मुक्कामी जेवण घेतल्यावर पाणी कुठ आहे याची चौकशी केली याच कारण मला अगदी पहिल्या घासाला पाणी ढोसायची सवय आपल्याकडील हॉटेलात ऑर्डर देण्यापूर्वी पाण्याचे ग्लास टेबलावर हजर, पण जर्मनीत तशी कुठच व्यवस्था दिसली नाही इकडच पाणी प्यायच नसत हे कळल्यावर तर माझ्या तोंडच (उरलसुरल) पाणी पळाल भारतातून निघते वेळी सौ न वारवार बजावल होत की, हे बघा तुम्ही मद्याच्या थेंबालासुद्धा स्पर्श करणार नाही हे मला ठाऊक आहे तरीपण तुम्ही जर्मनीत गेल्यावर निदान बिअर तरी घ्या बर का माझी तुम्हाला ' फुल्ल ' परवानगी आहे युरोपमधील थडीत बिअर प्यावी अस लोक म्हणतात बिअर प्रकृतीला बरी भरपूर बिअर बिअर (एकाच अर्थाचा दुसरा शब्द बनविताना ' ब ' या अक्ष-राचा वापर केला जातो उदा वाघ–बीघ परतु, बिअर या शब्दातच ' ब '

हे अक्षर मुळात असल्याने सौ चा नाइलाज झाला असावा) प्या अन चागले जाडजूड होऊन या

सौ ची 'फुल्ल' परवानगी असूनसुद्धा मी बिअरच्या वाटेला गेलो नाही. मनात म्हटल, जाडजूड व्हायच असेल तर इकडच्या हवेनच होईन त्यासाठी कुठल्याही मद्यार्काला स्पर्श न करण्याचा माझा नेम मोडा कशाला ? म्हणून बिअर घेण्याच नाकारल कुठल तरी स्वीट ड्रिंक घेऊन तहान भागवावी लागली, पण पाण्याची तहान ऑरेंज ज्यूस अगर पायनॅपल ज्युसने थोडीच भागते पिण्याच्या बाबतीत मी जर्मन लोकाच अनुकरण करण्याच नाकारल तरी खाण्याच्या बाबतीत मात्र कुठलच पथ्य पाळल नाही काय वाटेल ते खाल्ल मी पडलो मासाहरी इतर मांसाहारी लोक जे काही मागवायचे ते मीसुद्धा मागवायचा त्यात कोणताच भेदभाव केला नाही बीफ (गोमांस,) पोर्क (डुकराचे मांस,) हरणाचे मास, गव्याचे मास वाटेल ते मास खाल्ले. (बीफ खाल्ले हे समजल्यावर आपण छत्तीस कोटी देवाचे वसतीस्थान असलेला प्राणी पोटात रिचवला महाभयकर पाप केल अस काही वाटल नाही इकडच्या गायी काळ्या कुळकुळीत व चागल्याच गलेलठ्ठ असतात बहुधा त्याच्या पोटात देवाची वस्ती नसावी ) अर्थात, त्याच्याकडे मटनाची डिश म्हणजे केवळ शिजवलेले मास असते आपल्याकडे मटनाला जसा भरपूर गरम मसाला, चवीष्ट स्वाद व खमग वास असतो तस त्याच्याकडच्या मटनात काहीच नसत ऑर्डर दिल्यावर फ्रीजमधल मास काढतात, शिजवतात अन् थाळीत घालून आपल्या पुढ्यात ठेवतात. वर मीठ व काळे मिरी याची भुकटी पेरायची बस्स !

जे खाण्या–पिण्याच्या बाबतीत तेच वागण्याच्या बाबतीत. जर्मनीतील लोक मनमोकळेपणे वागणारे, पण त्यात स्वच्छदीपणा अगर स्वैराचाराचा मागमूस नसायचा आपण काही झाल तरी पडलो भारतीय पूर्वापार सस्कारानी आमचे आचारविचार घडविलेले त्यामुळे आम्हाला त्याचे वागणे नाही म्हटले तरी खटकायच तरुण मुले–मुली रस्त्यावरून हिंडताना दिवसाढवळ्या चार चौघात एकमेकाना मिठ्या काय मारायच्या, चुबनाची खैरात काय करायची शातम् पापम !

असली दृश्ये भारतीयांना परदेशी चित्रपटातच पाहायची सवय प्रत्यक्षात

जेव्हा हातात हात घालून जाणारे प्रेमी जीव तोंडात तोंड घालून बोलताना दिसू लागले तेव्हा आमची तोंडे जिथल्या तिथ बद हेच दृश्य पुण्या–मुबईच्या रस्त्यावर दिसल असत तर

तर बदचा आदेश न देता 'पुणे मुबई बद'चा कार्यक्रम आपोआप यशस्वीरित्या पार पडला असता कारण रस्त्यावर एवढी काही तोबा गर्दी लोटली असती की, शहरातील सर्व व्यवहार पूर्णपणे बद पडले असते

जर्मनीतल्या लोकांना मात्र त्याचे काहीच सोयरसुतक वाटत नाही भर रस्त्यात अगर चौकात (त्यांच्या भाषेत चौकाला प्लाझ म्हणतात) यौवनाने मुसमुसलेल्या प्रमदेने एकाद्या मदनाचे शरसधान केले, जगाची पर्वा न करता चुबनाचे सौख्य अनुभवले तर ती त्या प्रेमी युगुलाची वैयक्तिक बाब मानली जाते कुणालाच त्याबद्दल वावगे वाटत नाही ते दृश्य बघायला एकही व्यक्ती क्षणभर थाबत नसते

आम्हाला मात्र ते सार नवीन असल्यान कितीही निग्रह केला तर आमच्या नजरा अचूक त्या प्रेमाच्या सार्वजनिक प्रदर्शनाकडे खेचल्या जायच्या काय करणार? 'आदतसे मजबूर' पडलो ना

काही तरुण-तरुणी तर चालता-हिंडताना एकमेकाची ओझरती चुबन घ्यायची सभाषण चालू ठेवायच, हातात हात घालून चालत रहायच, मध्येच एकमेकाचा (Flying Kiss) उडत चुबन घ्यायच काही तरुणतरुणीच उडत्या चुबनावर समाधान होत नसे ते दीर्घ चुबन घेत रस्त्यावर दोन-दोन तीन-तीन मिनिट स्वर्गीय समाधी लावून बसायचे ते पाहून आम्ही अस्वस्थ व्हायचो अरे, काही काळ वेळ आहे की नाही? अस भर रस्त्यात लैला-मजनूसारख ब्रह्मानदी टाळी लावून मिठ्या काय मारता, चुबन काय घेता? अगदीच ताळतत्र सोडलाय लेकांनी

परतु जर्मन लोक स्थितप्रज्ञासारखे निर्विकार मुद्रेन या प्रेमलीलाकडे कसे काय पाहू शकतात याच आम्हाला प्रथम आश्चर्य वाटायच, परतु पधरवड्याच्या मुक्कामात आम्हाला त्यांच्या वागण्यातील गोम समजली

आमच्या दिमतीला दोन पोंश कार होत्या त्या गाड्याचे ड्रायव्हर गमत्या होते ते आपल्या कामात–गाडी हाकण्यात तरबेज तर होतेच, पण त्यांचा स्वभाव थट्टेखोर होता एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाताना रस्त्या-

वरून तरुण मुलगी दिसली रे दिसली की याची कॉमेंट्री सुरू झालीच म्हणून समजा खिडकीतून डोकं बाहेर काढून आपला शेरा त्या मुलीच्या कानी पडेल एवढ्या मोठ्यानं ते बोलायचे वयस्क बाईच्या वाटेला ते चुकून जात नसत, परंतु तरुण मुलगी दिसली–विशेषत ती जर सुंदर असेल तर ते जर्मन भाषेत अहेर पोचता करायचे अन् मजा म्हणजे प्रत्येक मुलगी हसून त्याला प्रतिसाद देई. काही तरी गोड प्रत्युत्तर देऊन स्वागत करी

एकदा काय झालं, रस्त्याच्या कडेला कार उभी होती दोन बाया जवळच उभ्या होत्या एक वयस्क अन् दुसरी जवान ड्रायव्हरनं गाडी किंचित स्लो केली, खिडकीतून डोकं बाहेर काढलं अन् साळसूदपणाचा आव आणून त्याना सांगितलं बायानो, आपल्या गाडीचं मागचं चाक पंक्चर झालंय जवान मुलीला ते खरंच वाटलं ती मागे वाकून मोटारीचं चाक पाहू लागली. आपली फसगत झाल्याचं तिला समजलं, पण ती चिडली नाही हसली. ड्रायव्हरला पावती मिळाली.

रस्त्याच्या कडेनं एक मॉडर्न तरुणी चालली होती सायकल चालविताना तिला धाप लागत होती कारण अंगानं ती चांगलीच भरली होती तिला पाहून ड्रायव्हरला तिची फिरकी घेण्याची सुरसुरी आली त्यानं गाडी किंचित उभी केली सायकलवाली जवळ येताच ड्रायव्हरने सिरियसली सांगितलं बाई ग, सांगतो म्हणून रागावू नको, पण तुझ्या ब्लाऊजची बटनं पाठी-मागे लावली गेलेली नाहीत जरा बघ त्या मॉडर्न मुलीला ते खरंच वाटलं ती मागे वळून चाचपून पाहू लागली तिला फसविल्याच्या आनंदात ड्रायव्हरनं गाडी भरधाव सोडली त्या मुलीनं हसण्यावारी नेलं

आमच्या दिमतीला असलेल्या दुभाष्यानं सांगितलं की, दोघेही ड्रायव्हर सुशिक्षित, सभ्य, बालबच्चेवाले संसारी तरुण आहेत त्यांची ही थट्टा मस्करी निरोगी स्वरूपाची आहे त्यात मुलीचं वाईट हेतू नसतो तसंच जर्मन मुलीनाः सुद्धा थट्टामस्करीचं मुळीच वावडं नाही त्यांना असली थट्टामस्करी आवडते. त्या हसून या मस्करीचं स्वागत करतात यावरून आपल्या लक्षात आलं असेलच

ही असली थट्टामस्करी आपल्या देशात मवालगिरीच्या सदरात मोडते. चारसोबीसगिरी या नावानं ती प्रसिद्ध आहे आपल्याकडे कुणी तरुण मुलीची

छेड काढली तर ती मुलगी चप्पल काढील, इतकच नव्हे तर आजूबाजूच 'पब्लिक' सुद्धा मुलीच्या वाटेला जाणाऱ्याच चांगलच कार्डात काढील

आपल्या देशात स्त्री व पुरुष याच्यात फार मोठी दरी असते एकमेकाशी वागताना अतर ठेवून व्यवहार केले जातात जर्मनीत स्त्री-पुरुषाचे एकमेकाशी व्यवहार सलगीचे दिसले पुरुषाचा चुकून स्त्रीला स्पर्श झाला तर स्त्री मारक्या म्हशीप्रमाणे डोळे रोखून पहाते असा आपला अनुभव, परतु जर्मनीत स्त्री-पुरुष एकमेकाशी घसटून जातात तरी कुणालाच त्यात आक्षेपार्ह वाटत नाही

जर्मनीत पुरुषाच्या मानाने स्त्रियाचे प्रमाण अधिक त्यामुळ झालय काय, सर्वत्र स्त्री साम्राज्य असल्याचा भास होतो जळीस्थळी बायकाच बायका, सकाळच्या प्रहरी भररस्त्यावर चुकूनमाकून एखादा पुरुष दिसेल तर शपथ रस्त्यावर तरुण मुली, मध्यम वयस्क बायका व म्हाताऱ्या (त्याच्याकडील म्हाताऱ्यादेखील टुणटुणीत असतात) याचाच वावर दिसतो• क्वचित् म्हातारे पेन्शनर दिसतात नाही अस नाही

दुकानात जा सेल्समन बायका ट्राममध्ये शिरा ड्रायव्हर—कडक्टर बायकाच हॉटेलात घुसा, वेटर देखील बायकाच बायकाच प्रस्थ असल्यान तेथे स्त्रियाचा विनयभग होण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही झालाच तर पुरुषांचा विनयभग होतो (पण तो पुरुषांना सुखद वाटत असल्यान ते पोलिसात तक्रार करण्याच्या फदात पडत नाहीत ते निराळ)

पुष्कळदा माझी चमत्कारिक स्थिती झालेली आहे• सन्माननीय पाहुणे असल्याने सर्वत्र आम्हाला अगत्याने वागवले जात होते खाण्या-पिण्याच्या बाबतीत अगत्य दाखवता दाखवा बापडे, परतु अगचटीला जाऊन पाहुण्याविषयी आत्मीयता दाखविणे कितपत योग्य आहे ? आपल्याकडे पाहुण्याला पाहुण्यासारखाच वागवतात दुरावा ठेवून, अतर बाळगून, परतु जर्मनीत पाहुण्याशी अत्यत सलगीने वागणे हीच रीत आहे न पेक्षा पाहुण्यांचा अपमान होतो अशी बहुधा त्याची समजूत असावी आमच्या बरोबर असलेली दुभाषी ही पन्नाशी उलटलेली म्हातारी बाई होती तिला नातू देखील होता. परतु ती आमच्याशी अत्यत सलगीने, मोकळेपणाने वागायची

फोटोला उभे राहताना जर्मन स्त्री मग ती कुमारिका असो अगर विवा-

हित असो, परपुरुषाला अगदी खेटून उभी राहील दुकानात अगर सार्वजनिक ठिकाणी पुरुषाच्या खांद्याला खांदा भिडवून व्यवहार करील पुरुष-स्पर्श हा जर्मन स्त्रीच्या कोशात निषिद्ध मुळीच नसतो त्या पुरुषाशी हस्तांदोलन करतात पुरुष पुरुषाशी वागताना जेवढ्या मोकळेपणान वागतो तेवढ्याच मोकळेपणान स्त्रिया पुरुषाशी वागतात ड्रेस्डन या शहरातील प्रसिद्ध नॅशनल आर्ट गॅलरीत विवस्त्र स्त्रीच तैलचित्र पाहाताना आपल्याला कदाचित चोरट्यासारखे वाटेल, परतु स्त्रियांना त्याच काहीच वाटत नाही उलट तेथे गाईडच काम करणाऱ्या स्त्रिया अगदी रगात येऊन प्रत्येक चित्रकृतीच वर्णन करताना मला दिसल्या एक बाई तर ओळख-पाळख नसताना मोडक्यातोडक्या इग्रजीत मी न विचारता चित्राचा अर्थ सागत सुटली आर्ट गॅलरीत भटकताना तर मी चागलाच अस्वस्थ झालो ही नसती ब्याद आपल्यामागे कुठून लागली अस मला वाटायला लागल. पुरुषाशी विशेषत फॉरीनरशी स्त्रियाना बोलायला आवडत अस मला वाटल

रॉस्टॉक नावाच बाल्टिक समुद्रातील जर्मन बदर आहे त्या बदराजवळ वॉर्नमुंडे नावाचा सुदर समुद्रकिनारा (बीच) आहे (नाव जरा चमत्कारिक वाटत नाही का ? कुणाची तरी मुडी पिरगळल्यासारखा भास होतो) या बीचवर आम्ही भटकायला गेलो होतो जर्मनीत वसत ऋतूत (समर सीझन) हजारोंनी लोक बीचवर स्नान करायला विशेषत 'लाईफ एन्जॉय' करायला जातात आम्ही तेथे लोक कसे काय 'एन्जॉय' करतात हे पाहण्यासाठी गेलो होतो जेमतेम अवयव झाकण्यापुरते अगावर कपडे ठेवून स्त्री-पुरुष बीचवर मनमुराद आनद उपभोगतात हवाई आयलड, होनोलूलू वगैरे जग-प्रसिद्ध अमेरिकन बीचप्रमाणे युरोपात वॉर्नमुंडे बीच प्रसिद्ध आहे या बीचवर स्त्री-पुरुष हा भेदभाव मुळीच दिसत नाही आम्हाला बीचवर फिरताना कुणी आपलच वस्त्रहरण तर केल नाही ना अशी लाजेची भावना स्पर्श करून जायची, परतु त्या अर्धनग्न ललना चक्क आपणास धक्के मारून जायच्या आपल्या नाजूक अवयवाचा परपुरुषांना धक्का लागला याची त्याना खत वा फिकीर मुळीच नसायची

रात्र पडल्यावर जर्मनीत प्रणयाला उत येतो मुलांमुलीचे थवेच्या थवे भ्रमतीला बाहेर पडतात. गुटूरगू गुटूरगू करीत वळचणीत प्रणयलीला कर-

ऱ्या कबुतराच्या जोड्याप्रमाणे तरुण तरुणींच्या जोड्या प्रणयाराधन करीत हिंडतात पुष्कळदा या प्रणयी युगुलाना सामुदायिक दगामस्ती करण्याची लहर येते भर रस्त्यात आरडाओरडा, दगामस्ती, पकडापकडी, मारामारी चालते एकदा रात्रीच्या वेळी आरडाओरडा ऐकून मी रूममधून सज्जात येऊन उभा राहिलो मला वाटल, एव्हाना रस्त्यात गर्दी जमली असेल पोलीस धावत आला असेल, पण कसच काय नि कसच काय ! कुणीच याची दखल घेतलेली नव्हती हा त्याचा सामुदायिक प्रणयाचा खेळ होता त्यात कुणालाच आक्षेपार्ह वाटत नव्हते

नाईट क्लब हे रात्रीच्या करमणुकीचे उत्तम साधन जर्मनीतही लोक रात्रीच्या वेळी नाईट क्लबमध्ये जातात त्याच्याकडे देखील नाईट क्लबमध्ये कॅबेरे डान्सर आहेत त्यांच्याकडे फ्लोअर शो होतात लोक टेबल बुक करून कार्यक्रम पाहतात

आम्ही एका रात्री नाईट क्लबमध्ये कॅबेरे डान्स बघायला गेलो. (तरी बर, जर्मनीच्या दौऱ्यात माझ्याबरोबर आमच्या सौभाग्यवती नव्हत्या नाही तर आमची काही धडगत नव्हती 'कॅबेरे डान्स बघायला काय जाता ? काही लाजलज्जा आहे की नाही ?' असा तोफाचा भडिमार झाला असता ) इतर गेले म्हणून मी देखील गेलो भारतात, विशेषत मुंबई-सारख्या शहरात नाईट क्लबमध्ये कॅबेरे नृत्याच्या नावाखाली जो नगानाच (म्हणजेच नग्ननृत्य) चालतो (अस आपण नुसते ऐकलय प्रत्यक्ष पाहण्याचा योग कधी आला नाही) त्या मानाने जर्मन कॅबेरे डान्स कसा काय असतो हे पाहण्याची संधी अनायसे मिळते तर ती सोडा कशाला म्हणून भीत भीत नाईट क्लबमध्ये शिरलो मुंबईत नाईट क्लबमध्ये केवळ पैसेवाले लोक जातात जर्मनीत श्रीमत–गरीब असा भेदभाव नसल्यामुळे सर्रास लोक नाईट क्लबमध्ये जातात आमच्यासाठी टेबल रिझर्व्ह केल होत आम्ही जरा उशिरा पोचलो नाईट क्लबचे दरवाजे साडेनऊ वाजता बंद होतात आम्हाला मिनतवारीन प्रवेश मिळवावा लागला त्यासाठी बंद दरवाजासमोर तिष्ठत बसाव लागल लगेच त्या बंद दरवाजासमोर 'उघड दार देवा आता उघड दार' हा मराठी अभंग (मनातल्या मनात) म्हणायला सुरुवात केली देवाला केलेली आळवणी फळास आली म्हणून म्हणा किंवा दुभाष्याने केलेल्या वकिली-

मुळे म्हणून म्हणा (कारण आम्ही व्ही आय पी होतो ना) दरवाजा उघडला व आम्हाला आत प्रवेश मिळाला

इंग्रजीत एक म्हण आहे 'Bones for late comers' (उशिरा येणाऱ्याना मटनाऱ्या ऐवजी नुसती हाडे मिळतात.) आम्ही उशिरा नाईट क्लबमध्ये प्रवेश केल्यामुळे आमच्यासाठी खास रिझर्व्ह केलेले टेबल तर हातचे गेले, इतकेच नव्हे तर चक्क तमाशा थिएटरात (गोलपीठा किंवा लालबाग) उभे राहून खेळ पाहावा लागतो तसे राहून आम्हाला कॅबेरे डान्स बघावा लागला (उभं रहावे लागल्यामुळे आम्हालाही पायाचा डान्स करावा लागला)

जर्मन कॅबेरे डान्स बघून आमचा पुरा अपेक्षाभंग झाला काही तरी उत्तान, उन्मादक, प्रक्षोभक दृश्य डोळ्याचं पारण फेडेल असं चित्र मनात बाळगून गेलो होतो, परंतु, प्रत्यक्षात पायघोळ झगा घातलेली कॅबेरे डान्सर गाणं व नृत्य करताना दिसली तिच्या छातीचा भाग निम्मा अनावृत होता एवढच यापेक्षा आपल्याकडची संगीत बारी किती तरी श्रेष्ठ म्हटली पाहिजे कारण तमाशाच्या फडात अगर संगीत बारीत नर्तकी उत्तान व उन्मादक नृत्ये व हावभाव करतात त्या मानानं जर्मन कॅबेरे डान्स अगदी शामळू वाटला भलताच सोवळा वाटला आपल्याकडे तमाशात जसे सवाल-जवाब असतात तसेच त्यांच्याकडे कॅबरे डान्समध्ये सवाल-जबाबाचा कार्यक्रम असतो जर्मन भाषेतून संवाद चालू असल्यानं ते सगळे आमच्या डोक्यावरून गेले म्हणा फक्त चुकून एखाद इंग्रजी वाक्य कानी पडायचं ते तेवढ समजायचं. प्रेक्षकात सर्वजण सभ्य व प्रतिष्ठित मंडळी दिसत होती टेबलावर स्त्री-पुरुषसारख्याच संख्येनं जागा अडवून बसले होते

मध्येच ए ादा प्रेक्षक उठून नर्तिकेजवळ जायचा व आपली फर्माईश सुनवायचा ,क्षकाच्या फर्माईशीनुसार कॅबरे डान्सर गाणं म्हणायची गाणं चालू असताना कॅबेरे डान्सर प्रेक्षकामधून चक्कर मारायची परंतु कुठेही मर्यादेचे उल्लंघन आढळले नाही. नीतीमत्तेची लक्ष्मणरेषा ओलांडून कॅबरे डान्सरने अवयवाचे उत्तान प्रदर्शन केलेले दिसले नाही (चौकशीअंती सरकारने ही लक्ष्मणरेषा ठरवून दिली असल्याचे समजले नीतीमत्तेच्या चौकटीत बसते तेवढेच उत्तान प्रदर्शन करण्याची मुभा आहे)

जर्मनीत तरुण मुली मिनी स्कर्टस वापरतात काही 'हॉट पॅन्टस' वापरू

लागल्या आहेत ही आधुनिक फॅशनची साथ हळूहळू फैलावत आहे. याबाबतीत मी सहज चौकशी केली तेव्हा स्त्रियांच्या फॅशनच्या बाबतीत कोणीच हस्तक्षेप करीत नसल्याचे समजले ही फॅशन म्हणजे पाश्चिमात्यांचे अंध अनुकरण तर नाही ना अशी शंका मी बोलून दाखविली परंतु जर्मन लोकांना स्त्रियांच्या मॉडर्न फॅशनमध्ये ' राजकारणा 'चा वास येत नाही

एकदा एका हॉटेलमध्ये रात्रीचे डिनर घेतवेळी फ्लोअर शो बघण्याची संधी मिळाली बीटल्सचे संगीत जर्मनीमध्ये सुद्धा लोकप्रिय आहे बीटल्सचे संगीत हा काय प्रकार असतो याचा अनुभव घेण्याची संधी मिळाली

बीटल्सच्या संगीताचा प्रभाव मात्र जबरदस्त दिसतो कारण त्यांचे संगीत सुरू होताच प्रेक्षकांतील काही जोड्या उत्स्फूर्त नृत्य करण्यास पुढे सरसावल्या फ्लोअर शोच्या वेळी हॉटेलात काळोख असतो (म्हणजे तसा मंद उजेड असतो, परंतु टेबलावरील खाद्यपदार्थांवर ताव मारताना जरा अडखळल्या-सारखे व्हायचे) लोक पबमध्ये फिरत्या बाकड्यावर बसून दारू मजेत पितात व त्या नशेत नृत्याचा आस्वाद घेतात मी माझ्या आसनावरून मुळीच हललो नाही कारण मला पबमध्ये जायचं नव्हतं. मी कॉफीचे घुटके घेत निरीक्षण करीत राहिलो नृत्याचा एक प्रकार संपताच झगझगीत उजेड केला जातो

जर्मनीतील रात्रीची दुनिया पाहिली, पण कुठच बीभत्स, उत्तान अगर आक्षेपार्ह दृश्य दिसलं नाही त्यांच्या बेहोषीतसुद्धा संयमाचा लगाम आढळला. त्यांच्या मनमोकळ्या, निरोगी स्वभावाचं रहस्य काय हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला जर्मन स्त्रीला पुरुषांना ' राष्ट्रीय चारित्र्य (National Character) आहे जीवनाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विधायक स्वरूपाचा आहे हेच त्यांच्या यशाचे रहस्य आहे

९८६७

REFBK-0018651